Bharat-itihas-samsodhak-Mandal swiya granthmala

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ६२

No. 62

Shiv-charittra-Sahitya

# शिव-चरित्र-साहित्य

## खंड ९ वा

vol 9

संपादक

edited by

श्री. शां. वि. अवळसकर

S. V. Avsalkar

MR
954.026
Av 88.IX S

MR
954.026
AV88.IXS

किंमत १॥ रुपया

[ इ. १९४४

108973

# प्रस्तावना

या शिवचरित्रसाहित्य खंडाचें संपादन श्री. **शांताराम विष्णु अवळसकर** यांनीं केलें आहे. यांतील कागद त्यांनींच जमवून, नीट जुळवून व नकलून ते प्रसिद्ध करण्यास मंडळाकडे दिले. त्यामुळें शिवकालीन पत्रांचा हा नवा ठेवा पुढें येत आहे. आतांपावेतों शिवचरित्रसाहित्याचे नऊ खंड निघाले. आणखी कांहीं खंड होतील इतकें साहित्यहि मंडळाजवळ तयार आहे. पण आर्थिक व इतर युद्धकालीन परिस्थितीमुळें पुढील खंड केव्हां निघतील हें सांगवत नाहीं. श्री. अवळसकर यांच्याजवळहि चौल दप्तरांतील कागद शिल्लक आहेत. असो.

या खंडाचा मागील खंडांप्रमाणेंच संशोधकांकडून चांगला परामर्श घेतला जाईल अशी आशा आहे.

ज्येष्ठ वद्य ३०।१८६६ **चिं. ग. कर्वे**

INSTITUTE OF ADVANCED STUDY
Acc. No. 8773
Date 15.3.66
MR
954.0
AV88.IX

## संक्षेप

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | = | अठ्ठकोनी | मो. जा. | = | मोकळी जागा |
| चौ. | = | चौकोनी | लं. व. | = | लंबवर्तुळी |
| नि. | = | निराळें अक्षर | ले. | = | लेखांक |
| पो. | = | पोर्तुगीज | व. | = | वद्य |
| फा. | = | फार्शी | वा. | = | वाटोळा |
| ब. | = | बहुदर्ली | शि. | = | शिक्का |
| म. | = | मजकूर | शु. | = | शुद्ध |
| मो. | = | मोर्तब | प. | = | पट्कोनी |

Printed by Mr. Vithal Hari Barve at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivaji-Nagar, Poona City and published by Sardar Gangadharrao Narayanrao Mujumdar, C.I.E., Mr. C. G. Karve, and Prof. C. B. Joshi, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

# चौल-अधिकारी दप्तर

## परिचय

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचा हा खंड तयार करून देण्यांत मला आनंद होत आहे. आजवर मंडळानें प्रकाशित केलेल्या साधनांत कोंकणांतील विशेषतः चौल भागांतील साधनें थोडीं आहेत व त्यांत शिवकालीन कागद तर फारच अल्प आहेत. एकाच दप्तरांतील साधनें व तींहि एकाचेच हातीं लागलेलीं असें या अंकाचें स्वरूप आहे. मंडळानें एक स्वतंत्र खंडच प्रसिद्ध करण्याइतकी जागा मला त्रैमासिकांत दिली याबद्दल मी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्रा. द. वा. पोतदार, चिटणीस रा. चिं. ग. कर्वे व कार्यकारी मंडळ यांचे आभार मानतों.

प्रसिद्ध होत असलेलीं साधनें विचारांत घेऊन विवेचनात्मक प्रस्तावना लिहिण्याचा प्रथम विचार होता. त्या दृष्टीनें अर्धी प्रस्तावना लिहूनहि झाली; पण ८० पानांचा मुख्य मजकूर छापून झाला तरीहि बराच मजकूर तसाच उरला व असें आढळून येऊं लागलें कीं, एक खंड होईल इतकीं शिवकालीन साधनें आपणाजवळ अजून शिल्लक रहात आहेत ! तेव्हां प्रस्तावनेंत वरींच पानें अडविण्यापेक्षां साधनें पुढें ठेवण्याकडे तूर्त पहावें व या दप्तराचा दुसरा खंड तयार करतांना प्रस्तावनेंत साधनांचा सामग्र्यानें विचार करावा असें ठरविलें. म्हणून आज फक्त अधिकारी दप्तराचा संशोधकांस परिचय करून देत आहें.

चौलच्या अधिकारी घराण्याचें वास्तव्य त्या भागांत निदान पांचशें वर्षे तरी आहे. कदाचित् तें याहूनही पूर्वीपासून असेल. अधिकारी जातीनें पांचकळशी माळी ( पंचकुलवंशी क्षत्रिय ). या घराण्याची एक शाखा अणजूर येथें व एक मरोळ येथें वास्तव्य करून होती; म्हणून यांस अणजूरकर व मरोळकर हीं आडनांवें आहेत. शिवाय नाईक व ठाकूर हीं आडनांवें त्यांचींच होत. आपल्या जातीच्या न्यायमनसुबीचें काम पूर्वापार त्यांजकडेच चालत आल्यामुळें त्यांस अधिकारी हें उपनांव पडलें.

अधिकारी मंडळी जेथें जेथें गेली तेथें तेथें ती आपल्या शौर्यामुळें, बौद्धिक सामर्थ्यामुळें व लेखणीच्या नरवेजपणामुळें नांवारूपास आली. गंगाजी नाईक अगर नारायण नाईक अणजूरकर कोणत्या इतिहासज्ञास अपरिचित आहे ? सारांश, सन १५०० पासून म्हणजे निजामशाही व आदिलशाही कारकीर्दींत, नंतर पोर्तुगीजांच्या उदयास्ताच्या दिवसांत, शिवकालांत व शिवोत्तरकालांत, पेशवाईंत व आंग्रेशाहींत

अधिकारी घराणें कधीं सूर्याच्या प्रखरतेनें, तर कधीं चांद्र तेजस्वितेनें तळपत व चमकत होतें. तेव्हां या अधिकारी दप्तरांत ऐतिहासिक कागदपत्रांचा साठा मूलतः फार मोठा असावा यांत संशय नाहीं.

अधिकारी दप्तरांतील कागदपत्र अनेक दप्तरांतील साधनांप्रमाणेंच आजवर नष्ट होत आले हें महाराष्ट्रेतिहासाचें मोठें दुर्दैव होय. या दप्तराचा नाश झाला नसता तर उपरिनिर्दिष्ट शाखा आणि सत्ता यांतील अनेक घटनांचा साधार व सोपपत्तिक इतिहास समजणें सुलभ झालें असतें; पण आतां तीं साधनें नष्ट झालेलीं आहेत. ' कालाय तस्मै नमः ' दुसरें काय ! जीं साधनें अजून सर्वभक्षकाच्या स्वाहाकारांतून वांचलीं आहेत, तेवढीं प्रकाशित करणें व शक्य तर अमर करणें एवढेंच आज आपले हातीं आहे. या दृष्टीनें पाहतां, मंडळानें अधिकारी दप्तरांतील अप्रसिद्ध साधनेंही प्रसिद्ध करण्याचें ठरवावें अशी विनंति आहे.

अधिकारी दप्तर आजवर संशोधकास अज्ञात होतें असें मात्र मुळींच नव्हे. मंडळांतील एक प्रसिद्ध संशोधक रा. य. रा. गुप्ते यांचा प्रवेश पुष्कळ वर्षांपूर्वीं या दप्तरांत झाला होता. सध्याच्या अधिकाऱ्यांचे वडील कै. आबाजी अधिकारी यांनीं मोठ्या उदार बुद्धीनें दप्तर दाखविलें व रा. गुप्ते यांनीं बरेच कागद आपले स्वाधीन करून घेतले. ' मोठ्या शिवाजीपासून धाकट्या शिवाजीपर्यंतचे कागद ' आपण मिळविले, असें त्यांनींच एकदां प्रस्तुत लेखकास म्हटलें होतें. अर्थात् त्यांस बरेंच साहित्य मिळालें असावें असें वाटतें; पण फुटकळ स्वरूपांत जें थोडें प्रसिद्ध झालें असेल तेवढेंच सामान्य लोकांस माहीत ! बाकीचीं साधनें त्यांचेजवळ पडून असावींत.

तदनंतर धुळ्याचे प्रसिद्ध संशोधक रा. शंकरराव देव यांनींहि ७।८ वर्षांपूर्वीं अधिकारी दप्तरांत शिरकाव करून घेतला. कागदपत्र हातीं लागावेत म्हणून त्यांनीं रा. रामजी लक्ष्मण घरत यांचें परिचयपत्र अधिकारी मंडळीस दिलें व बरेच कागद धुळ्यास लवकर प्रसिद्ध करण्याचे उद्देशानें नेले. या साधनांपैकीं कांहीं आतां पुस्तकरूपानें संशोधकांपुढें ठेवण्यांत आले आहेत ( रामदास रामदासी–कागदपत्रें–सर चौथा–मणि ९ वा ). पण त्यांनींहि हातीं आलेल्या संपूर्ण सामग्रीचा परामर्श घेतला आहे असें वाटत नाहीं !

दोन वर्षांपूर्वीं या दप्तरांत माझा प्रवेश रा. य. रा. गुप्ते यांचे प्रेरणेनें व चौलचे रा. भास्करराव वर्तक यांचे वगवशिल्यानें झाला याबद्दल त्यांचे आभार मानणें उचित होईल. पण शिवकाल व शिवपूर्वकाल यांतील साधनें त्यांत गवसतील अशी कल्पना त्यावेळीं नव्हती. अशी इतिहासाचीं साधनें-शोधूं लागतांच हीं आतां प्रसिद्ध होत असलेलीं साधनें हातीं येऊं लागलीं. तेव्हां उपरिनिर्दिष्ट दोन संशोधकांनीं हातीं आलेल्या दप्तरांतील साधनांचा योग्य प्रपंच केला नाहीं व बरींच साधनें दप्तरांतच

राहिली असें दिसतें. असें होणें केव्हांही स्पृहणीय नव्हे हें उघडच आहे. आतां संशोधकांनीं एकादें दप्तर हातीं लागतांच त्याकडे तनमन खर्चून त्याबाबत संशोधनाचें काम पूर्ण तडीस लावणें अगत्याचें आहे. तसें केलें तरच भावी संशोधकाचा वेळ व श्रम वांचणार आहेत.

शिवकालीन साधनांप्रमाणेंच शिवोत्तरकालीन—म्हणजे आंग्रे, पेशवे व शिद्दी यांजबद्दलचीं—सुमारें १७५ पत्रें माझे हातीं आहेत. शिवाय अधिकारी मंडळींनीं सदा दक्ष राहून रोज होणाऱ्या राजकीय व सामाजिक घडामोडींच्या ज्या नोंदी व जीं टांचणें करून ठेवली, तींही माझे हातीं आहेत. आंग्रे कालावर महत्त्वाच्या ठरतील अशा सुमारें दोन हजार नोंदींपैकीं दीड हजार मीं नकलून घेतल्या आहेत. त्या क्रमवार लावून एक शकावली तयार होईल व ती आंग्रे इतिहासावर महत्त्वाची ठरेल असें स्पष्टपणें वाटतें. या नोंदींत सुहूर सन, महिना, चंद्र, शक, मराठी महिना, तिथि, वार व क्वचित् घटका यांचे निर्देश करून हकीकती लिहिलेल्या आढळतात. यावरून अधिकारी मंडळींची टापटीप व त्यांचा व्यवस्थितपणा किती गौरवास्पद होता याची कल्पना येईल.

म्हणजे थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं अधिकारी दप्तर आतां त्रिभागलेलें आहे. एक भाग रा. गुप्ते यांचे हातीं आलेला; दुसरा रा. देव यांचे स्वाधीन झालेला; व तिसरा माझ्या परिश्रमानें(!) आतां उजेडांत येऊं पहात असलेला. काश्मीरच्या इतिहासावर ग्रंथ लिहिणारा कल्हण याची एक अशी आख्यायिका सांगतात कीं, त्याच्या तीन मुलांनीं वडिलोपार्जित स्थावरजंगमाची विभागणी करून घेतल्यानंतर ग्रंथाचेही तीन भाग करण्यांत आले. संशोधकाचे हातीं तीनही भाग लागले म्हणून तो ग्रंथ पूर्ण स्वरूपांत आज आपलेपुढें दिसत आहे. भविष्यत्कालीं अधिकारी दप्तरास तसेंच पूर्ण स्वरूप प्राप्त होईल अशी अपेक्षा आपणहि करूं या.

अधिकारी दप्तरांत अधिकारी, देसाई, कुळकर्णी, पाटील इत्यादि अनेक घराण्यांतील पुरुषांस पाठविलेलीं पत्रें आढळतात. त्यांत अन्य घराण्यांतील व्यक्तींचीं विभागपत्रें, दानपत्रें इ. प्रकारचे कागदही आहेत. अधिकाऱ्यांशीं संबद्ध नसलेले कागद या दप्तरांत असण्याचें कारण असें कीं, पूर्वी अधिकाऱ्यांकडे सर्व प्रकारचे कागद नोंदविण्याचें काम असे व असें सर्वविध दप्तर सांभाळण्याचें कामहि त्यांचेंच होतें. आंग्रे कालांत तर जेव्हां जेव्हां सामाजिक व अन्य बाबतींत दोन पक्ष वादास उभे रहात, तेव्हां तेव्हां अधिकाऱ्यांस तत्संबंधीं कागदपत्रांसह हजर राहण्याचा सरकारी हुकूम सुटे व न्यायदानांत एक सन्माननीय पंच म्हणून त्यांस स्थान असे. त्यांस छत्रीचा मान होता.

आतां या कागदांतून काय निष्कर्ष निघतो तें थोडक्यांत पहावयाचें. सर्वच पत्रांतील इतिहास व हकीकती प्रामुख्यानें 'चौल' भोंवतीं केंद्रित झाल्या आहेत असें प्रथमदर्शनीं आढळतें. इ. स. १५०० पासून १८५० पर्यंत अष्टागरांत अनेकदां राज्यक्रान्ति झाली. इ. स. १४९० मध्यें बहमनी राज्य मोडून आदिलशाही व निजामशाही राज्यें अस्तित्वांत आलीं व उत्तर कोंकणावर दोघांचीहि दृष्टि स्थिरावल्यामुळें या शाह्या प्रतिस्पर्धी प्रबल सत्ता ठरल्या. यामुळें चौल व आसपासंचा भाग यांचें वारंवार रणक्षेत्रांत रूपांतर होऊं लागलें. तशांतच इ. स. १५०७ मध्यें पोर्तुगीज गव्हर्नर आल्मिडा याचा मुलगा लोरेन्सो आल्मिडा यानेंही चौलकडे दृष्टिक्षेप केला. नंतरच्या कालांत सिद्दी व शिवाजी यांची दृष्टि वळली तीही चौलकडेच ! अर्थात् चौलचें महत्त्व तेवढें मोठें होतें हें उघडच आहे. हिंदुस्थानच्या सबंध पश्चिम किनाऱ्यावर हा कालपर्यंत चौलसेरीजे नांव घेण्यासारखें व सुरक्षित बंदर नव्हतें. निरनिराळ्या राजवटींत दाभोळ, राजपुरी इ. बंदरांस कितीहि महत्त्व चढलें असलें तरी चौलचें महत्त्व अबाधितपणें अनेक शतकें कायम होतें. आतां मात्र चौलचें महत्त्व ओसरूं लागलें. या विनाशयुगांतील चौलची स्थिति या पुस्तकांतील पानांवर रेखाटलेली वाचकांस आढळणार आहे. 'चौलचा नाश कसा झाला' हेंच या पुस्तकांत प्रामुख्यानें सांगितलें आहे.

हा अपकर्ष कसा होत गेला हें पाहणें प्रस्तुत स्थलीं अगत्याचें होईल. उत्तर कोंकणच्या भागांत किनाऱ्यावर दोन खाड्या फार महत्त्वाच्या आहेत. एक दंडा-राजपुरीची व दुसरी चौल रेवदंड्याची. राजपुरीच्या खाडीवर प्रवेशद्वारीं जंजिऱ्याचा प्रसिद्ध किल्ला असून आंत लगतच राजपुरी, दांडा, मांदाड, म्हसोळें ( टॉलेमीनें उल्लेखिलेलें मुसापली ) हीं ठिकाणें असून तिचा विस्तार गोरेगांवपर्यंत झाला आहे. चौल रेवदंड्याच्या खाडीवर एका टोकाशीं कोर्लईचा किल्ला व त्याचे शेजारीं रेव-दंड्याचा कोट असून थोडें आंत चौलचें बंदर होतें. खाडीवर रामराज हें जुनें ठिकाण, व तदनंतर आतां नष्ट झालेला भोनंगचा किल्ला असून ही खाडी रोहें व अष्टमी या गांवांपर्यंत पसरली आहे. या खाडीच्या रोह्याकडील टोकावर अवचितगडावरून देखरेख होई. सारांश चौल हें या खाडीवर किंचित् आंत सागराच्या लाटांपासून सुरक्षित, खोल बंदर होतें. त्या कालांत रेवदंडा हें स्वतंत्र शहर नसून तें चौलच्याच तीन पाखाड्यांचें पोर्तुगीजांनीं वसविलेलें शहर होतें. व्यापारास सोयीचें व्हावें म्हणून व चौल येथें बोटी किनाऱ्याशीं लागाव्यात म्हणून धक्के ( piers ) बांधलेले होते व ती मालाची फार मोठी उतारपेठ व चढपेठ होती. लोखंड, मणी, पोत, तिखें इ. सामान पेण, नागोठणें, भोनंग, रामराज इ. मार्गें येई. अर्थात् हा खुष्कीचा मार्ग झाला. तांबें, शिसें, कथील इ. धातु व अन्य साहित्य बंदरांतून चौल येथें उतरविलें जाई. चौल येथून रेशीम व रेशमी कापड, मिरीं, लवंगा, जायफळें, नारळ इ. मसाल्याचे पदार्थ

यांची रवानगी होई व प्रामुख्यानें युरोपशीं व्यापार चाले. पोर्तुगीजांनीं गोवें वसविल्या-मुळें चौलचें व्यापारी महत्त्व कमी झालें. ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबईनें चौलचें महत्त्व आणखी घटविलें व चौलच्या छातीवर राजंपुरीचा जबरदस्त पाणशत्रु बसल्यामुळें व्यापार पार ओहटून गेला. हा व्यापार निःशेष करण्याची संहारक शक्ति पोर्तुगीजांस प्राप्त झाल्यावर त्यांनी चौल लुटण्याचा सपाटा चालविला. रेशमाचा व्यापार बसावा म्हणून आगर व राई ( मुख्यतः तुतीचीं झाडें ) तोडल्या व खत्री लोकांनीं चौल–रेवदंड्यास • आपल्या अधिसत्तेखालीं नांदावें म्हणून मार्गावरील कर काढून टाकले. यामुळें चौलचे मसाले व रेशीम केवळ नाममात्र उरलें. पोर्तुगीजां-प्रमाणेंच आदिलशाही व निजामशाही यांतील वैमनस्यास ऊत आल्यानंतर शांतता नष्ट झाली व चौल व्यापारी दृष्टीनें पूर्ण बुडालें.

चौलचें महत्त्व यावेळीं निसर्गाच्या चक्रनेमिक्रमानें आवरत आलें होतेंच. मूळचें खोल बंदर आस्तें आस्तें उथळ झालें व गाळानें ओहरत गेलें. हळूहळू खाजण वाढलें व खाऱ्या जमिनी तयार होऊन आतां तर चौलला बंदराचें मूर्तस्वरूप मुळींच उरलेलें नाहीं ! तेव्हां निसर्गाची ध्वंसनाक्रिया व मानवी संहारवृत्ति यांत सांपडलेलें चौल आतां मृतावस्थेस येऊन पोहोंचलें यांत आश्चर्य नाहीं.

आतां प्रस्तुत कागदपत्रांतील अन्य गोष्टींकडे वळावयाचें. ( १ ) लेख ३–यांत पोर्तुगीजांचा शहरांत प्रवेश होऊं नये म्हणून स्थावर मिळकत न विकण्याची अट दिली असून विकणारास त्याच जागीं नेऊन सुळी दिल्याचा उल्लेख आहे. सन १५६४ चे सुमारास पोर्तुगीजांनीं किती धार्मिक ' कीरत ' पैदा केली असेल त्याची कल्पना या कागदावरून येते. ( २ ) लेख १२–सन १५८९ मध्यें पोर्तुगीजांच्या जाचामुळें चौलची रयत परागंदा झाली व आगर खराब पडलें. ( ३ ) लेख १४–इ. स. १५९६ चे पूर्वी तीन वर्षें फिरंग्यांनीं तपे श्रीगांव व तपे परहूर येथें फितरती केली, लोक धरून नेले व खारी लुटल्या. ( ४ ) लेख १८–इ. स. १६०६ मध्यें फिरंग्यांच्या वसुलीच्या तसविसेमुळें रयत परागंदा झाली. चौलचा हवालदार मामूरखान यानें फिरंग्यास ताकीद फर्मावून कपितानाजवळ बोलणें करून रयतीस तकवा दिला. ( ५ ) लेख २०–इ. १६०६ त पोर्तुगीज चौलवर आले. बंदरचे कोळी पळाले. त्यांचीं घरें जाळण्यांत आलीं व त्यांस धरून नेण्यांत आले. ( ६ ) लेख २१–कोळ्यांप्रमाणेंच व्यापारी, वाणी, उदमी, पळाले. रयतेस तहसिलाची तसवीस लागली. गुरेंढोरें व बीज विकून धान्याची भरपाई करून घेण्यांत आली. यावेळीं प्रजेनें ' वसुली गैर हंगामी न होतां हंगामी व्हावी ' अशी सरकारी अधिकाऱ्यांची विनवणी केली आहे. ( ७ ) ले. २१–या सन १६०७ मधील कागदांत सन सीतामध्यें फिरंग्यांनीं तीन वेळ चौल लुटल्याचा आणि चौथे वेळीं खून खराबी करून लोक कैद केल्याचा व रयत दाभोळ व रेवदंड्यास पळाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. यावेळी पोर्तुगीजांनीं निवळ गांवच उध्वस्त

केलें असें नव्हे, तर डोंगराच्या राईहि तोडल्या. (८) लेख ३८–इ. १६४१मध्यें रण-दुल्लाखान व पोर्तुगीज यांमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें. हा लेख एका फार्शी फर्मानाची अर्धवट पण मजकुराच्या दृष्टीनें खरी अशी नकल आहे. खानानें नवें जहाज बांधिलें हें पोर्तुगीजांस आवडलें नाहीं. त्यांनीं खानाचे घोडे चौल बंदरीं उतरविण्यास मनाई केली व तह मोडला. खानानें गोव्यापर्यंत दाद लावून घेतली व पोर्तुगीजांस दम भरला. सदरचें अस्सल फर्मान रा. ग. ह. खरे लवकरच प्रसिद्ध करीत आहेत. (९) लेख ६०–सन १६८४ मध्यें कुदे, बपोली व सिडकोली हे तीन गांव फिरंग्यांनीं मारले व गला लुटून नेला.

पोर्तुगीजांचे ठळक उल्लेख वर दिले. यादवी बाबतचे व स्वारी बाबतचे पुढील उल्लेख पहा–(१०) लेख २१–सन १६०७ मध्यें खेडेदुर्गचा किल्लेदार व आतसखान यांचा झगडा लागला व अनेक गांवांची जाळपोळ झाली. (११) लेख ३५–सन १६३१: पेसजी आदिलशाहींतून गनीम राजे व दळवी यांनीं येऊन मजेस तसवीस दिल्याचें हा कागद सांगतो.. (१२) लेख ४१–मलिकंबराचे मृत्यूनंतर तहवेली, गलबले व फितरती झाल्या; दुष्काळ पडला; धुंद्मार झाली; रयेत परागंदा झाली; मुलूख खराब पडला व येक रोजाचें खावयास उरलें नाहीं. मलिकंबर नंतर यडेखान यास अधिकार प्राप्त झाला. त्यानें मात्र मलिकंबराच्या कारकीर्दीप्रमाणें शांतता स्थापन केली.

गनीम राजपूरकर व औरंगजेब यांबद्दलचे कांहीं उल्लेख आढळतात; त्यांतील ठळक उल्लेख असे–(१३) लेख ६९–सन १६८७–'सन सीतामधें गनीम राजपूरकर येऊन शहर ( चौल ) जाळहाल केले रयेत कुल परागंदा जाली गाव दोन वर्शे खराब पडिले.' (१४) लेख ८०–इ.स. १६९१ मध्यें सिदी अबदुल रहिमान उंदेरीचा किल्लेदार होता. (१५) लेख ७६–सन १६९० मध्यें बादशाही फौज चौलच्या सभ्यांत येऊन बसली आणि दामाजी रघुनाथ व केरोजी पवार मनसबदार यांची चौल येथें सरकारी अधिकाऱ्यांकडे दस्त बदस्त समजावून घेण्यास रवानगी करण्यांत आली.

इ. स. १६७० नंतर शिवाजीचें राजकारण चौलकडे शिजूं लागल्याचें दिसतें. ( १६ ) लेख ५३–१६७१ नोव्हें. चौलच्या मामल्यांतील लोक शिवाजीचा सुभेदार कृष्णाजी भास्कर यास भेटून तहास येत नाहींत व नसते मुद्दे सुचवितात म्हणून हें ताकीदपत्र पाठविण्यांत आलें आहे. ( १७ ) लेख ५६–सन १६७७ एप्रिल–प्रजेच्या इच्छेनुरूप तह दिला असतां कांहीं विशिष्ट माणसें तहरहावर येत नाहींत; तीं आण्णाजीपंताची वाट पहतात म्हणून मोरोपंत पिंगळ्यांनीं हें पत्र लिहिलें आहे. आम्ही लवकरच रायगडाहून तिकडे येत आहों. तुम्ही तहरहाप्रमाणें कायभाग करीत असावें म्हणून ताकीद देण्यांत आली आहे.

हे राजकीय उल्लेख झाले. ज्या प्रांताचा इतिहास या कागदांत आपण शोधीत आहों त्यांत पूर्वी एकच किल्ला होता; त्याचें नांव खेडेदुर्ग ऊर्फ सागरगड. लेख १४ वरून असें दिसतें कीं, इ. स. १५९६ सालीं या किल्ल्यावर कृष्णाजी तबीबराव हा किल्लेदार असून तपे श्रीगांवचा बराच भाग किल्ल्यास तनखा म्हणून दिला होता. लेख २१ वरून असें सांगतो कीं, सन १६०७ चे पूर्वीं खर्चादाखल गांव तोडून देण्याची पद्धति बदलून अठ्ठावीस हजार टक्के सरकारांतून देण्याची रीति पडली होती. पण ही व्यवस्थाही मोडून 'इतलाखाचे वरातीसाठीं विलायेतींत येऊन वराता घेऊं लागल्याची' रीत पुन्हा सुरू झाल्याचें दिसतें. प्रजेस होणारी तसवीस दूर करण्याची मागणी सदर कागदान्वयें मान्य केली गेल्याचें दिसतें व किल्ल्याचे खर्चासाठीं गांव मोकासा देण्याची पद्धति पुन्हा बदलण्यांत आली. लेख ६९–सन १६८७ आक्टोबरमधला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, किल्ल्यांतील व सुभ्यांतील अधिकारी वर्ग प्रजेचें धान्य लुटून नेई व दिवाणबेरीज वसूल करतांना अन्याय होई. सरकारी इमारतींचे शाकारणीस आगरांतून झाप तोडून नेले जात व त्यांबद्दल बागायत करणाऱ्यांस वाजवी किंमतही दिली जात नसे. इ. १६८७ मध्यें चौलच्या आगरांतून चाफे, उंडी, फणस, माड इ. झाडें पद्मदुर्ग, कुलाबा व खांदेरी येथील कोळ्यांनीं तोडून नेलीं असा स्पष्ट उल्लेख आढळतो. इमारतींचे शाकारणीप्रमाणें 'दुर्गस्यावणीची' तसवीस रयतेस लागे ( लेख ११ ).

सरकारी अधिकारी व कारकून फिरतीवर निघतांच प्रजेवर त्यांचा खर्च पडे. वस्तुतः अशा अधिकाऱ्यांस सरकारांतून अडिसेरी व भत्ता मिळत असे. ( लेख १९ ).

सरकारच्या उत्पन्नाच्या बाबती म्हणजे निरनिराळे कर होत. पुढील करांचा निर्देश कागदपत्रांतून आढळतो. (१) पटी पायेपोसी ( लेख ९,१९,३६ ); (२) राख–नुकसान पटी ( ले. ९ ); (३) सादिलवार पटी ( ले. ९,४३ ) (४) नाजीरपटी ( ले. ९, १९ ); (५) सरनाजीर पटी ( ले. ३६); (६) देशमुखपटी ( ले. ९ ); (७) मिरासदार पट्टिया ( ले. ४३ ); (८) कापडावर जकात ( ले. ४० ); (९) गडछावणी ( ले. १९, ३६,११ ); (१०) बोखारटका ( ले. ११,१९, ३६ ); (११) कापुरपाईक ( ले. ३६ ); (१२) सराफ पटी ( ले. १९ ); (१३) वऱ्हाड टका ( ले. १९, १२,५१ ); हा दोघां संबंधियांपासून एक टका इतका घेतला जाई. (१४) शेतसारा; ( ले. ३६ ) (१५) निपुत्रिकाची मिळकत वारसाचे स्वाधीन करतांना 'निपुत्रिक' म्हणून एक कर घेतला जाई ( ले. २१); (१६) चौलच्या खन्यांस माग घालण्याबद्दल पेठेंत जकात सवा सहा लारी व चौलांत साडे आठ लारी दर मण रेशमामागें पडे. पण ती रेदंड्यात द्यावी लागत नसे ( ले. ११ ); (१७) घरटका व मीठटका ( ले. ६९); (१८) कोतवाली ( ले. २१ ); (१९) गैरमहसूल

( ले. २१ ); (२०) वणटका ( ले. ५८ ); (२१) नफरटका ( ले. २१); (२२) खुळगे म्हशी इ. वर जकात व धान्यविक्रीवर कर असे ( ले. १९ ); (२३) यांशिवाय कारुक, सिगौटी म्हणून कर असतच.

कुळांकडून वेठीबेगारी घेत ( ले. ११,१२ ). वेठींत एक पाणवेठीचा प्रकार असे. बाजारांत येणाऱ्या केळी, आंबे, भाजीपाला इ. वर वानगी घेण्याची रीत असे. यावरून रयतेची स्थिति कशी असेल याची कल्पना येऊं शकते.

कुळांच्या बाबतींत प्रांताधिकाऱ्यांची वागणूक कशी असावी हें सांगणारें शिवाजीचें पत्र ( ले. ५५ ) वाचकांनीं संपूर्णच वाचावें अशी येथें आग्रहपूर्वक शिफारस करतों. सारें पत्रच उत्कृष्ट आहे.

खुष्कीचे मार्गानें बालाघाटींहून आयात होई तिचा उल्लेख पूर्वी केला आहे. ले. ४० वरून असें दिसतें कीं, पेठ रुस्तुमाबाद ऊर्फ गडगा या जागीं बंदरानजीक वसाहत करण्यास कौल देण्यांत आला व पेठ वसवली गेली. कोळी लोक दर्यांत खुटें रोवून मासळी मारीत. ज्यांचीं स्वतःचीं खुटें नसत ते जरूरीप्रमाणें खुटें भाड्यानें घेत. त्यांस दर खुटास पाच लारी भाडें पडे ( ले. २० ). राज्यक्रांती झाली म्हणजे राजा बदले व नवें नाणें चालू होई; अशा स्थितींत पूर्वीचे मानमरातब पूर्ववत् चालत; पण आपला 'हकलाजिमा' नव्या टाकसाळी नाण्यांत चालू व्हावा याबद्दल हकदारांस दाद लावून घ्यावी लागे ( ले. ८ ). देसायांसारखा तप्यांचा अधिकारी नवीन आला म्हणजे त्यास सरकारांत सन्मानदर्शक पोषाख देण्याची वहिवाट असावी असें दिसतें ( ले. १३ ).

आदिलशाही अमल असो अगर निजामशाही असो. हिंदूंची स्थिति सारखीच असावी. या दृष्टीनें लेख ३४ पहावा. हिंदु प्रजा जागाजागा राहून मामुरी करीत आहे तरी तिला आपल्या धर्माप्रमाणें पूजाअर्चा वगैरे करून सुखें राहूं द्यावें व मलिक अंबरचे कारकीर्दीत चाललें तसें चालवावें असें या पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे.

लेख १६ वा उल्लेखनीय आहे. गांवचा शेट्या मोठा मानकरी असे. ज्याचे घरीं लग्न असेल, त्यानें नगरशेट यास शेला द्यावयाचा असे. ज्यास पुत्र होईल त्यानें हरकी म्हणून एक लारी शेट्यास द्यावयाची. शेटिया आपल्या जातीचा न्यायनिवाडा करी. खंडदंड घेई. सिनलकी व निपुत्रिकत्व याबाबत त्यास कांहीं हक्क असत. त्याचे संमतीनें दिव्य करण्यांत येई. तो जातींतून कानू व निमकानू घेई. शेट्याचे शब्दाबाहेर असणारास टार करणें अगर बेडी घालण्याचा त्यास हक्क असे. त्यास छत्री व दिवटीचा मान होता. देशाधिकाऱ्यांसवें बसून तो न्यायनिवाडा व गावकी करी.

लेख १ ला जुन्या भाषेचा उत्कृष्ट नमुना व म्हणून वाचनीय आहे. तो अस्सल कागदावरून घेतलेला आहे.

लेखांची निवड करीत असतां पुनःप्रकाशन टाळण्याचे उद्देशानें शक्य ती काळजी घेतली आहे. उदाहरणार्थ, धुळेकरांनीं प्रसिद्धिलेल्या लेखांपैकीं ३६, ४६ व ५७ हीं बाजूस ठेवलीं. ४६ नं. च्या पत्राचें मूळ मजजवळ आहे. धुळेकरांचा १ लाच अपूर्ण लेख पूर्ण स्थितींत सांपडला. तो मात्र पुस्तकांत दाखल केला आहे. लेख ३१ ची सहीशिक्क्यानिशीं असलेली प्रत अशीच बाजूस ठेवावी लागली. जीं पत्रें बनावट वाटलीं तीं अशींच वगळलीं आहेत.

लेख निवडणें व नकल करणें इतकें काम प्रत्येक संशोधकास निवांतपणें करितां येतें; पण नकल दुरुस्त करणें व चर्चा करून पारखून घेणें हीं कामें योग्य व्हावयास तशाच साक्षेपी आणि व्यासंगी माणसाची मदत लागते. या बाबतींत मला रा. शंकरराव जोशी यांची मदत झाली. त्यांचेबरोबर अनेक दिवस व रात्रींही जागून या पुस्तकास कांहीं स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला. गेले अनेक दिवस रा. ग. ह. खरे यांचें साह्य फार मोठ्या प्रमाणांत मला मिळालें. त्यांचे मुळें नकला अधिक शुद्ध तर झाल्याच, पण फार्शी मजकुराशीं ताडून पाहून योग्य वाचन स्वीकारण्याचें जमलें; म्हणून अतिशयोक्ति टाळून असें म्हणतों कीं, यांतील चांगलेपणाचें श्रेय त्यांजकडे बव्हंशीं आहे. यांत असत्य अगर अवास्तव सुतराम् नाहीं. या पुस्तकाची विषयसूचि व शेवटची साधारण सूची अनुक्रमें रा. शंकरराव जोशी व रा. ग.ह. खरे यांनीं केली आहे. रा. य. न. केळकर व डॉ.मो.गं. दीक्षित यांचीही मदत मीं पुष्कळच घेतली आहे. रा.कर्वे यांनीं मला दिलेल्या सवलती व त्यांची सुजनता आतां नुसती सुचवितों मात्र. माझे अलिबागचे मित्र रा. बाबूराव परांजपे, रा. लोंढे, रा. गो. बा. वैद्य व डॉ. जी. आर ढबू यांचें अनेकविध सहाय्य मला झालें आहे.

रा.द.वि. आपटे यांच्या ममतेस हें पुस्तक अंतरलें आहे याचा विषाद वाटतो !

अधिकारी दप्तराचे मालक रा. वासुदेवराव व मदनराव आणि त्यांचे अधिकारी चुलत भाऊ रा. मोतीरामभाई यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. इतिहासकालीन अधिकारी घराण्याचे ते सुप्रतिष्ठित मानकरी आहेत. त्यांस अभिवादन करून हा लांब-लेला परिचय संपवितों.

अलिबाग
ता. १०-६-४४

शां. वि. अवळसकर

# विषय-सूची


अधिकारी ६६, ले. ८१,९५,९८,१००
व प्रायश्चित्त २९
आडनांवें ले. १, ३, पृ. ४ ले.३६,७२
इजारदार ले. ९१
इसाबत ले. १०, २१, ३२, ३७, ४७,
७५,७९
इस्तावा पृ. ७४
उयोगी व अधिकारी गावकरी ले. ९,१६,
२६
उपाध्ये व जोसी ले. ३
एकोपा पत्र ले. ७
कमाविस ले. ४७
कर्ज ले. १७,१९;३२,७०,९२; पृ. ३०
करपट्टया-बाब पृ. २२; ले. ९,११,२०;
-हक्क पृ. ४,५,२७, ले. ३२,४३ ४५,
४६, ४९
कर माफी पृ. ७४,७७,७८
कागदयाद्दा पृ. ५४
काजी पृ. १९
कारकून ले. ३२, ४०,४३,९०,९२,९३,
९९-(निसिंदा) ९९-इमारती ६६
कारकुनी पृ. ७४
कासार ले. ८,९,१६,१७
किल्लेदार ले. ९०
कुलकर्णी (व गांवखंड) ले. ५;-काम ७,
१३; ले.६,२२,२३,२४,२९,३१,३९,
८१ नैनात ले. १० ६०,६२
कोळी ले. २०, ७६, ९९; पृ. ७२, ७३
कौलनामा ले. ६,८, ११,१४,१५,१६,
पृ. २८; ले. २४, ३१, ४०,४१,४२,
४३, ४४,४५,६३,६८,६९,७०;७१,
७६,७७,८०,९१
कुंभार पृ. १२
खासनिवीस ले. ३९
खून माफी १७
खोत ले. २, ११,१४,१९, २१, २२ पृ.
२५,२६ ले. २४,'३१,३२,४३,४७
खंडणी पृ. ७८
गनीम ले. ६९,७०,७१
गाईवर कर माफ ले. ५४,५७
गांवठाण ले. ११
गुन्हेगारी पृ. ६९,७४,७५
गुमसाले ७९
घडणी पृ. ५५
घरटका पृ. ७५,७७,७८
चिटणीस ले. ८१
चौधरी ले. ४३,६६,८१
छत्रीचा मान ले. ४५
जकात ले. १९,पृ. २९,ले.३८,४०,८५
जत्रा ले. ९५
जमीदार ले. ८६, ९५,९८
जहाजें ले. ३८, पृ. ४५
जातिभ्रष्टता व पावनत्व ८३
जिराईत पृ. ६४
जेवणाचा मान १६-१७
जोशी उपाध्ये ले. ७५
जंजिरे पृ. ७२
ठाणदार पृ. २७; ले. १८

तकदमा ( फाजील ) वसूल पृ. ६४
तपासनीस पृ. ७४
तलब ले. ८१
ताकीदपत्र ले. ८२
तैनात पृ. ५४
दत्तक ले. ९४
देवालयें पृ. ७२, ले. ३४
देसक ११,१२,१५,१६, २२, २७, ३८ ३४, ७४
देसकुलकर्णी ले. ४१,४२,४३,४६, ५१, ५२,८३,१००
देशपांडे ले. ७७,७९,८०,९२, ९५, ९८, पृ. ७४,७५
देशमूख ले. ६६, ७७, ८१, ९८, १००, –पटी ले. ९, पृ. ७४,७५
देसाई व देसकुलकर्णी ले. ३२, ६६, ९३, ९५
देसाई व गावखडे ले. ३९,४१,४६, ४७, ७९,८१, ८३–चा मुंबईत अंमल पृ. ८७–भांडण ९७,–काम ले. ६–तैनात ले. १०,१८,२२,२३,२४,२९,३१
धर्मादाव ले. ५४
नाणींविशेष पृ. १४, २०–२२, ४८, ले. ३,८,१२,३६ ले. ८४ असर्फी
निलोतरी पृ. ७३
निशाणी ले. २९, ७२
न्यायाधीश पृ. ६८
न्याय ले. ९७
पाखाड्या पृ. ३
पाटील व देसकुळकर्णी ले. ५१, पृ. ६८
पाणसरेपण–वतन ले. ८५
पातशाही फौज ले.७७–जमीनदार ले.९२
पालणूक ले. ७
पेठ पृ. ३; ४४ ले. ६४, ४४; ८५
पंडितराय ले. ९४
प्रभावली ले. १२,४६
प्रायश्चित्त ले. ७५
फाजील पृ. ६४,७५
फांशी–सुळी–देणें. ४
फिरंगी ले. १२ पृ. ४; ले. ४, १४, १८, १९,२०, पृ. २५,२९,४३,३४,३५, ४४,४६–वर स्वारी ९१,९२
फौजदार ले. ९१
बटाई तह ले. ५५
बागाईत पृ. ६४, ले. ९९
बाजार पृ. ११,१२,१६,२२,२६; ले. ४०
बार–चे शेरे ले. १० पृ. १०
बेगार माफ ले. २०
भंडारी पृ. ७५
मख्ता ले. ७६
मजमूदार ले. १८,३२,३३, –तर्फ० ६६
मनसबदार ले. ७७
मनसुबी पृ. ६८,६९
महजर ले. ३,६६,८१
महसूल पृ. ८८ ( मोगल तर्फ )
महाराष्ट्र धर्म– याती ले. ८३
मान सेटयेपणाचा १७
माप ले. ५७
माफी–वसुलांत पृ. २६; २९, ३०,३२, ४८,७२,८८; ले. ८५
मिरासदार ले. ४२,४३;पृ. ५४,६१
मीठ–टका पृ. ७४;७७,७८
मुकादम ले. ५१
मजमू पृ. ६८,७३
मुतालीक ले. ७३,८६,१००
मुद्रा–पंडितराव ले. ५४–मोरो त्रिमल– ५६–समाप्ती ले. ५६–जनार्जी पवार सर नौबत ले. ८७–१०९ निळो

मोरेश्वर मुद्रा–रायाजी सडक प्रभू ले. ६९–जिवाजी हरी सुभेदार ६८ – केसो त्रिमल ले. ९६ –कोऱ्या कागदावर ४ – फारसी काजीचा ले. ७ फार्शी ले. ७, ७३
मोकद्दम ले. ७७
मोहतर्फा ले. ७५
यादिदी ले. ४८,५० पृ. ५४,७३
रयतमूल्य–पण ले. ५३
राजमंडल पृ. ६७
राजशक ले. ५७
राजाज्ञा ले. ६७
लग्नांतील हक्क ५–वऱ्हाडटका पृ. १२, १६,२३,२७,४५
लारी पृ. ५३
लूट नागावा–मोंगलाकडून पृ. ६९
वतन ले. ४९–दार ले. ८९, पृ. ५२
वतनदार ले. ७४
वर्षाशन–आजीव ५७
वरात पृ. ६८, ले. ५२, ६७, ६०–दार पृ. ६४, ७४
वसाहत ३०,–पुनः ले. १८
वसूल–ऐन जिनसी ले. ५५, दर पृ. ७४ –बारमाही उदमि व्यापाराचा ले. ७० पृ. २५ –संचणीप्रो ३० उगवणी
वाटणी ( विभाग ) पत्र १
वानगी पृ. १२,२२,२४,२६
वारसा ले. ८१
विर्कासत ले. २५,२७,२८,३६,७२
वेठबेगारी पृ. ६५,७४,७७
शिद्दी ले. ८०
शिक्षा. पृ. १७
सण ले. ७५
सबनीस ले. ६२
सभापत्र पृ. १७, ले. ९
सरकारकून पृ. ७३
सरदेशमुखी पृ. ७४
सरनोबत ले. ८७
सरहवालदार ले. ४०,४२,४३
सराफ ले. ७०
साक्षी पृ. ४२, १६, ८०; ले. २५,२७, २८,५१,५२
सिसावराव ६७
सिलोतरी ३१, ले, ३६,८१
सुभेदार ले. ५३, ५४, ५५, ६१, ६३;– हशम–पावलोक ६६,६८,९७
सेटेपण पृ. १७–ची थोरवी १७
सेरीकर ले. ४२
सोनार पृ. ७८
हक्क पृ. ४१ ले. ३५,३६ पृ. १६, १७, ले. ३१,४६ लाजिमा हक्क ले. ५१, ७५ पृ. ७३ ले. ८२
हयसी ले. ६०
हरकारा ले. ६३ पृ. ६५
हवालदार पृ. २४,७३ ले. २७, ३२,३४, ४३,५८,६०, ६६, ८०,२८
हिंदुधर्मपालन ले. ३४

# शिवचरित्रसाहित्य

## खंड ९ वा

## चौल-अधिकारी-दप्तर

ले. १ } ॥ श्री महागणपतिर्जयति ॥ { श. १४४६ मार्ग. शु. १
{ इ. १५२४ नोव्हें. २६

शाके १४४६ तारण संवत्सरे मार्गशिर शुद्ध १ प्रतीपदा सोमे ताद्दिनी चंपावतीस्छ सभ्य स्मार्थ समक्ष[केशव] जोइसी बाल जोइसी यांस हर जोइसी बाल जोइसी एही विभागपंत्र लिहोन दिधले ऐसे तुमचे [व] आमचे शुने व रुपे व कांशे व शीशे तांबे वशा लोखंड व संचिक् व रंचिक् व रुण व गोरु व वांछरु यथांशे खंडले तामी घरवाडी व वाईशेथ व कोलवलीचे शेत व खार शंकरभटाचा चतुर्थांश ज्योती[स वृ] त्तिचा चतुर्थांश व बंदरीची वृत्ति वो चारे मोहल इतुकें तुमी पुत्रपौत्री उपभोगणे आपणास राहा [व] याकारणे घराचें उत्तरीं ठाव दिधला असे तेथे घर बाधोन व कुटकापासून उत्तरीलेकडची चिरटी ज[व]पर्यंत वझांचि वइ व गोवणपावे तितुका आवड दिधला असे त्या आवाडामध्ये झाडमाड लाऊन त्यास बावीचें पाणी चतुर्थांशे केलें व आवाडामध्ये राहाटिचे पाणि न्यावा कारणे कुडकाकडील मार्ग दिधला असे तेणें मार्गे पाणि निऊन घडमाल लोटा इआस आपणास संबंध नहि व आपणास गणेशाचें पुराण दिधले असे व वाडियाच कोण वैजालांची दिधली असे व घरवाडीचे सीलोत्तर जवपर्यंत पालनें तमपर्यंत आपणास पालावे जेधवा देवाण शेलोत्तर पली तधवा आपलेकडे जे कांहि झाडमाड असेल तेणेपरमाणे देवान महसुलाची उगवणि करून शीलोत्तर पालतां जो कांहि देवानसंबंध पडेल तो तुमे जाणावे आपणास संबंध नहि आपणास देहशुद्धी जावाकारणें अडपखला कांठे ठाव दिधला असे तेथे स्त्रीमनुष्ये देहशुद्धिस जाऊन एणेंप्रमाणे तुमी पुत्रपौत्रे उपभोगणे हे आपले विभापत्रे सत्य.

साक्षि

रामेश्वरभट्ट अग्निहोत्री ठसेर — कृष्णभट बलाळभट वैद्य

[1]माहादप्रभु देसाई — [1]बाघोराम देसाई

---

१ ही सही मोडीत

| | |
|---|---|
| रामेस्वर भट अग्निहोत्री | बाच[1] ठाकूर अधिकारी |
| हरिभट्ट धर्माधिकर्णी | अंतभट कृष्ण भट |
| हर जोइसी | पिलंभट चांगदेभट |
| जानभट हरिभट | [1]माहाद वर्तक दडाड |
| वैजनाथ जोइसी | नार क्रमंत राम क्रमंत |
| भान वझा गोविंद वझा | चिलनाक सिधोरे |
| [1]वामन जोइसी हर जोइसी | बाळ वझा विटल वझा |
| विस्वनाथ जोइसी कृष्ण जोइसी | भोळनाक अगोशकर |
| कुकभट वाघभट | कुकंभट जोमणभट |

---

ले. २ } [उजवे बाजूस पुसट फार्शी शिक्का व पांच ओळी मजकूर*] ता { श. १४६१ इ. १५३९

अज दीवाण रख्तखाने खास बिजानेबू सेस इभराईम आहामद खोतू मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल दाम तायेदहु चिदानंद महाद प्रो देसाई व मजकुरीन अदिकारी मामळा मजकुरू याची इसाबती दिवाणी घतो म्हणोनु। माहाद प्रो व अदिकारी मंजकुरी दिवाणी मालूम केले अज त आज दस्तकबील सु॥ आर्बैन व तिसा मया माहाद प्रो देसाई व अदिकारी मजकुराची गाव इसाबती यासी माफ केलिया असती सालाबाद जेसे चालिले आहे तैसेची याची ये दुभाला किजे [फा. मोर्तब]

तेरीख

पौ—

[कागदामागे*] मुकाबला कर्दे सूद ब॥ असल

---

ले. ३ } ॥ श्री ॥ नकल { श. १४८६ इ. १५६४

महजरनामा हाजिर मजालिस देशमुखान व शेटे माहाजनानि व चौधरियानी व मोघतासरानि मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल दर जागा हवेलि जिवन पारशि सुहूर सन खमस सितैन व तिसा मया

| | |
|---|---|
| रामाजिपंत देसाई १ | खुडक ठाकूर आधिकारि |
| तावजि नार प्रभु सबनिस १ | गोविंद चौधरि १ |
| गोविंदराम प्रभु यादव कासार बेकर १ | दिपाजी सेट्यी बोगार १ |

---

१ सबंध कागद बालबोधींत असून एवढीच सही मोडीमध्यें.

मोहन भारण जोव्हेरि १
कृष्णंभट्ट शिधोरें
श्रिधरभट्ट खाडिलकर १
जिवन बखारदार १
लालदेवराज हंसराज १
देवा दलवि
तिमाजि विठल माहाजन चाटे
विनायक सराफ
अनंतभट्ट दिक्षीत

रामाजी सुदरशेण सराप
मदखुदनभट्ट
विट्ठल करवे
रामेशभट्ट देव
नारायण भवान शेठिया
कल्याण माहादेव जरकर
राघव सुरा कातारि
अंताजी खत्रि
मुकादम
वैजनाथभट्ट पराडकर
हरिपंत अतरकर
गोरा मंगळ चोघला
राजगवळि

तावजि नागोजि देशाई व देशकुळकर्णि, विठोजि गंबाजी उमारे, रामसेणवि मेर्डे, नथु मुकादम, कमाजि सेठि नाईकर, कृष्णाजि नाईक कळवे, भानुभट्ट दयके, चंद्रशेखरभट्ट जळशे, पद्मशेठि सोनार, आपाजी बोगार, नामाजि कोतवाल, मदन सोरज, अरमाळ सोरग, देवजी जयराम त्रवाडि*

सदरहु हजिर मजालसिस उपाध्ये येहिं विदित केले कि आपलि व जोसि याची वृत्ति माहालानिहाय चिनपसील

| माहाल आगर चेऊल पाखाड्या | | माहाल कसबा व पेठ हुसेनाबाद व नवें नगर |
|---|---|---|
| १ प्रथम | १ वैजाळी[१] | १ देखिल डाभे करचोळि तपे |
| १ चेव्हावि | १ तुडाळ | १ बाम्हणगाव कसनदिचा दक्षण भाग |
| १ पेठ | १ खिराळे | नउदर बागमळा |
| १ आभेपुरि | १ वेसवि | १ तपे उमटे |
| १ भोरशि | १ उसवि | १ तपे माडळे |
| १ मोखव | १ कोपरि | मौजे माहान तपे पाल १ |

तालुके फरिंगी रेवदंडे पाखाड्या

| | | |
|---|---|---|
| १ दाडे | १ मुरुडपालव[१] | १ दासवड[१] |

---

* हीं नांवें कागदांत तीन रकाने करून तिसऱ्या रकान्यांत एकाखालीं एक अशीं लिहिलीं आहेत. छपाईचे सोयीसाठीं येथें इतर, दोन रकान्यांत दिलीं तशीं हीं देतां न आल्यामुळें अशीं दिलीं आहेत.

१ हीं नांवें पहिल्या रकान्यांतच आहेत.

सदरहु जागेयाचा उपभोग उपाध्ये व जोसि हर्दु जणाचा यामध्यें जोसि यांची नवि कानू केलि म्हणून उपाध्ये यांचि व जोसि यांची कटकट लागलि याकरीतां उपाध्ये येहि जोसि यास मजालसिमध्यें घेउन आले याची नावनिसी तपसिल

| | |
|---|---|
| जोशि | उपाध्यें |
| महादेव जोशि चेळ्हावकर १ | रामेशभट्ट प्रथम १ |
| भिक जोशी आगरकर | मुडकंभट्ट द्वितिय १ |
| | नागनाथ भट्ट त्रीतिय १ |
| | बांपाजीभट्ट तईत्रव १ |
| | समस्त उपाध्ये ४ |

जोशि व उपाध्ये यांची मनसुबि मनास आणितां पुरातन चालत आले आहे त्यामौजिब उपाध्ये भोगवटा करित आहेत व जोशि पुरातन दडाड होता त्याची घराणि तिन होति त्याचें संतानं अलफ होत आलें जे कोण्ही होते तें मुर्ख होते तें विद्यावान कोण्ही नाहि याजकरिता आगरकर व बेल्हावकर या दोघांचें मुळ पुरुष बेल्हावकर याचा तव्याहुन आला व आगरकर याचा दिव्याहुन आल आपले वृतिचे काम चालवावयास ठेविले होते कितेक वर्षे लग्न मुहुर्त चालउन परिपाट पडिला विद्यावान म्हणुन दिवाण दरबारि व देशमुखाकडें प्रतिष्ठित महस्ताकडे आर्जव बहुत जाहले याजकरितां सबळ होउन दडाड याचे वृतिचा लोप करू लागले त्यांचे वंशि तिघे पुरुष होते त्यांची नावे गणेश वरतक १ माहादू वरतक १ पिल वरतक १ असे तिघे जण दडाड जोसि यांचे वंशिं होते यां तिघामध्ये पिल वरतक बहुत पराक्रमि जाहाला त्याणें दिवाण दरबारिं कटकट आणुन आपलि वृत्त आपले हातास येउन हरदुजण दुर करावें ऐसे इलाजास लागला ते वख्ती आगरकर व बेल्हावकर यांहि दिवाणामध्यें चाहाडि सांगितलि ऐसि जें पिल वर्तक याचे भावानें दडाड साचरि सेत मिळकतिचें सेत ते सेत फिरंगियासि दिधले त्यावर शेताचि कमाविस करावयास फिरंगी आला ते हकिकत दिवाणामध्ये हरदुजणानें सागितलि कि फिरंगियास मिळकत न द्यावि ऐसा तह जाहाला असता याचे भावाने दिवाणाचे बगर रजेनें विकलि ऐसे सांगतां दडाडास कैद करुन दिवाणांत आणिला गुन्हा नाहाकिकत करुन कोरे कागदावर तिन सिके करुन सुळि द्यावयास पाठविला ते समई बहुताने अर्ज केला परंतु अर्ज कोण्हाचा मजुरा जाहाला नाहि ते वखतिं पिल वर्तकानें अर्ज केलेला जे सेतासाठि सुळि देता ते सेतात नेउन सुळि देणे त्यावरुन त्या दडाड साचरां नेउन सुळि दिधला त्यावर हरदुजण वृतिमध्यें बहुतच कानु करु लागले पुरातन कानु दडाडाचे वख्ती होति ति व हालि करु लागले बितपसिल

लमपत्रीकेस बुजरुख बुजरुखी बारा सण्या होत्या हालि चोविस मागतात २४

घटिका घालते समई च्यार सण्या होत्या हालि आठ मागतात ८

मुंजीचि पाठवणि दिड लाहारि हालि दोन मागतात २

फळप्रदानि गणेश पुजनि बुज टसण्या ८ हालि १६

पाटास गणेश पुजनि बुज ४ हालि ८

मंडप प्रतिष्टेस व गणेशपुजनि बुजरुख च्यार होते हालि आठ भागतात ८

लम अक्षता समई उभय वर्गापासुन बुजुरुखि आठ होति हालि सोळा मागतात १६

नावरसिस बुज रु. २४ हालि ३२

लमाची पाठवणि बसरि लाहारि २ हालि दोन २

पाटाचि पाठवणि बसरि १ हालि २

याजप्रमाणें दडाडाचा भोगवटा चालत होत आला आतां या रवेसिने मागतात आणि दडाडाचा उछेद करून आपलि वृत्ति ऐसि मिरउ लागलें हि सर्व हकीकत हाजीर मजालशिस जाहिर जाहालि ते वख्ती हरदु जणास ताकिद करून सांधीतले कि दडाड ज्याप्रमाणें घेत होता त्याप्रमाणें तुम्ही घेणें जास्ती उपद्रव करून आपला बोभाट कधी आला तर वृत्तिपासुन दुर व्हाल आणि दिव्हाणांत गुन्हेगारि पडेल ऐसें समजोन वर्तणुक करित जाणें

शके १४८६*

---

ले. ४ } [ आरंभीं सुमारें १३ ओळी फार्शी मजकूर* ] { श. १४९१-९२ इ. १५६९-७०

तालिक

दा। खुडक कवलिया सवद कवलिया सो मौजे सासवने तपे आठागरु मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल सु॥ सन सबैन व तिसा मैया कारणे आपजी माहाद प्रभु कुलकरणी यासी कतबा लेहोनु दिधला ऐसा जे जोहारजी नेत फिरंगी याचे भात गावेले मुडे बेतोलीस साडे कुडो चौदा साडे आपणासी देणे आहे त्याची कीस्ती हरसाल मुडे चौदा येकुनु मु॥ ३ सिसाली ही॥ सन इहिदे सबैन व तिसा मैया ता॥ सन सलास सबैन व तिसा मैया झडती करणे म्हणौनु जोहरजी नेता जवल बोरे फास तुम्हास आपण जमान दिधले आहे यायदल तुम्हासी आई १ स्थल आपली मिरासी दीधवाडी सो आगर सासवने दिधली असे जोहरजी नेताचे भात

---

* हें पत्र बाळबोध लिपींत व अलीकडची नकल आहे.

मुदती आपण देऊ न सके तरी वाडी मजकुरीची किमती गला भात गावेले मुडे पचवीस जोहरजी नेतासी तुम्ही आदा कीजे वाडी मजकुरीस व आपणासी व आपले औलाद अफलादेसी निसबती नाहि वाडी मजकुर तुम्ही आपले लेकुराचे लेकुरी घेइजे वाडी मजकुरीवरी कोण्ही दगादावा करील तो आपण सोडउनु देणे वरकड नकद टके आठ रुके अठरा ׀ व गला गावेले मुडे सतरा खडी दोन कुडो चौदा साडे राहातील ते आपण जोहारजी नेतासी आदा करणे तुम्हासी निसबती नाही कतबा सही सालाची जे कीस्त होईल ते भात देसरीती आपण देणे

गोवाही

कतबप्रमाणे साक्षी वाघो राम देसाई वालवाया मौजे सासवने
घा ׀ गर तुलदम धरतुया कु म कवलिया मौजे सासवने
........व गौली हेड कवलिया चागद कौलिया
[कागदामागें*] दोज सर्फदी

---

ले. ५ [प्रारंभीं ५,७ ओळी, फार्शी मजकूर*] श.१४९३ माघ शु.१० इ. १५७२ जाने. २४

सरसमत व कारकुनानी देसमुखानी व अदाकारीयान व खोतामी व रयामि मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊळ बिदानद सुा इसने सबैन व तिसा मैया आपाजी माहाद प्रभु देसाई व कुलकरणी साो मामले मजकुरी बंदगी हजरती आर्दास हरसाल केली जे मजमुन लिहिले जे आपली इसाबती लाजीमा विलायेती मजकुरी होती ती दिवाणी जमा जाली आहे आपणास लाजीमा मुशाहिरा नाहि येण्हे करि[तां] चाकरी करितां आपणासी खावयासि नाहि तरी विलायेती मजकुरी आपणासि गाउ खंड दिल्हेया आपण कवीहाळ होउनु देसकर्तीचे काम करून चाकरी करनि मालुम जाहाले आपाजी महाद प्रभु मजकुरास गावखड खेरीज इनामती व खारिया दरगाघाप्रमाणे दर हरसाल देत जाइजे तकरार न कीजे दर हरसाल खुर्देखताचा उजूर न कीजे तालीक लेहोनु घेइजे असल नफर मजकुरास दीजे बाा खुाा तेरीख ८ महे रमजान पाा असलिमखान [ फा. मोर्तब* ]

---

ले. ६ [प्रारंभीं सुमारें ५॥ ओळी फार्शी मजकूर व मोर्तब*] श. १४९३ माघ शु.१० इ. १५७२ जाने. २४

ई कौलनामे आजदेवाण रहलखाने खास बीजानेबु आपाजी माहाद प्रभु देसाई कुलकरणी मामले मुर्तजाबाद उरुफ चेउल सुाा इसने सबैन व तिसा मया अदास

ईरसाल केला मजमुन लिहिले जे आपणे यासी कौलु तकवेतीचा होयेल तरी मामले ...... चे गावीचे संचणी करीन तुज हजरती दिवाणीचा कौलु असे तू विला येतीची संचणी मामुरी कीजे कोण्हे बाबे तालुक अंदेसा न कीजे येन्हे कौले संचणी कीजे मोर्तब [ अस्पष्ट शिक्के ४ * ]

[ नि.*] तेरीख ८ माहे रमजानु तिसा सबैन

[ नि.*] पा खान असफखान.

---

ले. ७ } { श. १४९७ फाल्गुन व. १४ / इ. १५७६ फेब्रु. २८

[ वाटोळ्या फार्शी शिक्यांत ] १०४२...चिन काजी हुसैन खादिम शरअ हैकर अलीमुस्तकवी [व त्याखाली*] नकलुलं अस्ल ताळिक

यासि साख रामेस्वर व चांवनेस्वर व हेलेस्वर

स्वस्ती श्री सके १४९७ युवा संवसरे फालगुण वद चतुर्दसी सोमे ते दिनी रामाजी वाघो पंडित देसाई मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊलु सुहा सीत सबैन व तिसा मय्या कारणे आपाजी माहादप्रभु देसाई कुलकरणी मामले मजकुरु यासि लेहोनु दिधले येसे जे आजचे दिवसापासुनु येकोपा केला तो पुढें उतरोतर चालवणे जे काही दिवाणकाम असेल ते तुम्ही व आम्ही उभे वर्गी सवादे चालवणे मागील उतपन जे असेल ते तुमचे तुम्ही खावे व आमचे आम्ही खावे यापुढे तुम्ही व आम्ही ततबीरकरिती जे काही दिवाणीतुनु वेतन काढुनु ते अर्ध तुमचे व अर्ध आमचे व मवगाव पालणुक पटिया आजाजीत काढून ते आपले तुमसी निसबती नाही दिसमर्धे सर्चवेच व जे पडेल पेसजी चालते तेण्हेप्रमाणे चालवणे येक येकाचे बरे वाइटास येक येकास अंतर न देणे मदत करणे येक येकाची चाहाडी करी तो माहाराचे वीर्याचा सहस्त रामाजी वाघोपंत देसाई [ फा. मोर्तब* ]

साखे

पत्रप्रमाणे साखे मालोबा सेटिया पत्रप्रमाणे साखे दामाजी घायजीप्रभु

पत्रप्रमाणे साखे देउजी गागप्रभु

[ पत्रामागें ' आपाजी व रामाजी यांचे येकोपेयाचे पत्र ' हा शेरा* ]

---

ले. ८ } [ पहिल्या ओळीनंतर डावे अंगास थोडी मोकळी जागा* ] { श. १४९८ / इ. १५७६

ई कौल दादे देसक व आपाजि माहाद प्रभु देसाई व कुलकरणी व रामाजी वागदेऊ देसाई मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल सहुर सन सबा सबैन व तिसा मैया

कारणे बाला सेटी बिन गोज सेटी कासार सेटिये सिर्वा अक (रा) तुम्ही अर्जदास्त व मकसूदनामा लेहोन पाटविला येसा जे आपला हक लाजिमा आपले दिमतेचे लोकांवरी आहे दिवाणीचा महसूल टाकसाली पूर्वी दिवाण महसूल उगवणी टाकसाली घेत तैसेची आपला हक लाजिमा टाकसाली घेऊनु दिवाण महसूल बुजरुखी घेऊ लागले तेसेची आपला हक लाजिमा बुजरुखी घेऊ लागलो आता दिवाण रेवदंडेयावरी आले ते तागाईत महसूल टाकसाली माहालामधे उगवणी होत कासार आपला हक लाजिमा टाकसाली देत नाही सिरजोरी करिताती आपले अकरा सिर्वांचे न्याव मूनसफी व खडदंड साळाबाज चालिले आहे तैसेची चालत नाही सिरजोरी करिताती म्हणोन खोज अनायेत सरसमत मामले मजकुरु यापासी चे बाबेची अर्दास व मकसूदनामा पाठविला त्यावरून तुम्हास कौलनामा सादर केला आम्ही तुम्हासी लेहोन दिधले जे माहालामध्ये महसूल टाकसाली उगवणी होते तैसीची कासार बाला घाटी व तुमचे दिमतीचे लोक यापासीं टाकसाली टके घेत जाणे व तुमचे लोकाचे खंडदंड न्याव मुनसफी जैसे सालाबाज चालिले आहे तैसेची चालवीजे व आगाकुलीचा कौलु दीधला आहे तो पाठउनु व तुमचें दिमतीचे लोकापासी खर्च वेच देउनु तुम्ही सुखे गावाती वस्ती कीजे कोण्हेयाबे तालुक अंदेसा न कीजे

---

ले. ९ [ फार्शी गोल शिक्का* ] श. १४९८ चैत्र शु. ५ / इ. १५७७ मार्च ५

नकल बमूजब मर्कूम हिंदवी मुताबिक असल अस्त तहरीरन् फी तारीख १२... [ शहर ] रबिउस्सानी सन १०३४ [असा फार्शी मजकूर*]

नाशिक

सके १४९८ धाता सवंछरे चैत्र सुद पंचमी सोमवासरे तद्दिनी समापत्र यहुती मिलोनु केले येसे समस्त माहाजन व मोखतास[ र ] व देसाई व अदिकारी मामले मुर्तजाबाद समापत्र केले जे समस्ती मिलोनु येसें जे पटी (हा)चे पायेपोसी व पटी–रास नुकसान व सादिलवार पटी व नाजीरपटी व देसमुखपटी व गैर महसूल व निपुत्रिक वगैरे कानु व जुलुम ज्याजतीबदल समस्ती मिलोनु हजरती दिवाणचे बंदगीस जाणे सबब फर्मानु हजरती दिवाणीचे सादीर जाहाले आहाती तेणेप्रमाणे अमल होऊ (ना)हीं।

| | |
|---|---|
| आपाजि देसाई व कुळकर्णी | बाघो राम देसाई |
| आलाजी ? देसमुख | बाब ठाकुरु अदीकारी |
| धर्मसेटी कासार सेटिये | चौधरी |
| वकाल | जमाती |

| | |
|---|---|
| सराफ | घाटे समस्त घाटे |
| सोनार | बाचुजी व आपाजी सिरे वाफटीपा व समस्ते घाटे |
| पठवे रवेतरी ! | धोबी |
| कर्डिये ! | गौली |
| खारसंडे | आगर चेउलु |
| कोली | भंडारी |
| सिपे व दरजी चेउलु | सिपे निजामपुरु |
| कयांती | |
| तपे आठागर | तपे सिराड |

नागावे थल

किळोसी केरवाड [ राअत घर्त

कुक पाटेल

पोस वर्तक हरनाक

हे मुख्ये करुनु समस्त लाहान थोर मिलौनु घरधनी कारणिक मानुसी जाणे हे बहुत कामे करिता हरयेकावरी दिला मामला ये दिवाण समधे तो समस्ती मिलौनु त्याचा निर्गमु करणे जे पडेल ते बहुती मिलौनु देणे [ का.* ] मुरत्तब शुद मुकाबला करदे शुद

---

*ले. १० } [ आरंभीं फार्शी मजकूर व त्या खालीं फार्शी गोल शिक्क.*] { श. १५०० मार्ग. शु. १४ इ. १५७८ डिसें. १३

अज दिवाण रा खास घज्यानेबु समत कारकुनानी हाल व इस्तकबाल समत तलकोकण (ठा)णदार व कारकुनानी मामले मुर्तजाबाद उा चेऊल बिदानद सुा तिसा सबैन तिसा मैया आपाजी देसाई व कुलकरणी मामले मजकुरु आपला मकसुद बदगी हजरती माळुम केला जे आपणासि इसावती देसाईपणाची व कुलकरणाची होती ते दिवाणी जमे जाहाली आहे मन्हामती होये माळुम जाले बा इसारती दिवाण आला सरजाम आपाजी मजकुरासं तैनाती सालिन्या टकें हजार येक टाकसाली तै

---

* ह्याच कागदाची तालीक म्ह. नकल दुसरीं सांपडली. त्या नकलेवर फार्शी एकच शिक्का आहे; पण तो फाटला आहे. तसेंच मूळ कागदांत मध्येंच १४ जिलकाद हे शब्द मागाहून लिहिले आहेत ते ह्या नकलेंत नाहींत व बार करण्याची निजामशाही रीतिही नाहीं. पण मजकुराच्या दृष्टीनें अस्सलाइतकीच सर्वांशीं प्रमाण अशी सरकारी 'नकल' कशी असे हें कळून येण्यास ही तालीक उत्तम साधन आहे.

केली आहेती हा[नि*] छ १४ जिलकादी [नि*] सीत पासुन आदा करीत जाइजे (आदा) महसूल मामलेयापैकी आदा कीजे दर हरसाल खुर्द खताचा उजूर न कीजे तालिक घेउनु असली फिराउनु दीजे [नि*] मोरतब रुजूशुद

तेरीख १३ माहे सौवाल सीत पा खान जावीतखान.

[ *कागदामागें ]

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ली | लि | लि | लि | ली |
| यत सुदु | | | सुरु सुद | सबूत |
| मुशीफ | | सहन सुद | सुरु | सरुनिवीस |
| | | | थार सुद | |

---

*ले. ११ } [२ फार्शी शिक्के व सात ओळी फार्शी मजकूर*] { श. १५०९-१० इ. १५८७-८८

इ कौलू दादे रख्तखाने सैद सादत सैद बाबा पोदखदी बिन सैद माहमद बोधला पीरजादे इनामदार मौजे चिचवली तपे परहूर मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल नाह्मा पदाजी बावजी खेत्री सो कसबे मजकुरु सुा सन समान समानीन व तिसा मैया कारणें कौलदादे येसाजे तुम्हास खारी फांगार देखील लागवट मौजे मजकुरु आपली मिरास विकत दिधली तीस रकम महसूल देखील कालक सीगोटी बोखारटका व वेठी बेगार व जावीतफर्मास व विटिया सारे कदीम व जदीद व हरयेक बाब सारे मोईन योकदर दुर्ग स्यावणीची तसवीस लागो नेदू व खणते व आवीत व पाणतोठिया देखील रकम महसूल भात ·ı· खडि येक गावेली दीजे हेण्हे कौले खारी मजकुरीस कीर्द मामुरी कीजे हा कौल पाळून जाणिजे या कौलास सकरार करू तर आम्हास आपले पिराची आण हा कौल सही भात खडी येक दर हरसाल दीजे गावेली——भात खडि

सारी मजकुरी प्रजा वसावेया चीचवली मजकुरीच टेंब माज जा घरे दाहा थाराची जागा मुई टेंब दीधले असे त्यास घर देणे व कोहोले व कोंबडे ने घो हा कौल सही [ पांच फार्शी सह्या *]

---

*पाठीवर टोंकाशीं अन्यकालीन 'भगारचा परिजादे यामा महसूल भात ·ı· देणें १६०९ सर्वजित ........सुध३' असा मजकूर

ले. ११ | श. १५१० माघ शु. ६<br>इ. १५८९ जाने. १२

अज दीवाण रा। खास बजानेब सरसंमत व कारकुनानी व देसमुखानी मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल बिदानद मु॥ तिसा समानीन व तिसा मैया वर्तक वाडि-वल आगर चेऊल हुजूर येउनु बदगी हजरती मालुम केले खातिरेसी आणोनु सरजाम फर्माविला असे

आगर मजकुरीचे माहासुलाची उग-वणी पेसजी मुकुरती खुर्दा. उगवणी होत असे दरीवख्त हजरती दिवाणे फिर-गियावरी स्वारी फर्माविली तैपासुनु दर लारिस टके ११९ प्रमाणे उगवणी होत असे दरीवख्त हर निसबती भिउंडी दर लारिस टके १०१ मजुरा देउनु वरताला काढून हुजुरून वराता करिताती ये तसविसेकरिता प्रजा परागदा होउनु आगर खराब जाला फिरगियाचे तसविसेकरिता झाडमाड फोफली आंबा फणस तुटले हक मन्हामती फर्मांउनु दर लारी टके ११९ प्रमाणे मजुरा देणे व सन समाना (कारणे) वरताला काढिला आहे तो दुरी करणे म्हणौनु तरी अगर मजकुरीचा माहासूल दर लारीस टके ११९ प्रमाणे मजुरा (देत) जाईजे व सन समाना कारणे हर निसबती भिउडी दर लारी१०३ प्रमाणे मजुरा देऊनु वरताला काढिला आहे तो दुरी केला असे तसवीस न दीजे साल मजकुरापासुनु दर लारीस ११९ प्रमाणे मजुरा देत जाइजे

झाडे वारेयान पडताती व मरोन जा-ताती त्याचा महासूल प्रजापासुनु घेताती व दाहा साला प्रभावली करून माहासूल घेणे ऐसी गहदम कानु आहे हाली कार-

प्रजा लोक आपलाले आगरीहून व आठागरीहून केले व काकडे व आबे व फणस चिचा आणोनु आगरामधे विकि-ताती त्यासि सालाबाद गहदम सारापटी नाही हाली यासि देसक सारापटी घालि-ताती ये बाबे फर्मान बखीके खास आहे तेणेप्रमाणे अमल करीत नाही म्हणौनु तरी बा। फर्मान अमल कीजे

पाखाडी उसवी व कोपरी व बाजे पाखाडि यामधे वाडिया हिमायेतीदारांच्या आहेती ते सारापटिया देत नाही आणि तो सारा पटिया आपणावरी पडतो तरी ज्यासी बा। फर्मान सारापटिया दिधल्या असतील त्या मजुरा देणे ज्यास दिधले नसेल तरी त्यासी तहसील करणे म्हणौनु तरी ज्यासी सारापटिया बा। फर्मान बखीके खास दिधलीया असतील त्या मजुरा दीजे ज्यास दीधले नसेल ते त्याजपासी तह-सील कीजे रयेतीस तसवीस ने दीजे

वेठी बेगारी करिता आगराची नाकी-र्दी जाली आहे तरी वेठी बेगारीची तसवीस माफ करणे व आगरीहून भाजी-पाला व केले आबे बाजारामधे विका-वया नेतो त्यासी वानगी म्हणौनु हर कोण्हो तसवीस देउनु कुटिनाती म्हणौनु-तरी आगर मजकुरीचे प्रजासी वेठी बेगा-

कून हरवख्त प्रभावली करून तसवीस देताती म्हणोनु तरी दाहासाला प्रभावली करणे म्हणोनु गहदम कानु आहे तेणेच प्रमाणे दाहा साला प्रभावली करित जाइजे व झाडे वारेयाने पडत असतील व मरत असतील ते मजुरा दीजे ज्यादती रयेतीस तसवीस ने दीजे

आगरींचा माहासूल व पटिया बारमाहा उगवणी करितातीं तेणेप्रमाणे उगवणी करणे म्हणोनु तरी बारमाहा उगवणी जैसी होत आहे तेणेच प्रमाणे बारमाहा उगवणी करीत जाइजे

कुंभार माहालींचे कारकुनाचे तसविसे करिता गयाल जाले आहेती आगरामधे गाडगे पाहिजतातीं तरी त्याची तसविस दुरी जालेया आगरासी येतील म्हणोनु तरी कुभारासी कौल देऊनु आणिजे तसविस ने दीजे

रीची तसवीस ने दीजे व सवजी व केले व आंबे विकितील त्यासी वानगी ने घीजे तसवीस न दीजे

वऱ्हाडटका कुणबियापासुनु दोघा-समधियापासुनु टका येक माहाल चाली कानु आहे दरीवख्त ज्यादती तसवीस देताती म्हणोनु तरी वऱ्हाडटका दोघा समधियापासुनु टका ये महालचाली कानु आहे तेणेप्रमाणे घेत जाईजे ज्याजती तसवीस ने दीजे

येणेप्रमाणे अमल कीजे रयेतीस कौल दिलदारी देउनु आगर कीर्दी मामुरी कीजे तालिक घेउनु असल नफर मजकुरापासी असो दीजे

तेरीख ५ माहे रबिलोवल

---

*ले. १३ } [फार्शी शिक्का व १५ ओळी फा. म.* ] { श. १५११ मार्ग. व. ५ / इ. १५८९ डिसें. २०

ता। अज दीवाण रहीमखाने खास बजानेब कारकुनानीं हाल व इस्तकबाल व अधिकारीयानि व माहाजनानी व जमातीयानी व खोतानी मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल चिदानद सु॥ तिसेन व तिशा मया रगो बाघदेऊ देसाई व कुलकर्णी मामले मजकूर हुजूर येऊन बंदगी हजरती मालुम केले जे मामले मजकुरीचे देसाईपण व कुलकरण आपली मिरासी आहे ये बाबे फमांन वसीक खास बिनाम आपुला वालिद

* ही नकल हि. ११२१ अर्थात् श. १६३१ किंवा १७०९ नंतरची असल्याचें फार्शी शिक्क्यावरून दिसतें

वाघो रामदेऊ सादर आहेती आपुला विराजर राम वाघदेऊ चालवीत होता तो मारिला गेला आपुले नावे फर्मान होयें माळुम जालें बा। इस्यारती दिवाण आला मामले मजकुरीचें देसाईपणं व कुलकरण रगो वाघदेऊ यांचि मिरासी यांसि मोकरर केलें असें यासिं हुजुरून लुगडी देऊन बहुडाविलें असें देसाईपण व कुलकरणांचें काम ऐपासून घेत जाईजे याची तैनाती व हक लाजिमा सालाबाद जैसें चालिलें असल तेणेंप्रमाणें चालंविजे तालिक घेऊनं असलं फर्मान नफर मजकुरांपासी असों दीजें

नेरीस २१ सफर

पा खान अमीनखान

[कागदामार्गे*]बा। असल मुकाबला सुद

---

ले. १४ [ आरंभीं फार्शी मजकूर*] { श. १५१७ माघ व. ४ / इ. १५९६ फेब्रु. ७

ई कौलनामे अजदीवाण मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल ता। पद्माजी बाबाजी सेर्श्री स्रोत सिलोतरी खारियाह्रा बीता।

खार ढेरण तपे श्रीगों खार सिरवली तपे परहूर खार चिचोली तपे परहूर व बा। पीरजादे

सु॥ सीत तिसैन व/निसा मैया कारणे दादे कौलनामा यैसा जे खुडक ठाकूर अदिकारी मामले मजा॥ माळुम केले जे फिरगीयांचे फितरती साले तीन जाली त्याकरितां खार मजकुरीच्या प्रजा कितेक फिरगी बंद नेळ्या व कितेक परागंदा व गैयाल व मयेत जाल्या साले तीन दरियाचे पाणी येउनु तमाम बाध व खाडिया व सीले फुटोन खांजण जाली आहे ती हाली बाधावया मबलगा पैका पाहिजे व खार ढेरण पेसजीं बदल मुस्याहिरा कुस्णाजी तबीबराऊ नामजाद खेडदुर्ग त्यासी तनखा होता त्याचे फर्मानी देखील मवाजे बेरीज सगीन होती म्हणोन त्याची तकसीमदार मजकुरावरी लारी ३४ पाहिजती घातलिया होत्या हाली तनखा दूर जाहाला व खारियाह्रा मजा॥ मुतलख खराबा होउनु खाजण जाली होती त्यामु...न बाकी कदीम सिलोतरी बेरीज मु॥ ३ साला इस्तवेप्रमाणे देणे पेस्तर कदीम सिलोतरी बेरीज देत जाइजे यैसा कौल मऱ्हामत जालेया नफर मजा॥ पैका खर्च करून खारीयाह्रा मजा॥—दीरुन करील माळुम जाले···वरून कौलनामा सादीर केला असे खार ढेरणावरी बदल तन··· जाजती लारि ३४ चढिल्या होत्या त्या दूर केलिया असती बाकी···सिलोतरी बेरीज मुकासी साला अज ई॥ सीत तिसैन ता॥ खन समान तिसैन इस्तवेप्रमाणे सहती कीजे थी ता॥

खार डेरण तपे श्रीगो देसील जाजती खार सिरेली तपे परहूर गला कल खडि॥·
बेरीज आज यासि इस्तावा
ढारि गला कल मुडे सन सीत कुडो सन सबा कुडो
४७॥ ६ ८१३॥५। . १६॥१
(नक)द्र आजती बेरीज बदल तनखा सन समान खडि
रुस्ताजी तपीबराऊ पाडिली होती ॥-
ते दूर केली लारी ३४ बाकी खार चिचोली
लारि गला कल ढारि गला कल
१३॥ ६ ५ ३८१६
महसूल गला कल मुडे कारुक लारि महसूल गला कल कारुक लारी
६ ११ मुडे ३८१६ ४
अखताना लारी २॥ अखताना लारी
यासि इस्तावा १
यासि इस्तावा सन सबा सन सीत सन सबा
सन सीत लारि गला कल ढारि गला ढारि गला कल
लारि गला कल ६ ४ १॥१० १८५।-॥ ६ २८१०॥।
ण। २ सन समान
सन समान ढारि गला
ढारि गला मुडे ५ ३८१६
१३॥ ६

येण्हे कौले सदरहू इस्तावेप्रमाणे उगवणी कीजे पेस्तर कदीम सिलोतरी दे[णे] साल दरसाल सालाबाद देत जाइजे खारियाहा मजा॥ बदिस्त क.........ई मामुरी कीजे कोण्हे बाबे ताळुक अदेसा न कीजे [ फा. मक्षूर* ]

तेरीख २ जमादिलाखर .

---

ले. १५ } [आरंभी बराच फार्शी मजकूर* ] { श. १५२० पौष व. ११ / इ. १५९९ जाने. १२

ता॥

ई कौलनामे अजदीवाण मामले मुर्तजाबाद उरफ चेऊल ता॥ तिमाजी नागोजी देसाई व कुलकरणी मा॥ मजा॥ सु॥ तिसा तिसैन व तिसा मया कौलनामा दादे पेसाजे तुम्हे बाबे देसक मामले मजा॥ मालुम केले जे नफर मजकुराच्या मकसूद प्रमाणे कौल सादीर करणे मालुम जाले बराबे मालुभाती खातीरेस आणुनु कौलनामा सादीर केला असे

आपली मोहोतादी कसबे मजकुरावरी सालाबाद आहे दरीब्रख्त कुले देता हरकत कैफयेत करितातो तरि ये बाबे हुजरुनु हक मन्हामती फर्माउनु आपली मोहोतादी सालाबाद आहे ते ताकीद करुनु देवणे म्हणौनु मालुम केले तरि या सालाबाद मोहोतादी आहे ते ताकीद करुनु देउनु

आपणास अदिकार तपे आठागर आहे त्यावरी दिवाणची किताबती आहे ते किताबतीचा जागा तपे मजकुरी विर्ती आहे ते हाली खराब पडिली आहे किताबती आपणास देणे पडते पेसजी रोजमुरदाराची वरात करुनु झाडा करवीत हाली तहसील वराता करितातो सगीन देणे होते तरी किताबतीची वरात रोजमुरदाराची करणे तहसिली वराता न करणे म्हणौनु मालुम केले तरि किताबतीवरी वराता रोजमुरदाराच्या करुनु तहसील वराता न करू.

आपली मिरासी खारी चिखली निमे मीर आकिलासी आपण फरोख्त केली यावरी रखुमीण बहु आपाजी देसाई तिसी निसबती नसता तिने खारीचे भात नेले याबदल मीर मसाहनुद्दलेनी तकादा करुनु भाताचे पैके ळारि ३८ आपणापासुनु घेतळे ये बाबे सोज हेदर ठाणदार त्याचे खुदखत सादीर आहे तो पाहुनु देवनु तरि सदरहु पैके रखुमिणीपासुनु आपणास देववणे म्हणौनु मालुम केले तरी रखुमिणीस ताकीद करउनु पैके देवउनु

येणे कौले बेसक होउनु दिवाण कामगारी कीजे कोण्हे बाबे तालुक अंदेसा न कीजे

तेरीख २४ जमादिलाखर.

---

ले. १६ { } { श. १५२१-२२ इ. १५९९-१६००

तालिक

इं कौल दादे ब्रेसक व काजी हकीमसरा व सौदागर व देसाई व अधिकारी व सोटिया माहाजन व खोत व रयेती वी तपसील

सैद माहामद मीर सैदी
सैदजी
खोज जाफर
खोज बेन्हीम
हदी माहामद
रामाजी रंगाजी देसाई अज
हती गणेश पंडित देसाई
चिपाजी खोतु
गयाजी पुठिया मुकादम
गब्बाजी पोस प्रभु
जमाती पोसजी मोकादम
सराफ दनोवा मोकादम नरसु कडू
कासार
सालवी कासार परवटनी
जनमसेट चिमाजी
रामसेटी नागोजी
नरससेट गवोजी
वागसेट महलोजी

काजी हकीमसरा
खोज अजम खोज निजामदी
माहामद हुसेन
खोज माहामद जामदार
मुलना अली
खुडक ठाकुर अदिकारी
तिमाजी कुलकर्णी
यकाल भिऊ चौधरी
कृष्णाजी येकद प्रभु
क्षेत्री गोविंद व येमाजी मोकादम
गौली माल गौली चौगला
सोनार
वीस सेट गोदसेट
सोम सेट पोस सेट

सदरहु देसक यासि धर्माजी गंभीराऊ सेटीया सिवा अकरा मामले मुर्तजायाद उरुफ चेऊल सुा अलफु कारण आम्हास सागितले जे कसबेयामधे अकरा सिवामधे सालेचे दर घरास सालाबाद जेवण व लारी येक देणं व ज्याचे घरी वऱ्हाड होईल तेन्हे सेटियास सेला देत जाणें व ज्यास बेटा होईल तेण्हे हरकी म्हणौनु लारि येक देणें व करयातीमधे आकरा सिवाचे लोक कालण घोंही हजाम सिपे सुनार सोनार कांसार लोहार पाथरवट रंगारे व मोची येही सालाचे जेवण म्हणोनु दर घरास लारियेक व कोण्ही लारी नीम देत असत व कासार बालाघाटी खरीद लरितान लोखंड व पोत व काची व तिसं बालाघाटिहून आणितानी व चेऊलीहून खरीद करितानी तांबे व मोड व कथील व सिसं व पितळ व कासं दर खंडीस लारी येक देतानी व अकरा सिवाचे न्याव मुनसुबी व खंडदंड व दीव प्रमाण व सिनलकी व निपुत्रिक हे वारनिसबत करयात व कासारामधी छतीस आहा(चा)डाचे कासार सारी कानु देतानी व सेटिया अकर व सेटीया आपले गावी कामावीस करित असेल त्यास निमकानु घ्यावी व आपला गाव सोडून सेटिया दुसरे गावी राहेल त्यास कानु सारी घ्यावी व अकरा सज्याचे अन ज्याचे बापाचा मारा नसेल त्यास सारी कानु घ्यावी व ज्याचे आउयाचे व बापाचा मारा असेल त्यास कानु निम घ्यावी याप्रमाणे सालाबाद चालत होते

यामधे जो सिरजोरी करील व सेटियाचे बोलामधे नसेल त्यास मारावे त्याचे पाई बेडी घालावी असी रीत आहे दरीनखत हक लाजिमा व जेवण कोण्ही देताती कोण्ही देत देत नाही कोण्ही रीत जालविताती कोण्ही रीत चालवीत नाही व जिकडे सेटिया गाव देस जाईल वर खारीस जाईल व मुलुक ज्याजती होईल व सेटिया बाहेर पडेल त्याबराबर बाहेर पडाव जो बाहेर न पडे त्यास संड घ्यावा व संडासी न मनील त्यासि मारून खुन करावा त्याचा खूण त्याचे गरदानेवर त्याचे खुनाचा दावा कोण्हावर वर नाही येसे सालाबाँज चालिले आहे हे बाबे समापत्र व देसाईयाचे कागद व मामलेयाचे कौल व दिवाणचे फरमाण आहेत हे हिमात व सिरजोरी करून चालवित नाही म्हणौनु सेटिया ब्याबाचे खर्च जाहाला म्हणौनु छत्री व दिवटी व नेजा व नफर व चाकर व घोडा या बराबर चालत नाही व देसकाहा बराधर गावई व दिवाणकाम चालत नाही म्हणौनु सदरहु देसकी मनास आनुन विचार केला व विचार करून निगुत केली सुहुर सन इहिदे पासुनु हा[क] लाजीमा जेवण नवे करून दिधले असे [स]दरहु बाबा अकरा सिवापासुन व बालाघाटि कासारापासुन हाक लाजिमा व जेवण म्हणौनु[स]दरहु लिहिले आहे त्याप्रमाणे घेत जाणे याप्रमाणे चालवीत जाइजे हे तुम्हास नवे करून दीधले असे याप्रमाणे औलाद अफलाद चालवीत जाइजे.

---

ले. १७ } { श. १५२४ चैत्र शु. १५
{ इ. १६०२ एप्रील ७

दसखत तिमाजी नागोजी देसाई व कुलकरणी मामले मुर्तजाबाद ऊरफ चेऊल सुा सन इसने अलफ कारणे मसुरल गजेश्री पदाजी बाबाजी खेत्री सा कोट रेवदाडे याशि आपले आत्मखुसे कतबा लेहोनु दिधला येसाजे तुम्हापासुनु कर्ज घेतले लारी ज्या( णौ ) याशि मुदती १० माहा हाा सौवाल उर्फ माहे चैत्र ता माहे रजबु उर्फ पूस सन अलफ हे मुदतीसी सदरहु पैकेयाचा उसूल येथील बाा सरीखतन ...मौजे आगरसुरे सन सलास पैकीं झडती करणे जरी आगरसुरेयाचे येथला मधे उसूल नव्हेल तरी आपण झडती करणे आमचा कतबा सही लारी तिराणौ १३९०

**गौही**

[ तीन अस्पष्ट सह्या* ]
तेरीख १३ सौवालु.
[ समाप्त* ] तिमाजी नागोजी देसकुलकरणी खुा

---

ले. १८ } [वर सुमारें दहा ओळी फा. म. शिल्लक; बाकी फाटला*] { श. १५२८ भाद्रपद वद्य १४ इ. १६०६ सप्टें. २०

र्द देसक मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल बिदानद सुा सन सबा अलफ अर्दास छ १९ माहे जमादिलौवल इरसाल केली मजमुन जे मामुरखान ठाणदार व मोरो तिमाजी मजमुदार माहालासि पैवेस्ता जाले त्यांसी सेरीकर भेटोनु माहाळांचा हालहवाल रोसन केला त्यावरून तेही साहेबांचे बदगीस अहवाल लिहिला असेली त्यावरून रोसन होये म्हणोन लिहिलें मालुम जालें* व माहाळीं फिरका दरफिरका व तहवेली दर तहवेलीकरितां व माहालदारांच्या वराता समतेहून चेउलावरी बाकी सनवात करून तेही तसवीस देताती याकरिता रयेतीस तकवा होत नाही तरी ता। सन सीन बाकी माफ जालेयांवरी रयेती जागा जागा गेली आहे तीस तकवा होऊन येक जागा होऊन आपला मुद्दा मकसूद रोसन करितील म्हणोनु लिहिलें मालुम जालें ये बाबे पेसजी कारकुनासी जवाबु सादर केला असे तुम्ही मोख्तस[र] लोक घेऊन हुजूर येणें तुमचा मुद्दा खातीरेसी आर्णोन स सरंजाम करून बहुडाऊन व सन सीत अवलसाली विलायेतीमधें निमे सीस्तीची तहसील पैके तमाम घेतले ये तसविसेबद्दल रयेती परागंदा जाली निमे सीस्ती फिरंगियापासी बाकी राहिली होती ते सिरजोरी करून येक रुका दीधला नाही यावरी मामुरखान महालासी आले येही कापितानासी बोलौनु फिरंगियासी बोलाउनु आणौनु ताकीद करून सीस्ती केली आहे दर सदे तारी वीस देऊ पाहाताती म्हणौनु लिहिलें मालुम जालें येबाबे पेसजी कारकुनासी जवाबु सादर केला असे रयेती लोकासी तकवेती दिलदारी देऊन मामुरी कीजे हाली जे सीस्ती करून दिधली आहे याची उगवणी कीजे व मामुरखान ठाणदार कपितानासी भेटोन नवे माडले तेथील गाव फिरंगी खोती केले आहेती व कायीज केले आहेती तेथील महसूल सिरजोरीनि देत नव्हते तेथील हिसेबु करून ये बाबे कपितान मदती होऊन पैके देववितो म्हणोन लिहिले मालुम जालें व वाडी रामराज आतसखान स्वार होते वख्ती किले सेडदुर्गाचे कारकुनाचें हवाळां केली ते कमावीस करिताती तरी वाडी मजकूर देसाई मजकुराची मिरासी आहे. देसाई मजकुरासी मन्हामती केलियां नफर मजकूर कबीहाल होऊन दिवाणकाम चालउनु म्हणौनु लिहिले मालुम जालें देसाई व देसक हुजूर येतील तेची वख्ती याची सरंजामी होईल. [फा. मोर्तब] [नि*] तेरीख २७ माहे जमादिलौवल पा हुजूर

---

ले. १९ } [आरंभीं फा. म.*] { श. १५२८ माघ शु. १४ इ. १६०७ जाने. ३१

अज दीवाण गा खास बजानेबु सरसमत व कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसाई व अधिकारियानि मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल बिदानद सुा सन सबा व

अलफ पदाजी बाबजी व कृस्णाजि पदाजी सेत्री कसबे चेऊल मामले मजकूर हुजूर येऊन बंदगी हजरती आपला हालहवाल मकसूद मालूम केला तेण्हेप्रमाणे हुजुरून खातीरेसी आणोन सरंजाम केला असे बीतपा [ फा. शेरा* ]

येकोजी कृस्णाजि प्रभु व कुमाजी मायाजि प्रभु व मुरार प्रभु व गोविंद प्रभु व बाजे कर्जदार यासि कर्ज आपण पैके देऊन खारिया वाडिया गाहाण घेतलिया आहेती त्याचा हसील आपणासि नुमा सौदागरी दिधला आहे सदरहू नुमेयाचे कतबे आपणाजवली गौहीनसी आहेती आणि नफर मजकुरु सिरजोरी करून हसील नेताती आणि मुदल पैकेही देत नाहि तरी ताकीद फर्माऊन बा। हिसेबी देवणे ज्यांस मवसर नसेल जे वीत गाहाण दीधले आहे ते विकून देवणे त्यांचि तिजाई माफ करणे म्हणोनु तरी जाब सरंजाम याचे कर्ज बा। कर्ज कतबे काजीचे सिक्लीसी? असतील तेण्हेप्रमाणे बा। हिसेबे याचे कर्ज देवणे ज्यासि मवसर नसेल आणि यांचि वाडी व खारिया यासि गिरौ पडिले असेल तो राजी होऊन कर्जाबदल वाडी व खारि सडून देईल तरी देवणे अगर नेदील तरी बा। खरा अमल करणे मोहोर्तब

[फा.शेरा*]

गांव व खारिया आपणासि खोती आहेती तेथील भात कसबेयात घेऊन येतो घासि आणितो त्यासि सालाबाद जकाती नाहि तेण्हेप्रमाणे चालवणे म्हणोन तरी जाब सरंजाम कारकीर्दी सलाबतखान सालाबाद जैसी कमाविस चालत असेल तेणेंप्रमाणे चालवणे मोहोर्तब [ फा. शेरा* ]

आपली घरें व दुकान व आपले बिराजरांची घरे व दुकाने कसबे मजकुरी आहेती त्यासि सालाबाद भाडे लारि नाहि हाली भाडे लारि मागताती आणि फिर्गीयाचे फितरतीकरिता दुकान घरे मोडिले व जलाली आहेती बाधावया उमेद होत नाहि तरी बा। सालाबाद प्रमाणे भाडे लारिची तसवीस दुरी करणे म्हणोन तरी जाब सरजाम कारकीर्दी बा। बुन्हान निजामस्या जैसी कामाविस चालिली असेल तेण्हेप्रमाणे चालवणे नवी जिकीर न करणे मोहोर्तबू

[फा. शेरा*]

नउदर सोनवाडी फिरंगियाचे सरदेसी आहेती फिरंगियाची तसवीस करितां वडिवल धावत नाहि याकरितां वाडी मामूर नव्हे खराबा पडिले आहे याचा माहासूल मोईन दर हरसाल लारि दोनी देत जाणे म्हणोन मामलाचा कौलु अहे तरी बा। कौलु मामलाप्रमाणे दर हरसाल लारि दोन देत जाणे ज्याजती तसवीस ने दणे म्हणोन तरी जाब सरजाम बा। कौलु सालाबाद जैसी कमाविस चालली असेल तेण्हेप्रमाणे कमाविस कीजे. [फा. शेरा*]

खारि डेरण व मेर स्याहापूर ता। श्रीगौ याचा माहासूल सिलोतर माहिमी मुडे ६०१० व कारुक व आसताना लारि ८॥ आहे त्याचि उगवणी करितो पेसजी कृस्णाजि नर्वाचराऊ किले

खारि चिचोली तो परहूर याचे खेत बिता ॥ ~

राजणखारि व माडवखार भांगार भात मसणवटी गळा गला कलस कलसवेले कलसवेळे वेले मुडे खडि

२८ १॥। ।

येकूण मुडे सवेले च्यारि येकून माहिमी मुडे ३८१६ व नख्त कारुके व असताना ळारि ५८ हे सिलोतर बेरीज दर हरसाल उगवणी करितो पेस्तर सदरहु बेरीजप्रमाणे उगवणी करीत जाणे ज्याजती तसवसि ळागो नें दणे व पटिया व गडछावणी साळाबाद नाहि यासि तसवीस ने दणे व खारिचे प्रजास वस्ती बा। टेभ कोली निसबती मौजे चिचोली दीधळे आहे तेथे प्रज वस्ती करुनु राहातीळ त्यासि मौजे मजकुरीचे व कोलियाचि निसबती न लवणे तसवीस ने दणे य मौजे मजकुरीहून पाणवेठी व कारुक सिगोटी व खार देणे व हर बाबे तसवीस ने दणे व खारि सिरोले व मेरी सिरोली नजीक यांस देणे खारि सिरोली रकम मेर सिरोली खा महसूल गळा काल बास यो॰ गळा खडी ॥ कल खडी ।

येकून खडी तीन[पाऊ]. ॥ हे आपण सिळोतरी हसील उगवणी करितो तेची बरहुकूम उगवणी करणे ज्याजती तजवीस ने दणे व पटिया य छावणी सालाबाद नाहि त्याचि तसवीस ने दणे मौजे वेजाळीची मिसबती ळाऊन पाणवेठी व खार देणे व कारुक सिगोटी व वेठी बेगारि व हर बाबा तसवीस देतील ते खेडदुर्ग त्यासि तनखा दिधळा होते त्यावरी ळारि ३४ चढऊन दीधळे होते आपण तर सदरहु सिळोतर रकम ळारि ८॥ व गळा मुडे ६८१० येरीती उगवणी करितो ज्याजती दिधळे नाही हाली तर्वीचरायाचा चढ साधणुक ळारि ३४ याचि तसवीस देताति तरी ळारि ३४८ दुरी करणे ये बाबे मामलाचा कौलु आहे बा। मामळा तसवीस न देणे पेस्तर बेरीज सिळोतर कदीम आहे ते घेणे ज्याजती तसवीस हो ने दणे व खारि पटिया व गडछावणी नाहि व वेठी बेगारि हरयेक बाबे तसवीस नाहि तेण्हेप्रमाणे चालवणे व खारि शाहापूरचे टेभ खारि मजकुरास वस्ती बदल आहे तेणेप्रमाणे चालवणे म्हणोन तरी जाब सरजाम कदीम कानु संचणी मनसूरखान जे बेरीज असेल तेणेप्रमाणे उगवणी करणे कारकीर्दी मुरुरखान नवी जिकीर केली असेल ते दुरी करणे तसवीस ने दणे मोहोर्तब [फा. शेरा*].

खारि सोवणे व खारि गोपचन्ही गंगाजी व धर्माजी व त्याचे बिराजर यांपासून विकत घेतली आहे यांचे खत काजी व सैद सादात व कलखुदा व देसाई व अदिकारी यांचे गोहीनसी आहे ऐसे असोन गंगाजी धर्माजी मजकूर गडगकरी किले खेडेदुर्गकर याचि हिमायेती करून व आपण हरकत करून खारियाचा गला जुजवी नेतानी व दोही देनाती हरकती करिताती त्यासि ताकीद करणे त्यासि खारियाचे वाटे जाऊ ने दणे जो गळा नेला आहे ते देवणे व

मना करणे व सारि मेर कौसल देऊ बाजापूर याचा महसूल गळा केले सडी येक साळाबाद पेठा साळे देतो तेण्हेप्रमाणे चालवीत जाणे यासेरीज ज्याजती तसवीस हरयेक बाबे लागो ने दणे म्हणौन तरी जाब सरजाम बा। कमावीस सालाबाद चालविळे असेल तेण्हेप्रमाणे चालवणे नवी जिकीरी न करणे मोहोर्तब्र [फा. शेरा*]

फितरतीकरिता रेवदडियासि जाऊन राहिलो आहे अतां चेउलास येऊन वस्ती करावया पाहातो तरी मागील गुन्हा हरयेक बाबे असले तो माफ करणे ये बाबे तकवेतीचा कौलु मन्हामती जाहालिया चेउली आपले घरि कवीहाल होऊन राहोन व सारियासि व वाडियासि व गावास फर्मान व मामळाचे कौलु आहेती तेण्हेप्रमाणे पाळणे ज्याजती होने दणे म्हणोन तरी जाब सरजाम पेसजीचे गुन्हा बा। मामुरी माफ केळे असे हे कसबे मजकुरासि येऊन राहातील यासि तुम्ही तसवसि ने दीजे मोहोर्तबू [फा. शेरा*]

आपण वडियासी व सारियासी व गावास खुलगे व म्हैसी व बैल खरीद करितो त्यासि सालाबाद जकाती नाहि तेण्हेप्रमाणे चालवणे व सारिया व गावचा गळा विकितो त्यासि जकाती सालाबाद माफ आहे तेण्हेप्रमाणे माफ करणे व वन्हाडटका आपणासि माफ आहे तेण्हेप्रमाणे वन्हाडटका आपणासि माफ करणे म्हणौन तरी जाब सरंजाम बा। सालाबाद जैसी कमाविस चालिली असेल तेण्हेप्रमाणे कमावीस चालवीजे मोहोर्तब्र [फा. शेरा*]

त्यापासि कर्ज आहे ते ताकीद करून देवणे सारिचा महसूल बा। कौलु ठाणेप्रमाणे घेणे ज्याजती तसवीस ने दणे म्हणोनु तरी जाब सरंजाम यांचे कर्ज बा। सरा हिसेबे असेल ते ताकीद करून देवणे मोहोर्तबू [फा. शेरा.*]

पेसजी आपण कसबे मजकुरी सौदागरी उदीम प्रवर्त करीत असो त्याचि जकाती निमेप्रमाणे सोलवेस वजा होऊन देत असतो तरी दरीग्राब कौलु मन्हामती जालियावरी उदीम प्रवर्त करून त्याचि जकाती निमेप्रमाणे सालेवीस वजा करून बा। पेसजीप्रमाणे देत जाणे ज्याजती तसवसि होऊ ने दणे येसा कौलु मन्हामती होये व उदीम प्रवर्ते करिबा जकातीचा सौत व कारकून तकद्मा कर्ज मागतील तरी त्यासि तकद्मा देऊ ने दणे जं वस्ती हसील होईल ते वस्ती देत जाऊन ये बाबे फर्मान पाळणे म्हणोन तरी जाब सरंजाम बा। फर्मान बसिके यास कमावसि ता। सौत अलफ चालिळे तेण्हेप्रमाणे कमावसि कीजे नवी जिकीर न कीजे मोहोर्तबू [फा. शेरा*]

सोडदाम दर नफर टका बुजरुखी ११४ वर्तलाचे रुके ८६ येणेप्रमाणे घेणे म्हणोन कानु आहे हालि ज्याजती तसवीस देतातीं बा। कानु सदरहुप्रमाणे घेणे ज्याजती तसवीस लागो ने दणे म्हणोन तरी जाब सरजाम सालाबाद कमाविस चालिली असेल तेण्हेप्रमाणे चालवणे नवी जिकीर न करणे मोहोर्तबू [ फा. शेरा* ]

मौजे चिचोली ता। परहूर बागा आपणासि सोती आहे रकम बेरीज मन

बाजारांत कालगड व सर्बुजी मेवा साग सबजी व तर मेवा बाजारामध्ये विकावया आणितातित्यासि वानगी माफ म्हणोन फर्मान कारकीर्दी हजरती मुर्तजा निजामस्या [ सादीर ] आहे दरीवख्त वानगींची तसवीस देताती तरी बा। फर्मान पेसजीप्रमाणे वानगी माफ करणे तसवीस ने दणे म्हणोन तरी सरजाम बा। फर्मान बा। मुर्तजा निजामशा व कारकीर्दी बुन्हानस्या जैसी कमावीस चालिली असेल तेण्हेप्रमाणे चालवणे मोर्होतंबू [ फा. शेरा* ]

सूरखानि महसूल व बाजे बाब सर्व सारे व बाजे बाब ळारि ३७३ व पायेपोसी व सरदेशमुख व नाजीरपटी ळारि ४३८ व सराफ पटी ळारि १८ येकून ळारि ४१७ व गडछावणी टके बा। २०८ येकून ळारि १०८ बेरीज आपण उगवणी करितो यावरी आपणासि मौजे मजकूर सिलोतर करून देणे. सदरहु बेरीज आपण दर हरसाल उगवणी करीत जाईन व सरसमत व कारकून मामलेयासि येताती ते लावगन घेताती याकरिता गैन्ही तसवीस होते प्रजा रजासि होताती तरी आपण सिळोतर बेरीज सदरहु उगवणी करीन तेही ळावगन ने घणे व मुस्तकबाल ने दणे फसल हगामी उगवणी करीत जाणे व पचोतरी भता ने घणे तहसिलदार येईल तेण्हे अढीसेरी रुके ८६ साहा व भता घेणे व याबेरीज ज्याजती तसवीस ने दणे व मुकासा व इनाम व तनखेदार चालले तरी सदरहु बेरीज सिलोतरप्रमाणे घेणे गाव कार्बीज करविळा तरी गाव कार्बीज करून देणे व मौजे मजकुरी नवेदर वाडी भोनसर आहे ती त्याचा महसूल ळारि १०८ आहेती घेत जाणे ज्याजती हरयेक बाबे तसवीस लागो ने दणे व पटियाची तसवीस ळागो ने दणे व मौजे मजकुरी चि गौळी मौजे चिचोली व मौजे वेजाली तर्फे परहूर तेथे सालाबाद गौळेयाचे म्हैसी आटवडे आहे तो घेताती आणि दुबारा सिमगेयामध्ये येऊन दोन तीन म्हीने राहोन गांव खावविताती खराब करिताती तरी त्यासि दुबारा येऊ ने दणे म्हणोन तरी सरजाम बा। संचणी मनसुरखानि बेरिजेने सिलोतर करून दीधळे असे मेर्होतंबू [ फा. शेरा.* ]

सदरहुप्रमाणे कमाविस व पालणूक कीजे तकारफियांदी येऊ ने दीजे तालिक घेऊन असल फिराऊन दीजे मोहोर्तब्रू [ फा. शेरा* ]

तेरीख १२ माहे सौवाल  सुमस असर अलफ.

पा। मीर अबदुल फते

---

ले. २०  { श. १५२८ माघ शु. १४
 { इ. १६०७ जाने. ३१

तालिक

अजरख्तखाने खास बजानेब सरसमत व कारकुनानी हाल व [इस्तकबाल*] देशाई व अदकारी यांणी मामले मुर्तजाबाद उर्फ [ चेऊल* ] ........ सुाा सबा अलफ कोली दादर व कोली चुनाडी बी तपसील

नागोजी पाटेल  दरवेस पाटेले  हापसी पाटेलें

कसबे चेऊल मामले मजकूर हुजूर येऊन बदर्गा हजरत आपला अहवल मकसूद मालिम केला तेणेप्रमाणे हुजूरून खातेरेस आणों( नु ) सरंजाम केला असे बीतपसील.

आपणासी बेगार माफ करोन वेठबेगारबदल किरे सिरभारी मसूल सालाबाज घेत आहेती आणि मक्तेयाचे पैके घेऊन बेगारीचे तश्वसि देतांत ऐसी दुबार मसवीस लागते ये तसाविसे करितां जरीच खराया जाहाला आहे कितीयेक कुले रेवदंडा व जागां जागां गेलिया आहेत यावर फिरंगियांची फतरत जाहाली आपली घरे जालिली व बंदे नेली येणेकरिता जरीय मुतलक खराच जाहाला आपणासी किरे सीरभारी हाली दीधली न वजे तरी साहेबी मामुरीवर नजर देऊन कीर सिरभारी आपणास माफ करणे वेट बेगारी सालाबाज चालवितो तेणेप्रमाणे चालवीत जाऊ म्हणोन तरी जाब सरंजाम यासी बेगारी माफ करोन बदल वेठ बेगारी कीर सिरभारीचा मक्तां सालाबाज घेतांत

निपुत्रिक व सिनलक व वरटटका व बोखारटका सालाबाज महद कदम आपणासी माप आहे तेणेप्रमाणे चालवणे म्हणोन तरी जाब सरंजाम सालाबाज जैसे जालिले असेल तेणेप्रमाणे चालवीजे १

आपण सालाबाज तपे अस्टागरींची कोली खुटे दरियांमधे खाऊन आणि सिरजोरी करोन खातात आणि आपणास काही देत नांही ती आपली खुटे तपे अष्टगरकरास ताकीद करून आपले दुमाला करणे अगर दरखुटास लाहारी ५ देववणे जो खुट खाईल तो देत जाईल म्हणोन तरी जाब सरंजाम सालाबाज अष्टागरीचे कोली खुटे रोऊन कमाविस केली नसेल हाली नवी जिकर करोन खुटे रोऊन कमाविस करीत असतील ते खुटे सालाबाज प्रमाणे याचे दुमाला कीजे

तेणेप्रमाणे घेत जाणे हरयेक वेठ बेगार माफ केली असे तश्वीस लागो न देणे १

रहीसाची वनगी सालाबाज आपणावर नाही हाली गैरकानु तसवीस देऊन रईस वनगी घेतो तरी रहीसासी वनगी घेऊ न देणे म्हणोन तरी जाब सरंजाम सालाबाज जैसे चालिले असेल तेणेप्रमाणे चालवीत आइजे नवी जिकीर न करणे१

कोली आपणामधे आपण [ झ ]गडा भाडण करितांत त्यासी ताजीलनाल माफ करणे म्हणोन तरी जाब सरंजाम साला चालिले असले तेणेप्रमाणे चालवणे १

अगर जो खुट खाईल त्या करवी महसूल देविजे–१

चेऊलच्या लोकास ईदपटी काले आहे जैसे सालाबाज उगवणी करणे तरी तेच बरनिसबत आपणास पाठऊन उगवणी करणे म्हणोन तरी जाब सरंजाम बरहुकूम केले येकंदर चेऊल-प्रमाणे कमावीस करणे १

[ सदर ]हूप्रमाणे कमावीस व पालणुक कीजे ताली''फिरावेन दीजे रवाना छ १२ सवल

---

ले. २१

श. १५२८ माघ शु. १४
इ. १६०७ जाने. ३१

[ आरंभीं फार्शी मजकूर व त्याखालीं चार वाटोळे फार्सी शिक्के* ]

अज दिवाण रा। खास बजानेबु सरसंमत व कारकुनानी हाळ व इस्तकबाळ मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊळ चिदानद सु॥ सन सबा अळफ-देसाई व अदिकारी व रयाया मामले मजकूर हुजूर येऊन बदगी हजरती आपळा हाळहवाल मकसूद मालूम केला तेणेंप्रमाणें हुजुरून खातिरेसी आणोन सरंजाम केला असे बीता।

कानु व कमाविस कारकीर्दी दर कारकीर्दी बा। साळाबाद चालिले आहे व माहाळास सरसंमत व कारकून आले होते तेही तमाम खातीरेसी आणोन बा। साळाबादप्रमाणे चालवीत गेले हाली कारकीर्दी खुरूरखान हवालदार नवी कानु करून गैर केले तेणेकरूनु रयेती खराब जाली व मफलीस व बेमवसर होऊन परागंदा जाली तरी कारकीर्दी खुरूरखान नवी कानु जाली आहे ते नजर अना-

कोरळांचे राजीक जालें यावरी कारकीर्दी बा। बुन्हान निजामस्या खोजगी पोखरदी खुळो करूनु मामुरी फर्माविली गावीचे ठेप ळावणेण पाहोन संचणी केली येणेंप्रमाणें ता। सन इसने अळफ चालिलेयावरी सन सळासामधें खुरूरखान हवाळदार माहाळासि आळे त्या बराबरी अमीननमुलूक होते तेही संचणी मनास आणोन साधणुक रोजमरा मनसूरखानाचे कारकीर्दी येलीकडे ज्यादती चळ जमा जाले

येती करुनु दुरी करणे म्हणौन तरी जाब सरंजाम कारकीर्दी मुरुखान गैरकानु जाली असेली ते दुरी केली असे+ मोर्तब सुद

गैरहंगामी मुस्तकचाळ तहसील करितानी ते वख्ती रयेती दर मुड्यासि काढा लारि ७॥८ प्रमाणे काढून देताती व सन सबाकारणे फिरंगिआचे तहवेलीकरितां माहाली वाणी वेव्हारा नाही व तहसीलेची ताकीद बहुत याबदल रयेतीन आपले गुरूं ढोर व बीज विकून उगवणी केली तेणेकरून रयेती मफलीस बेमवसर जाली तरी मुस्तकचळ दिधले नव चे मुस्तकचळाची तसवीस न लवणे फसल हंगामी उगवणी करून घेणे म्हणौन तरी जाब सरंजाम या मामुरी साले तीन मुस्तकचाळाची तसवीस ने दुणे महसुलावरी घेणे मामुरी आलियावरी या साळायादप्रमाणे कमासिस करणे +मोर्तब सुद

जुजवी गावास मनसुरखानी रकमेसी गावी ढेप नाही म्हणौन ते गाव खोत खोती करीत नाहीं तरी ते गाव खराब पडितो तरी कारकून व देसकी ते गावचे लावगण मनास आणौनु त्यामधें सेरी कामत वजा करून संचणी करणे गाव बीना।

| | |
|---|---|
| काचीर तपे नाम्हणगौ | मजरे दिवी नौ उमर्ते |

म्हणौन तरी जाब सरंजाम खराब गावास दस्तावेप्रमाणें कौल दीजे रकमेसी जे बेगीन नुकसान होईल तेबदल रोजमरे आहेती ते दुरी करून येन रकम जमा करविली यावरी कितेक गावी साधणुक रोजमरहा व जादती चढ हुकूम मुसावे उगवणी करविली तरी त्या रकमेस ढेप नाही म्हणौन खोत खोती न करीत तरी येन मनसुरखानी रकम घेणे साधणुक रोजमरहा व जादती चढ दुरी करणे गाव बीना।

| | |
|---|---|
| केलवली | तामनवे भाजाणे |
| बोरघर | निडी पोसिवे ढवर माजने |

म्हणौन तरी जाब सरंजाम

| | |
|---|---|
| जादती चढ या रोजमरे उगवणी करणें | ढेप नाही मनाजे निडी पोसिवें वलवली ढवर |
| तामनें बोरघर भाजाणें माजनें | या गावास कारकून व देसक जाऊन ढेप पाहोन संचणी करणें |

दरियाचे किनारे जुजवी गाव आहेती यासि दरियाचे तसवीस लागोनु कितीयेक सेतें गर्क दरिया जाली आहेती त्याकरितां गावांची रकम नुकसान जाली आहे म्हणौन खोत खोती न करीत तरी कारकून व देसकी ते गावांची सेते गर्क दरिया जाली आहेती ते खातीरेसी आणौन रकमेचे पोटी मजुरा देऊन संचणी करणे गाव बीत।।

| | |
|---|---|
| कोभरवली तपे आटागर | कावाडे तपे आठागर |
| भांमणे तपे परहूर | चेंढरें तपे खाडालें |
| पोहनल तपे श्रीगौ | |

म्हणौन तरी जाब सरंजाम माहाली कार-

उगवणी कीजे वरकड गाव ज्यास खोती आहेती त्या करवी बा॥ संचणीप्रमाणें उगवणी करवीजे + मोर्तब सुदु

गैरमहसूल व चिळा मोहला बदल कुळ आणोन राखताती त्याचे बा-बे देसक गुन्हे पाहोन व मवसर पाहोन अर्दास करिताती ते खानीरेसी जाणोन संगीन करार देताती तेणेंकरून तें कुळ आपलें जीण जितरब भरीस घाळून म-फलीस होऊन परांगदा होते व ते सक-बदल याजेही कुलें परांगदा होताती . तरी बदल मामुरी गैरमहसूल माफ करणें म्हणोन तरी जाब सरंजाम बा॥ मुनसिफी गुन्हा लाजीम होईल त्याचा गुन्हा व मवसर पाहोन ताजीलहाळ घेणें + मोर्तब सुदु

मुरुखान व किलेकरी याचे नमविसे-करितां र्‍येती खराब होऊन जागाजागा गेली व मुस्तकबल सन सबा बहुत सिना-चीन नहसलि जाले येणेकरून गळा व गुर व बीज भरीस पडोन र्‍येती परागंदा जाली तेणेकरून गाव खराब पडिले बीना॥

मोजे मख्याण मौजे वलवली

मोजे नरंडे मौजे बढुं खुा

ये गावांचे खोत मफलीस त्याचे इस्तावे जाले हाली यासि खोती देता रकम उग-वणी नव्हे आणीकास खोती देता ते रकम उगवणी नव्हे म्हणोन खोत. खोती न करीत तरी बदल मामुरी सन समाना-कारणें अमानत कमाविस करणे अगर दुमीगा खोतास इस्तावेयानि खोती देणे म्हणोन तरी जाब सरंजाम खराब गावास इस्तावेयानि सिसाळा कौलु देऊन हा॥ समान सा॥ असर संचणी मनसुरखान उगवणी करणें+ मोतब सुदु

करून व काजी व देसकी सद्रहू गाव न-जरे पाहोन ज्या गावीची सेने गर्क दरिया जाली असतील ते पाहोन मजुरा दीजे महजर व अर्दास हुजूर पाठवीजे + मोर्तब सुदु

पेसजी थोर कुळ गुन्होगारी बदल राखती त्यासि सोडवावयाबदल परवा-नगी पाठऊन सोडवीत जो परवानगी-बदल ये तो. पानसुपारी मागोन घे हाली गुन्होगार अगर न्याव मुनासिफी बदल राहताती मवसरदार अगर गैर-मवसरदार त्यासि सोडवावयाबदले पर-वानगी पाठविताती त्यापासून हुकुम मुस्तादे परवानगी लारी १। घेऊन जमा करिताती तरी हे साळाबाद कानु नव्हती हाली र्‍येती मफलीस जाली आहे तरी हे नसवीस दुरी करणें म्हणोन तरी जाब सरंजाम कारकीर्दी बा॥ बुन्हान निजाम-र्‍या जैसी कमाविस चालिली असेली तेणें-प्रमाणें कमाविस कीजे हाली नवी जिकीर जाली असेली ते दुरी केली असे +मोर्तब सुदु

मुबारखबाद रा॥ खास सन सीना-मध्ये मुरखाने उचापती केली आहे तरी मुबारखबादाची निसबती न लावणें म्हणोन तरी जाब सरंजाम बा॥ हुजनी मुरुखान मजुरा होईल +मोर्तब सुदु

बाजारांत साकसबजी विकावया आणिताती त्यासि बानगी बा॥ फर्मान माफ आहे दरी बदल तसवीस होते ते दुरी करणें म्हणोन तरी जाब सरंजाम बा॥ फर्मान बसिकेखास साळाबाद चालि-ले असेली तेणेंप्रमाणें चाळवणे नवी जिकीर दुरी केली असे +मोर्तब

मन सीतामधें सुरुरखान हवलदार चेउलास येऊन खराब गाव खोतास खोती घातले यावरी सुरुरखान स्वार जाले-यावरी गडकरी किले खेडदुर्ग यामधें व अलमखानामधें झगडा लागला होता म्हणोन गडकरी गाव कुलुन जालिले म्हणोन देसकीं अतसखान व उकाजीस सांगोनु जलित मनास आणावया कार-कुन व देसक पाठविले तेही गाव पाहिले चितां।

ना। मनसीत खराब होते ते मन मबा कारणें जलित जाले

| | |
|---|---|
| मागावे | वाडगो |
| पोवेले | निगुर्डे |
| गवमणी | भाईमले |
| काबाई | ब्राह्मणवली ला। |
| हडवलें | तिसरी |

मामूरपैकीं जलित जाले

| | |
|---|---|
| भेरसें | कुसुर |
| खाडाले | खानु |

नदरहू गाव जलित जाले पैकीं ना। मन गनि खराब होते ते मन मबाकरणे जलित जाले त्यासी महसूल व पटी माफ केले व मामरपैकीं जलित जाले ते चा। हिसेचे घणे-म्हणोन मोईन. केले यावरी मामूरखान ठाणदार हुजुरून मामले मज-कुरासी आले येसे आतसखानें आइको-नु कुळकरणीयाचे यारेदियापासून हुकूम मुस्वादे संचणीस सदरहू गाव जमा करविले संचणीस जमा आहे म्हणौन कारकुन जलिताची तसर्वास लावि-ताती तरी जलिताची तसवीस न लवणें

कितेक कुळास व खुमास वन्हाडटका व चोखारटका साळाबाद नाही तरी बा। साळाबादप्रमाणें चाळवणें व जुजवी खुमास आहे ते बेमवसर व मफलीस जाली आहेती तरी त्या खुमास वन्हाड-टका व चोखारटका ही सबा अलफ पासुनु साले ५ माफ करणें म्हणौन तरी जाव सरंजाम चोखारटका व वन्हाडटका साळाबाद जैसी कमानिस असेली तेणें-प्रमाणें कमावीस कीजे + मोर्तब सुदु

आगरची उगवणी बारमाहा करणें ये याचे हजरती दिवाणचा फर्मान पेसजी सादर आहे या फर्मान उगवणी होत असे दरीबरून मुस्तकचळ तहसील करिताती येणेंकरून अगर खराब जाळा आहे तरी मुस्तकचळ तहसील न करणें बारमाहा उगवणी करणें म्हणोन तरी जाव सरंजाम चा। फर्मान साळाबाद जैसी कमावीस जालते तेणंप्रमाणें करणें + मोर्तब सुदु

कोतवाली व आंगरी गेर महसूल किर-कोल पाच टके सोळा रुके वगी करीत हाली दाहावीस लागी गैरमहसूल पर-चाहिरे करिताती कुळाची कोसिस करणें तरी देसकास दखल होत नाही तरी कोतवाली व आगरी गैरमहसल करुं ने दणे म्हणौन तरी जाव सरंजाम कोतवाली व आगरी गैरमहसूल पाच टके सोळा रुके साळाबाद कमावीस होते तेणंप्रमाणें करणें या खेरीज संगीन कुल-गुन्हेगार असेली ते कारकुनीं हुजर कमा-वीस कीजे + मोर्तब सुदु

निपुत्रिकाचे याचे पेसजी फर्मान सादर होतां जे निपुत्रिक ते घणें तो फर्मान

म्हणोन तरी जाव सरंजाम ता। सन सीन खराब ते सन सबा कारणें मुसलम जलित जाले व ब्राह्मणवलीचे ता। तिसरी सन सबाचे सचणीस जमा करुनु घेतले त्याचे पोटी बाहुजनी कारकीर्दी मुरखा-न मजुरा देऊन बाकी राहिली असेली ते बदल मामुरी माफ केली असे सन समा-ना पासून सिसाला इस्तावा देऊन रकम प्रमाणें उगवणी करणें + मोर्तब सुदु

खारी चोळाडी तपे उमटे खराब होती ते खोज बहिराम यासि इस्तावेयानी खोर्ती देऊन बदिस्त करविली इस्तावें बा। सन सबाकारणें ठाणाहून वरात मोह-तादी पिंगी मुस्तकबळ सन सीतामधें करून दीधले यावरी दरियाचे उधाण होऊन बंदिस्ता फुटोनु खारीच्या खडिया गेल्या बीज पेरिले होते ते नाजात गेले सबाकारणें येक दाणा व येक रुका जागा नाही. कपितानाचे तह-सीलदार पेंकेयाचा तगादा करूं लागले व पेम्सर खारीचे बदीस्तीस पेंका मच-लग खर्च केला पाहिजे म्हणोन खोज माडले येदील होऊन खारी मजकूर सोडू लागले यावरी मामलाचे कारकुनी खोज मसारुनइलेसी बदल बदिस्त सवासुला मधें लारी दोनीसे मजुरा देऊन म्हणोन कौलु देऊन खारीची बदिस्त मामुरी करविली. तरी सन सबाकारणें खारी मजकुरीचे महसुलामधें बा। कौलु मामला लारी दोनीसे मजुरा देणे मोहतादीची वरात केली आहे ते तगादा करितानी त्यासि मामलाहून मुबादला देववणें म्हणोनु तरी जाव सरंजाम सन सबाचा इस्तावा फितरतीमध्यें जळाला हाली निपुत्रिकाची तसवीस देतानी तरी निपुत्रिकाची तसवीस लागो ने दणें म्हणोन तरी जाव सरंजाम निपुत्रिकाची कमाविस कारकीर्दी बा। बुऱ्हान निजामख्या माळायाद जैसे चालिले असेली तेणेंप्रमाणें चालवणें + मोर्तब सुदु

कपितानाचे तहसिले जातानी ते मचलग रोजमुरा भाते घेतानी व सर तहसिले दर-सदे लारी ५ भाते घेतानी व कुळ येमयस-मफलीस त्यासि नेऊन रेथदंडा राखतानी तरी रयेती जाद मफलसि जाली आहे तरी पचोतरी दरसदे लारी ५ नवी कानु जाली आहे ते दुरी करणें व रोजमरा दरोज रुके चुजरुक ४ देववणे व येथील कुळ रेय-दडीयासि नेतानी ते नेऊ नेदणें म्हणोन तरी जाव सरंजाम कपितानाचे तहसिले मोहतादीच्या पेंकेयाबदल जातानी ते रयेती पासून दरसदे लारी ५ घेतानी तेणेंप्रमाणें कारकीर्दी मुरुरखान सन सबामधें जमा जाली आहे ते बदल मामुरी हुजरून दुरी केली असे ठाणाहून जो तहसिला जाईल त्यासि रुके बारा चुजरुवी भता देत जाणे कारकीर्दी मुरुरखान लारी ५ जमा जाली आहे ते बदल मामुरी माफ केली असे कपितानाचा पेंका मोहतादी कारकुनी तहसील करून देणें +मोर्तब सुदु

माहालीचे कारकून कसबा व बिळा-येतीची संचणी करितानी ज्यास कौल-बोल देतील तो कौलबोल पालीत जाणें म्हणोन तरी जाव सरंजाम मुसलम सराव व दिवेलावणी असेली त्यासि कार-कुनानी खातरेसी आणोनु इस्तावेयाचा कौलु देतील तेणेंप्रमाणें पाळणूक कीजे + मोर्तब सुदु

माफ बदल बंदस्ती सारी मजकूर बा॥ कौलु कारकून सुरुरखान प्रमाणे करार असे सन समानापासून बा॥ कौलु उगवणी करणे+ मोर्तब सुदु

वाई सेत भीक जोसी तान जोसी यासि महसूल ठारी ३०। व पटिया बा॥ फर्मान बसीके खास ता॥ बा॥ बुऱ्हान निजामस्या इनाम चालिले आहे तरी बा॥ फर्मान बिनाम पनाद जोसी चाळवीत जाणे व बागाईत वाडिया आगर चेऊल पाखाडी भोरसी बा॥ फर्मान इनाम आहे ते चिनाम पनाद जोसी चाळवीत जाणे म्हणोन तरी जाब सरंजाम बा॥ हुजर्ती ता॥ कारकीर्दी बा॥ बुऱ्हान निजामस्या चालिले असेली तेणेप्रमाणे चाळवीजे +मोर्तब सुदु

तसवीस व फितरती होऊन रयती बहुत खराबवजाह जाली होती यावरी सन सीतामधें फिरंगीही तीन वेळा लुटून चौथे वेळे खून खराबी करून लुटून जाळून बद धरून नेले ते थास्तीवरून सौदागर व बाजे रयेती दाभोळ व रेवदंडा व बाजे जागा जागा जाऊन राहिले आहेती तरी बदल मामुरी

| | |
|---|---|
| चाकरी ता॥ सन सीत | आजीतागाइत पे- |
| व हाल गैराहा माह | सजीं हरयेक गुन्हो |
| नाही फिरंगी सन | केला असेली तो |
| खमस व सन सीत | माफ करणे |
| माफ करणे | |

येसा कौलु मऱ्हामती जालिया रयेती येऊन मामुरी होईल म्हणोन तरी जाब सरंजाम

जकाती हिंदु वानी माहालहाये मामले मजकूर साल मजकुराकारणें रामाजी श्रीपाजी प्रभु यासि माहालाहून इस्तावेयानी हुजारती दिधले आहे कौल मामलाचा आहे तरी बा॥ कौलु मामलाप्रमाणे पाळणे जादती तसवीस न लावणे त्यासि अव्वाहिदा कौलु मऱ्हामती करणें म्हणोन तरी जाब सरंजाम माहाली कारकून खातीरेसी आणौन दिवाण तरफ पाहोन सरंजाम देवणे+ मोर्तब सुदु

चेउलीचे क्षेत्री रेवदंडियासि जाऊन राहिले आहेती त्यासि तेथे जकाती पडती नाही चेउली जकाती ठारि ८॥ व पेठेस ठारि ६। दर मणे रेसमास कानु आहे चेउली कानु संगीन म्हणोन यावया काईस करिताती तरी बा॥ पेठा जकाती घेणे म्हणोन तरी जाब सरंजाम बदल मामुरी नव्या प्रजा येतील त्यासि जकाती साल मजकुराकारणे निमे कानूप्रमाणे घेणे दुसरे साली बा॥ पेठ कमाविस करणे तिसरे सालापासून बा॥ कानु कसबाप्रमाणे कमाविस करणे

किले खेडदुर्गास पेसजी मामला ईनलाख टके हजार अठाविस होते त्याबदल किलाचे नाजीर व सबनीस व नाईकवाडी ठाणा येऊन इतलाखाचे वराता घेती याकारितां किलाचे तरफेहून विलायतीस व रयेतीस तसवीस नव्हती हाली किलयासि मामलांचे गाव मुकासा दीधले आहेती तेणेकरी ता॥ किलेकरी संगीन होऊन विलायेतीमधें रयेतीस तसवीस देऊन रयेती खराब केले किलाचे तसविसेकरितां मामुरी

| | |
|---|---|
| 'यदूळ मामुरी बाकी ता। सन मीत माफ केली असे | यदूळ मामुरी ता। सन सवा माहे सौ-वालु माजी' जो गुन्हो केला असेली तो माफ केला असे |

प्रजा लोक जेथे गेलिया असतील तेथून आणौन मामूर कीजे + मोर्तब सुदु

खेतीवरी लोकांचे कर्ज मबलग आहे खेतो बेमवसर मफलीस आहे खाव-यासि नाही तरी कर्जदारांचे कर्ज सिसाला देवणें म्हणोन तरी जाब सरंजाम ज्यास मयसर नसेली त्यासि सिरली देऊन कर्जाची उगवणी करवीजे + मोर्तब सुदु

राई आगरमुरे तेथीळ माड कितीयेक मयेती जाले व कितीयेक ढोक जाले आहेती येणेकरितां वाडी खराब पडिली आहे कारकीर्दी सुरुखान खोताचे मुतालीक भाते धरून उगवणी करविली येणें करि[तां] खोत मजकूर खराब जाले आहे त्यासि राई मजकूरीची रकम संगीन दिधली न बचे रकम संगीन आहे तरी माहालीहून खार्तिरेसी आणौन संचणी करणें म्हणोन तरी जाब सरंजाम बेरीज संचणी मनसूरखान कदीम चालिलें आहे तेणेंप्रमाणें उगवणी करणें साळ मजकुराकारणें प्रभावली करणें ज्यादती होईल ते जमा करणें मुकासा होईल नुकसान ते मजुरा देणें येणेप्रमाणें उगवणी करणें +मोर्तब सुदु

नव्हे तरी पेसजी जैसा ठाणाहून हतलास देत होते तेणेंप्रमाणे देवणे मुकासा गाव आहेती ते दुरी करणे म्हणोन तरी जाब सरंजाम ये बाबे हुजुरून माहालासी फर्मान सादर केला आहे जैसी कदीम कमीवास होत होती तैसी होईल +मोर्तब सुदु

डोगरीच्या राई रकम संगीन आणि तेथीळ माडें होती ती मयती जालीं व कितेक फिरंगी तोडिली याकरितां त्या राईचे रकमेसी जागा नाही राई खराब आहेती तरी तेथील संचणी करीत जाउ जे संचणी होत जाईल तेणेंप्रमाणें उगवणी करीत जाऊन म्हणोन तरी जाब सरंजाम माहाली कारकून व देसक जाऊन राईची संचणी करतील तेणें प्रमाणें मजुरा देणें + मोर्तब सुदु

+ निराळें अक्षर.

सदरहूप्रमाणें कमाविस व पाळणुक कीजे ज्यादती तसविस न दीजे जागाजागा कुले गेली असतील ते आणोन कीर्दी मामुरी कीजे तकरार फिर्यादी येऊ नेदीजे तालीक घेऊन असेली फिराऊन दीजे [फा. मो.* ] मोर्तब सुदु

रुजु मुश्रीफ रुजु सुरुनिवीस रुजु सुदु

तेरीख १२ माहे सौवाल सुमस असर व अलफ

पा मिर्जा अबदुल फते.

[ कागदामागें*]—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ली | ली | ली | ली | लि |
| सचा सुदु | तालिक सुदु | | सबन सुदु | सबन सुदु |
| मुश्रीफ | दफ्तर खास | | न्याबनी | सुरुनिवीस |
| चार सुदु | चार सुदु | चार सुदु | चारु सुद | चारु सुदु |
| | | | | तालिक सुदु |

[ कागदामागें जोडांवर चार जागी फार्सी शिक्के* ]

---

ले. २२ } { श. १५२८ फाल्गुन शु. ९<br>इ. १६०७ फेब्रु. २५

तालीक

दं ठाणदार* व कारकुनानी व देसाई व अदिकारियानी मामले मुर्तजाबाद उर्फ चेउल मालुम दानद सुा सन सबा अलफ सबाजी नागोजी देसाई व कुलकरणी मामले मजकूर याची मिरास याचे हवाला केली असे यापासून देसाई व कुलकरणाचे काम घेत जाइजे याच्या वाडिया व सेते सिलोतरि साळाबाद चालिली असतील ते यासी चालविजे याचा चिराजर इस्कील करील त्यासी ताकीद करून मना करणे तालीक घेऊन असल फिराऊन दीजे तेरीख ८ माहे जिलकाद

[कागदामागें*]—मुकाबला कर्दे सुद था असल

---

ले. २३ } [ आरंभीं ९ ओळी फार्सी मजकूर* ] { श. १५३२ आषाढ व. १३<br>इ. १६१० जुलै ९

दं ठाणदार व कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसाई व अदिका[रिया]नी मामले मुर्तजाबाद उा चेउल मालुम दानद सुर सन इहीदे आसर अलफ बालाजी बिन देउजी पोतरा बाल प्रभु देसाई निमे मामले मजकूर हुजूर येउन मालुम केले जे आपला आजा बाल प्रभु निमे देसाईपण चालवित होता तो मईती जाला यावरी त्याचा चिराजर धोंड प्रभु चालवित होता तोही मईती जाला आपला बाप देउजी सरनाईक होता म्हणोनु आपले गोत्रज चालवित आहेती न निमे देसाईपणाचा हक

लाजिमा सालाबादप्रमाणें खानाती ये बाबे हुजूर रोसन होये मालुम जालें बालाजी देउजी पोतरा बाल प्रभु देसाई निमे मामले मजकूर याची मिरासि देसाईपण वडिल वडिलांपासुनु चालिले आहे तेणेंप्रमाणें याचे दुमाला कीजे व याचा हक्क लाजीमा व वाडिया व खारिया सालाबादप्रमाणें याचे दुमाला करून हरयेक दिवाणकाम याचे हाते घेत जाइजे हर कोण्ही लायेनी हरकती फिनवा करील यासि ताकीद कीजे तकरार फिर्यादी येऊं न दीजे तालिक घेउनु असेली फिराउनु दीजे · [ का.प. मो.*]

मोर्तब सुद रुजू मुर्श्राफ रुजू सुरुनिवीस.
तेरीख २६ माहे रबिलाखर
पा खान मुगादखान

---

ले. २४ } { श. १५३३ चैत्र वै. १२
{ इ. १६११ मार्च ३१

ई कौलनामे अज दिवाण मामले मुर्तजाबाद उरुफ चेउल ताहा सखाजी व नाउजी नागोजी देसाई व देसकुलकर्णी मामले मजकुरु [ खोत ] मौजे शिराड तर्फ मजकूर सु॥ इसने असर व अलफ दर कौलनामा [ ये ] साजे तुम्ही ठाणा मामले मजकुरी मालूम केले की मौजे मजकूर सालाबाद[द]आपले वडिलापासुनु इजाबती चालिले आहे आणि आपले वडिलासी मौजे मजकूर खोतीही असे हाली हरकोण्ही मुकासाइ व तनखेदार व खोत......होतानी ते आपणासि खोती करूं देत नाही तरी मौजे ........बा संचणी कारि ११८६॥ आहे यासेरीज ... [ ज़ाजती ] बेरीज कारि ११३॥ कबूल आहे येकून लागी तेरा(से) रकम सालापासुनु देत जाइन आपणासि मौजे मजकूर खोती देणे म्हणोनु मालूम केले बराये मालुमाती खातीरेसि आणुनु कौलनामा सादर केला असे तुम्हास मौजे मजकुरु इजारती दिधले असे इा सन सलास ( अ )सर व अलफपासुनु दर हरसाल रकम महसूल व बाजे बाडी व सर्व · · व बावोडी लाजिमा व कारुक व पोते व असताना व लाजिमे छावणी येकून बरहुकूम करचा शहती कीजे कारि १३००८

बा संचणी बेरीज कारि ११८६॥ ज्याजती बरहुकुम हिसेबी [कारि] ११३॥

हसम रयेती--
आफ्त फितरती मजुरा असे चवचढाव माफ
मुकासाइ व इनामदार व तनखा चालिला
तरी हरसाल आपली खोती चालवणे म्हणोनु
तरी तुमची खोती चालउनु
जेणे कौले मौजे मजकुरी किर्दी मामुरी कीजे कोण्हे बाचे तालुक अंदेसा न कीजे
तेरीख २६ मोहरमु.

---

ले. २५ } [ काजीचा फार्शी अस्पष्ट शिक्का* ] नकल मुताबिक असल { श. १५३४ ज्येष्ठ शु. ११ इ. १६१२ जून १

दसखत बो। वेजे पाटेल बिन पोस पे। पाटेल कसबे खाडाले तो मजकूर मामले मुर्तजाबाद ऊर्फ चेऊल सु॥ सलास आसर व अलफ कारणे भैरो माहात्रा बिन अनंत माहात्रा वस्तीं आगर चेऊल यासि आपले आत्मसंतोसे खत फरोख्त लेहून दिधले येसे जे आपली मिरास पाटेलगी कसबे मजकूरपैकीं हे आपण तुम्हास फरोखत करून दिधली सबब आपले सिरी लोकांचे कर्ज बेमबलग जालें त्यास आपणास द्यावयास मवेसर नाही व कित्येक कर्जदारीं आपणास हैराण केले द्यावयास मवेसर नाही अंजी सबब आपले आत्मसंतोसे आपली पाटेलगी कसबे मजकूरची तुम्हास फरोख्त दिधली देखील वीर्ती वावेली फरोख्त दिधली याची किमत चौघचारी जाहाली लारी बसरी १००० येक हजार ते आपणास पावली सदरहु वतन कसबे मजकूर याचा हक्क लाजीमा कदीम आहे मुलुक सिरिस्तेमोजीब घेऊन भो[ग]-वटा तुम्ही आपले अवलाद अफलाद करणे आपणासी व आपले अवलाद व अफलादेसी निसबत नसे कोण्ही दगदावा करील तर आपण सोडऊन देऊन हे आपले खत फरोख्त सही [ फा. मो.* ] मुरत्तब शुद

[बाजूस मोकळ्या जागेत*] रीप नागर वेज पाटेल बिन पाो पाटेल कसबे खाडाले

[कागदामागें* ]

लारी बसरी १०००

साक्ष

रामाजी रंगानाथ देसाई तावजी नागोजी देसाई व देसकुलकर्णी मामले चेऊल व अदिकारी तो अस्टागर व तो खिराड मामले मजकूर साक्ष गोंद मा। मौजे कारले साक्ष हरी वर्तक मा। नागांव साक्ष काल माहात्रा मौजे [ लो ? ] हारे

सुडक ठाकूर अदिकारी साक्ष जोग मा। मौजे वेसवी साक्ष अर्ज मा। मौजे कुरुल साक्ष वीर मा। मौजे बेलकडें साक्ष कृष्ण पाा पाखारी वेजाली माहाल आगर चऊलें

छं ११ रविलखर—

---

ले. २६ } [ आरंभी फार्शी मजकूर व शिक्का* ] { श. १५३७ पौष व. २ इ. १६१५ डिसें. २७

तालिक

अज दिवाण मामले मुर्तजाबाद उरफ चेऊल ता। मुकामाई व माहातारे व मकवी

व प्रजा मौजे तलावली आचशेत तपे साडाले सुा सनि असर व अलफ भाउजी सुडक ठाकुरू अधिकारी मामले मजकूरू मालुम केले जे अपले सेत कदीम मिरास मौजे मजकुरी आहे त्याचा भोगवटा सालाबाद अपण करितो हालि मौजे मजकूरचे मुकासाई आपणाजवल महसूल मागताती तरी सालाबाद जैसे आपले वडिलापासून चालिले आसे तेण्हेप्रमाणे चालवणे नवी जिकीर न करणे होऊ ने दणे म्हणौन मालूम केले बराये मालुमाती खातीरेसि आणून खुर्दखत सादर केले असे भाउजी सुडक ठाकुरू अदिकारी मामले मजा। याचे सेत कदीम मिरासी मौजे मजकुरी आहे त्याचा महसूल व बाजे बाब सालाबाद अदिकारी मजा मना (?) भोगवटा करितो तेण्हेप्रमाणे चालवीजे नवी जिकीर होऊ न दीजे याचे वडिल वडिलापासून जैसे चालिले आहे तेण्हेप्रमाणे याचे दुमाला कीजे [फा. अक्षरं*]

[कागदामार्गे*] तेरीख १६ जिल्हेज

बारसेताचे फरमाना मुकाबला करद सुद

---

ले. २७ } ता। { श. १५३८ अधिक आश्विन शु. १५ इ. १६१६ सप्टें. १५

अज दिवाण मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल हवाले आगा हाजी याकुब इस्तबोली हवालदार सा। तलकोकण व मामले मजकुरू खत फरोख्त बाो रई-वास फिरंगी साो कोट रेवदांडे नजीक चेऊल बाा वाडी महादेभट वाडी गुम पाा तुडाल व भाट बाबती बाइया पाा मोखव बागाईत आगर चेऊल मामले मजकुरू सुाा सन सबा असर व अलफ कारणे दिवाण मामले मजकुरी आपण आपले खुसीन सदरहु वाडी गुम देखील भाट बाइया याचे फरोख्तखत लेहोनु दिधले असे सदरहु वाडी गुम देखील भाट बाइया देखील जल स्थल व झाड व माड व बावी सगसगी व बाजे बावी कुली तमाम चहुहदासी फरोख्त केले असे आता सदरहु वाडी गुम व भाट देखील बावी सगसगी व बाजे बावी व झाड व माड व जलस्थल यासि आपणासि व आपले औलाद व अफलादेसी निसबती नाही तुम्ही सुखे कमावीस कीजे व कनबे व तहकुब ? ने कागद व संनेसे ? व आणीक जे कागद फिरंगी व हेदवी सदरहु वाडी व भाट याचे आपणाजवली असतील ते व बाजे हरकोण्हा फिरंगिया-जवली असतील तेही कुली तमाम रद्द असती तुमसी निसबती नाही व वाडी गुमाचा फर्मान आपणाजवली होता तोही आपण तुम्हापासि दिधला असे आता पेस्तर वाडी गुम व भाट देखील बावी सगसगी व बाजे बावी व झाड व माड व जल स्थल देखील कुली आपणासि येके जरयासि निसबती नाही व हरकोणी फिरंगी उभा राहोनु घसदावा करील तो आपण आणि आपण तो घसदावा सोडउनु देणे तुमसी जिमा नाही आता

सद्रहु वाडी व भाट देखील वावी संगसगी व बाजे वावी व झाड व माड व जलस्थल कुली याचे परमोल १ प्रमाणे आपण खुसी होउनु किमती कबूल करुनु खत फरोख्त लेहोनु दिधले असे आपणासि किमती पावली हे खत फरोख्त सहीं किमती मुटी द्राज लारी पंधरासे रास १५००८

गोही[1]

तेरीख १२ माहे रमजान उरुफ भादवा[2]

---

ले. २८ } [ आरंभीं फार्शी शिक्का, मजकूर व पोर्तुगीज सही* ] { श. १५३९ माघ व. १० इ. १६१८ फेब्रु. १०

अज दिवाण मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल बा हाजी याकुद इस्तबोली व सरसमत त तलकोकण व मामले मजा खत फरोख्त कर्दे जानतवार फिरंगी सो कोट रेवदांडे किल वाडी दुमीस पिरीस पेतर बा धाग कोलिया आगर नागावें पा [मो.जा*] सुा समान असर व अलफ कारणें दिवाण मामले मजा विकरीतखत लेहोनु दिधले येसे जे वाडी बा डमीस पिरिस पेतर बा धाग कोली आगर नागावे हे वाडी मजा आपण आपले आत्मसुखे फरोख्त केली असे झाडे व माड बारदार व रोपे व बाजे हरजिनसी झाडे व जलस्थल व वाव फले याची चहुहद्दासहित विकली असे आता वाडी मजाची कामावीस तुम्ही कीजे वाडी मजकुरीवर हरकोण्ही घसदावा फिरंगी करितील व डमीस पिरस पेतर करील तो आपण सोडउनु देणे व वाडी मजा फिरंगी कागद तहलाऊ १ न संतेस हेद्वी कागद व कतबे हरकोण्हा फिरंगिया-जवल व डमीस पीर मजा जवल असतील ते तमाम रद्द असती सद्रहु वाडी मजा चहुहद्दासहित जल व स्थल व झाड व माड व बाजे हरजिनसे झाडे व वावी फले यासह फरोख्त केली असे वाडी मजा किमती बा प्रमोल ? जाले ते आपण आपले खुसनि कबूल करुनु घेतलिया लारि मुटी द्राज नवसे पावली हे आपले खत् फरोख्त सहीं [ प. मो.*] ९००८

[ पो. सही* ] [ पो. सही* ]

फरसी आलविस देमग १ देलमी

---

१ खालीं नांवें नाहींत. २ येथें पहिला आर्यसिद्धांत वापरलेला दिसत नाहीं.

गोही

[ पो. सही* ]
दुमीग घोसाल
[ पो. सही* ]
दुमीस कडींदीस टिणजण ?
ताउजी नागोजी देसाई कुलकर्णी

[ पो. सही* ]
दुमीस कडदोस दुभासी
सत परणों साख ? पदाजी सेत्री...?

साक्षे

तेरीख २४ सफर

---

ले. २९ [ फार्शी शिक्का व मजकूर* ] { श. १५४०-४१ इ. १६१८-१९

चो नफरानी
आउजी सुतार बिन अर्जे सुतार
पा। दाखुल

दादू वारीक बिन तान वारीक
पा। मरुड
[ फांदीचें चित्र* ]

कान्हा वारीक बिन दादू वारीक
पा। मरुड
[ फांदीचें चित्र* ]

-- सुतार बिन तान सुतार
पा। दाखुल
[ फांदीचें चित्र* ]

घाग माहात्रा बिन राम माहात्रा
पा। मरुड

लखमनाक बिन वेजनाक
पा। दखुल
[ फांदीचें चित्र* ]

फार्शी दोन ओळी [ आडव्या* ]

जवर माहात्रा बिन भिक माहात्रा
पा। मरुड
[ फांदीचें चित्र* ]

सो...गाव नजीक कोट रेवदडा मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल सु॥ तिसा असर अलफ कारणे राजश्री ताउजी नागोजी प्रभु देसाई व कुलकर्णी व अदिकारी ता। अस्टागर व तपे सिराड मामले मजकूर यास आपले आत्मसुखे कतबा लेहून दिला येसाजे तीगावचे प्रासीताचे रोखे आपले न्यातीचे लोक तुमचे वडील आपाजी देसाई तागाईत कदीम घेऊन प्रासीत देत असो सालाबाद हे मिरास तुमचे वडिलाची सही आम्हास ठाउकी आहे कोरलाचे फितरती अलिकडे तुम्ही नादांन होतेस कोण्ही कमाविस करणार नव्हता तुमचे घरी म्हणौन खुडक ठाकूर अदिकारी तपे ६ हे कमाविस देसकपणाची करू लागले था. नागाईत रोखे प्रासीताचे देत हाली तुम्ही मिरासी कदीम आपल्या मिरासाचा···वि···तर सालमजकुरापासून प्रासीताचे रोखे तुमचे घेऊन प्रासीत देत जाणे···उजी अदिकारी यासी निसबत नाही यास हिला

हरकत करू अगर दुसरेयाचा रोखा घेऊन प्रीसीर्त चालऊ नर दिवाणचे गुन्हेगार व तुमचे मिरासेयाचा जाब करून हा कतबा सही [ फा. मो.* ]

गाही

मुलां हुसेन

---

ले. ३० } [ आरंभीं फार्शी मजकूर* ] { श. १५७५ पौष व.१ इ. १६२३ डिसें. २७

र्द देसक मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल मालुम दानद सुहुर सन अर्बा इशरेन व अलफ अर्दास छ १ माहे जिल्हेज इरसाल केळी रा छ १६ माहे मिा मजमुन सेरीकरास साहेबी लुगडी देउनु मांहाळास रवाना केलें कमीन माहाळास आळों साहेबी रजा फर्माविली जें हातरोखा नापीक आफ्त व बाकीदार खोताचा मामले माराचे कारकुनाजवळी मागुनु पाठउनु देतो म्हणौनु तरी माहाळी कारकून तहसिलेची ताकीद करितातो तरी रयेतीवरी नजर अनायेत करुनु माहाळी कारकुनास हुजती सादर करवया रजा होयें म्हणौनू बयाजवार लिहिले तरी तुम्हास हुजुरुनू माहाळास रवाना केलें तें वख्ती बाकीचा अमल सन सळासीचे आफ्ताचे बाबे हुकुमती रोखा सादर केला आहें तेणेंप्रमाणें तुम्ही माहाळी जाउनू तो हुकुमती रोखा कारकुनास दाखउनु काये सरंजामी केली कारकून बेरीजवार हुजतीचा जाब मागताती म्हणौनू लिहिले तरी पेसजीच हुकुमती रोखाची मजमु वाचीळी की नाही हे दखल होत नाही अगर तुम्हींही तेणें-प्रमाणे सरंजामीचा जाब काही लिहिला नाही याजे हेकयेती लिहिली तरी ता सन इहिदेचे बाकीचे बाबे व सालमजकुरीचे सळासीचे आफताचे बाबे खोज दिलावरा-स हुकुमती रोखा सादर आहे तेणेंप्रमाणे सरंजामी करुनु बयाजवार खबर लिहिणें जाब सादर होईल तेणेंप्रमाणें अमल कीजे रयेतीस तकवा दिलदारी देउनु कीर्दी मामुरी कीजे तुम्हास हुजुरुनु मामुरीचे बाबे पंद फर्माविला आहे तेणेंप्रमाणे सरंजामी न करिता तुम्ही जाणा महालास जाउनु हुजुरील पंद विसरोनु जाल आखेर मामुरी न होतें. वख्तीची आपली खेरोती···असणे व सन अर्चाकारणे बरसात बरवा पडिला नाही याकरिता तमाम रयेती व खोत बहुत बेदिल होउनु दिलगीर आहेत म्हणोनु लिहिले तरी बरसकाळाही बरवा मोईन पाहिजे येसा पडिला आहे म्हणौनु खबरा येनातो कैफयती लिहिणे दुरुस्त नाही मातल [ फा. वा. मो.* ]

रुजु सुरुनिवीस

तेरीख १७ माहे रबिलावल

[ कागदामागें* ] माहे रबिलावल सद

बारु सुद बारु सुद बारु सुद नालिक सुद

पेवस्ता छ १५ माहे रबिलाखर

---

ले ३१ } [ एक ओळ फार्शी मजकूर* ] { श. १५४६ पौष व. ७
इ. १६२४ डिसें. २३

इ कौलू दादे अजराखाने खुा सैद अजम सेख माहामद कळबलाई खोतु महाल सासवने तपे आठागरु मामले मुर्तजाबाद उरुफ चेउल ता ताउजी नागोजी देसाई व कुलकरणी मामले मजकुरु व अदिकारी तपे आठागरु व तपे खिराड सिलोतरी नउदरवाडी ही वाडी व सेत राजमला माहाल मजकुरु सुा खमस इसरीन अळफ दादे कौलनामा यैसाजे सदरहु नउदरवाडी मजकुरु व सेत मजकुरु तुमचे कदीम सिलोतर आहे याचा सिलोतरी महसूल कदीम सालाबाज महाल मजकुरु खाली उगवणी करिता लारी ८०

नउदरवाडी बीघोड लारी ५० सेत राजमळा लारी ३०

येण्हेचप्रमाणे माहाल मजकुरी दर हरसाल देत जाइजे याखेरीज पटिया मामले मजकुरु व महाल मजकुरु व अजाजीत रा खास व मामले मजकुरु व माहाल मजकुरु व वेठी बेगार व जाबत फर्मास व हरयेक बाब सालाबाज निसबती नाही तेण्हेचप्रमाणे तसवीस न लगे व वाडी मजकुरी अनाडी व वाढिवल वसतील त्यासी हरयेक बाबे सालाबाज निसबती नाही तेण्हेचप्रमाणे तसवीस न लगे व बैल व खुलगे नउदराकारणे व सेताकारणे याल त्यास कारुक सिगोठीची निसबती नाही तेण्हेचप्रमाणे तसवीस न लगे येण्हे कौले तुम्ही आपले औलाद अफलाद वाडी नउदर मजकुरी व सेत मजकुरी किर्दी मामुरी सुखे कीजे कोण्हे बाबे तालुक अंदेसा न कीजे [ फार्शी अक्षरे* ]

तेरीख २२ रबिलौवल

---

ले. ३२ } [एक ओळ फार्शी मजकूर*] { श. १५४७ आषाढ व. ७
इ. १६२५ जुलै. १६

तालिक

इ ताउजी नागोजी देसाई व देसकुलकरणी मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल मालूम दानद सुा सीत इशरीन व अलफ अर्दास छ २४ माहे रमजानु हरसाल केली रा छ १५ माहे सौवाल मजमून मौजे खिराड तपे मजकूर बेरीज लारि १३००

बीतपसील

कदीम रकम लारी ११८६॥०
ज्यादती चड कारकीर्दी आपाजी चंद्रस मजमुदार माजि लारी ११३।०

........चादुर हवालदार···व गोंदजी विस्वनाथ मजुमदार पेसजी कमीनास सदरहु बेरीजप्रमाणे आपणास इजारती दिधली यावरी कमीने मौजे मजकुरी कर्जवाम

देउनु मामुरी केली तागाईत सालमजकुरु रकमप्रमाणें उगवणी केली उगवणी करीत असतां मौजे मजकुरु कदीम मिरासी इसावती पटिया पालक देसकुलकरणपण आहे म्हणौनु पिढी दरपिढी कदीम चालिला असोनु साल मजकुराकारणें खोज इब्न अली मेखानी सौदागर बंदर मजकुरु येणे ल्हइनी निजवती नसता सिदी अंबर हवालदार संमत मांजि यानजीक येउनु गलचला करुनु बरजोरे हुकुम करुनु मौजे मजकुरु सन सीताकारणें इजारती केली व मौजे मजकुरींची रयेती खोज मा इलेवर राजी नाही तेही अर्जदास्त लिहिली आहे तेही साहेबांचे बंदगीस पाठविली असे येसे असोनु कमीनाचे सिरीहून खोती काढुनु खोज मा इलेची रया राखोनु मौजे मजकूरची जफ्त-चिठी दिधली आहे मौजे मजकुरावरी तुटीचा गांव मौजे तलावली आबसेत उचल घातला होता तों अमानती राहिला व कमीनांचे दिमतीस आणीक देहे तुटीचे इजारती आहेती तेथें खराबा व नुकसान तूट मबलगा देणे पडते तेथें संचर्णास दिल घालावया उमेद…नाही बेउमेद जालो आहे ……………………………

व कमीनास देसाई व कुलकरणपण व आदिकार तपे आठागर व तपे झिराड मामले मजकुरु जैसे कमीनाचे वडील चालवित होते तेणेचप्रमाणें चालवितो म्हणौनु तावार लिहिले तरी हुजुरुनु रयेती राजी नाही म्हणौनु तुझी खोती तुज करार केली असे लावणी उगवणीचे कामास तकसीर न करणें दरीबाब समतेंचे कारकुनासही लिहिले असे [ फा. ब. मो.* ]

तेरीख २० सौवाल पौ छ १३ जिल्हेज

बा असल मुकाबला खुद

---

लें. ३३ } [ डावे अंगास मलिकंबरचा फार्शी शिक्का* ] { श. १५४८ पू. इ. १६२६ पू.

दं देसाई व अधिकारी व माकदम व सेटे व चौधरी व माहाजन मामले मुर्तजा-बाद उर [फ*]बेऊल मा अदा सलाम मकसूद अर्जदास्त [मो.जा.*] जिल्हेज हरसाल केली रा छ माहे मिा तेथे मजमून आपला हाल हवाल तपासिलवार लिहिला तमाम रोशन जाला दरीबाब जनाब खोजे बाहिराम व तिमाजी पंडित मजमुदार व आपाजी पंत यासी कागद लिहिले असे तुम्ही आपला खातिर जमा करुनु रयतीचा दिलासा करने मामुरी करणे सालाबाद अमल चालिला असेल तेसा चालविनीक तुम्ही काहीं मुलाहिजा न धरने मामुरीस तकसीर न करणे [ बा. फा. मो* ]

[ कागदाभार्गे* ] तेरीख ४ मोहरम.

ले. ३४ } [ १ अष्टकोनी व १ गोल असे फार्शी शिके व मजकूर* ] { श. १५४८ : माघ व. १ / इ. १६२७ जाने. २२

दं देसक व सेटिये व चौधरी व महाजन व मोकदम व मोख्तसर रयती मामले मुर्तजाबाद उा चेऊल माळुम दानद सुा सबा इसरीन व अलफ अर्दास छ ११ साबानु इा केली रा छ २ रमजा(न) मा साहेबी फर्मान फार्सी बिनाम सा हबसखान हवाळदार तलकोकण व खोजगी फडक ठाणेदार व कारकून व देसमुख व अदिकारी यारिया… तेथे रजान नवे भूत बाजे व हिंदुवानी सर्ती औरताचे बाबे रजा की रयेती हिंदु लोक जागा जागाहून मामुरी करून आपला महजब कदीम देउले आहेती तेथे खिजमती करून पुजा करून आपला महजब चालउनु साहेबास दुवा करितात म्हणोनु बयाजवार लिहिले तरी ये बाबे कारकुनास व हबसखान सरसमत त्याम फर्मान हाली सादर केला आहे तेणेप्रमाणे अमल करून सालाबाद गहदम ता सन सीत कारकीर्दी मा अंबर जैसे चालिले असेली तेणेप्रमाणे अमल कीजे नवा अमल न कीजे [ चौ. फा. मो.*] मोर्तबसुद

तेरिख १५ माहे जमादिलावल ?

नालीक सुद चारु सुदु चारु सुदु [ कांहीं अस्पष्ट शेरे* ]

---

ले. ३५ } [ फार्शी शिक्का* ] { श. १५५३ वैशाख शु. २ / इ. १६३१ एप्रिल २३

ई कौलनामे अज दिवाण मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल ता

माहद… देसाई कृष्णाजी सुडक ठाकूर अधिकारी ताउजी नागोजी देसाई व कुलकरणी

मामले मजकुर सुा इहिदे सलासीन व अलफ दादे कौल यैसाजे तुमचे बाबे सयाजी चाक[र]रा खास माळुम केले जे पेसजी गनीम राजे व दलवी येदिलशाही येउनु रयेतीस तसवीस दिधली व पटी करून घेतली यावरी सा दसबे सरळस्कर येऊनु गनीमास गोसमाल देउनु माहालास आले तेही पटी करून घेतली हे सक देसकास व रयेतीस पडिली म्हणौनु सदरहु येक किणारा जाले आहेती यास कौल मन्हामती करणे जे तुम्ही खातिरजमा राखोनु येऊन रयेतीचा दिलासा करून संचणी मामुरी करणे तुम्हास येक जरेयाची तसवीस लागो नेदु तुमचा हक लाजिमा व इसाबती व ब सेते व वाटेली व तैनाती सालाबाद भोगवटा तसरुफाती ता॥ साळगुदस्ता चालिले असे [ल तेणे]प्रमाणे चालउनु ज्या तसवीस लागो नेदु म्हणौनु कौल मन्हामती … कबीहाळ होउनु येउनु संचणी मामुरी करितीळ म्हणौनु माळुम के[ ले ब ] राये

मालुमाती खातीरेस आणौनु कौलनामा सादर केला असे तुम्ही खातिरजमा राखोनु येउनु रयेतीचा दिलासा करून संचणी मामुरी कीजे तुमचा हक्क लाजिमा व इसाबती व खेते व वाटेली व तैनाती सालाबाद ता। साल गुदस्ता चालिले असेल तेणेप्रमाणे भोगवटा तसरुफाती करीत जाइजे तुम्हास येक जरेयाची तसवीस ल्यागो नेदु तुम्ही कर्वाहाल होउनु यैइजे कोण्हे बाचे ताळुक अदेसा न कीजे मोर्तब [फा. अस्पष्ट मो.*]

[ कागदामार्गे* ] तेरीख १ माहे सौवालु
सौवालु

---

ले. ३६ } [ १ फार्शी शिक्का व मजकूर* ] { श. १५५८ ज्येष्ठ शु. १३
{ इ. १६३६ जून ६

श्री साळिवांन सके १५५८ धाता नाम सवंसरे जेस्ठ सूर्ध त्रयोदसी सोमे तादिन खत विकरीत बेस्मी नारोबा गणोबा बरवा सेकीन माहाल केहीम तपे आठागरु मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल मु॥ सन सीत तळासीन व अळफ कारणे आपाजी ताउजी देसाई व देसकुळकर्णी मामले मजकुरु व अदिकारी तपे आठागर व तपे खिराड यासि आपण आपलेनी आत्मखुसे खत विकरीत लेहोनु दिधळे येसे जे आपळी मिळकती बी ता।

| | | | |
|---|---|---|---|
| वाडी करदीळ किता येक १ | मळा वरीसभाट | मळा लाणा बा। | उरमळ बा। |
| याच्या हदा बीता। | बा। माहातारे येक १ | बेड म्हात्रा येक १ | लखम म्हात्रा |
| पूर्वे हद निमकागर | दक्षेणे हद वरनमला | पसीमे हद मले- | येक १ |
| | बा। वर्तक माहातारे | खंड बा। हरबा | उतरे हद |
| | | दातार निमे पासुनु | राजगोवण |
| | | सर दे तहद समुद्र | |

या चहु हदासी जमीन जल व स्थळ माड व सुपारी व ताड व बाजे हरजिनसी झाडे व राहाट व राहाटवडासिहित वाडी व मळे मजकुरु तौर रकबद आपण आपळे आत्मखुसे तुम्हास विकत दिधळे असे वाडी मजकुरु देखीळ मळे मजकुरु याचि किमती लारि २०१ दोनसे येक जाली ते आपणास रोख पावली असे आता वाडी व मळे मजकुरु याचा भोगवटा व तसरुफती तुम्ही आपळे पुत्रपौत्री कीजे आपणास व आपले पुत्रपौत्री वाडी व मळे मजकुरासी अर्थाअर्थी काही सनमध नाही यावरी हरकोण्ही दगादावा करील तो आपण सोडउनु देणे वाडी मजकूरचे निसबती कुल-वाडी बारस[त] बु॥ आहे ते देखील भाट व भोमे तुम्ही कमावीस करणे व सीळोतरी महथळ व बाजे वतु व सर्व सारे व राई कंदार व भुतफरोसी व कुलबाब व कुल-कानू व पटी पायेपोसी व ना॥ पटी व पटिया रा॥ .... लास व समत व मामले

....[म]जकुर मिळोनु मोईन मोकदर हुडा कुळबाब कुळकानु मिळोनु वाडी देणे आहे क्वारि बावन ५२८ बीता [ फार्सी शेरा* ]

| | | | |
|---|---|---|---|
| वाडी करदील महसूल व बाजे वतु क्वारि २०८० | बारसेत महसूल व बाजे वतु | राई व कंदार क्वारि ६ | तांढ क्वारि २ |
| | क्वारि ८ | | |
| पटी पायेपोसी व सरनाजरिपटी व सेतसारा व शावणी व कापुरपाईक व बोसार-टका व पटिया रा। साने सास व समत व मामळे मजकूर व महाल मजकूर व भूतफरोसी कुलबाब मस्ता क्वारि १५ | जेवा क्वारि १८० | | |

येणेप्रमाणे साळिना माहाल मजकुरी आहे ते सन सबापासुनु सदरहुप्रमाणें तुम्ही देत जाणे आपणास निसबती नाही व जुनी सते वाडी व मळे भाटीची होती ती तुम्हाजवळी दिधळी असती हे आपले सत विकरीन सही किमती सद्रहु पावली असे [फार्शी शेरा* ] क्वारि २०१८

गोही

| | | |
|---|---|---|
| माहाळ थळ | | माहाल केहीम |
| बाग दुर्गो माहाल थळ | | येस काटिया |
| | माहाद् मात्रा बेड म्हात्रा | केसोबा बोडस |
| बि दस्तुर कृस्णाजी कमाजी | माहाल थळ | दादं कुाटिया |
| कुलकर्णी माहाल मजकुरु | | तुक माह्मतारा बिन |
| | | भीक माहात्रा |
| | | तान राउल |
| भानजी श्रीपती सहस्रबुध्य | | गण माहात्रा वाग माहाम्रा |
| [बालबोध सही *] | | बाबा बका सोज बिन कुरज |
| सतप्रमाणे साक्ष बाब जोइसी भीक | | माहाल आल्हास |
| जोइसी पा। भोरसी | | गोपाल वर्तक जस वर्तक |
| | | माहाल मजकुर |

खतप्रमाणे साखे मदनजी दामाजी प्रभु

येस राणा माहाल आम्हास

खत प्रमाण सा। यापूजी तान्हाजी प्रभु

[ कांहीं खुणा व खालीं* ]

खतप्रमाणे साक्ष से सैद चाद बीन

सैद मुर्तजा मला। पारसी निसाण आहे

[ उजवीकडे समासांत* ] नारोबा गणोबा बरवा सो केहीम

---

[1] ले. ३७ [ फार्शी मजकूर*] { श. १५६०-६१ / इ. १६३८-३९ }

फरमान हुमायूं शरफ सुदुर याफ बजानीब आमिलान हाल व येसतेकबाल व देसायां मआमिले मुरतजाबाद उर्फ चेऊल आंकी शुहुर सं तिसअ सलासीन व अलफ दरींविला कुशनाजी व फरजंदां खुरुग थाकूर ( अद्कारी ) मआमिले मजकूर व दरगाह मुअल्ला ( मधे अर्ज केले की ) इलतिमास केले की हक व लवाजिमा व इसापत व पान आपले जैसा की बीच कारकीरद निजामशाह व मलिकअंबर च्यालला आहे उसमोजीब नजर बखशीश फरमाऊन फरमान अशरफ ( कुरपाचा होये ) आतीफ होवे याकरितां अर्ज ( त्याचा मधे ) वो बीच खातीर मुबारक ( आअला आनून ) बुलंद हक व लवाजिमा व इसापत व पान कुशनाजी व फरजंद खुरुग थाकूर अद्कारी ( मजकूर जेसे की मधे कारकीरद निजामशाह मलिकंबर ) च्यालला आहे उस मोजीब ( त्या परमाने ) मुकरर केला आहे च्याता आहे की मवाफीक लिखें पिछा करें व जारी राखें हरसाल उजर फरमान नवा न करून साल बसाल हमीं फरमान ज्यारी करें व उतार लेहून घेऊन असल फरमान फिरून देवें ताकीद बहुर्जे उपर हुकूम फरमान अशरफ जावें ताहरीरून फी तारीख बरची सं तोच

परवानगी हुजूर अशरफ अकदस आला

[2] ले. ३८ हू { श. १५६३ श्रावण शु. ५ / इ. १६४१ आगस्ट १ }

परवाना बादशा निजामशाहा बदर चेवल हे जागा रणदुलाखान देवान हाकीम हुजरून ठेविला होता त्याण्हे रणदुलाशाई ज्याहाज नवें बांधिले पडोसी कपितान कोट रेवदंडा येण्हे हैबत खाऊन नाखुश होऊन कोण्हे येक बातूनें खान मशारनिलेस कमजोर करावें ऐसी अदावत दिलांत आणून ज्याहाजास व मशारनुलेस इजा देऊन

---

१ कंसांतील मजकूर याच कागदाच्या एका नकलेवरून घेतला आहे.

२ पूर्ण तारीख एका फार्शी फर्मानावरून घेतली आहे.

आर्जुमंद् करावें ऐसा इरादा धरून मशार[नि*]ले खानाचे घोडे रेवदंडचे खाडीमधून बंदर चेउलास आणीत असतां जकातीचा तसादिया लाविला व हराजिनस खाडी-मधून तारुं तराडी येतांत त्यास तसादिया लाविला बाजद् मामिले मजकुरींहून खान मशारनिले येही हुजूर फिर्याद् वाका जाहीर केला त्यावरून जजिरे गोवे हे जागां हुजूर बा[द*]शाईहून विकील ठेविला होता बनाम आगा महमद् रजा यास परवाना सादर केला ऐसा जे जजिरे गोवेयास विजुरेयास ताकीद करून रेवदंडे येथील कपितानास हुकूम करणे ऐसा जे रेवदंडे येथील खाडीमधून सरकारी मालमता येईल त्यास मुजाईम न होणें मुजाईम जाहालियावर हुजरून फर्गस्तानावर हाला होऊन खराबी-खालीं आणिले जाईल हे वजा त्यास माकूल बहुत वजा करणे ताकीद समजणे सु॥ इहिदे आर्बैन अलफ

---

[1]ले. ३९ [ फा. शि. व १५ ओळी फा. म.* ] { श. १५६३ श्रावण शु. ९ / इ. १६४१ आगस्ट ५ }

ई येतमादी आपाजी ताउजी देसाई व देसकुलकर्णी मामले व अधिकारी तपे आठागर व तपे खिराड मामले पादस्याहबाद उर्फ चेऊलरा येलाम ऊंके अर्जदास्त पाठविले मजमून रोशन जाहले आपुले तश्रीफ व पान निसबत देसाई व देस-कुलकर्णीचे बाबे लिहिले होते तरी ते मिलाले बनाम कारकुनानी मामले मजकूर सादीर आहे तेणेंप्रमाणें तुमचे तश्रीफ वा पान रवा होईल दिगर अर्जदास्त दरबाब नौयाग खुद लिहिले होते तरी ते अर्जदास्त येनजिनस नजद शकराजी पडित खास-निवीस नूरचस्मी दिले असे तेथें आलेवरी अहवाल खातीरेसी आणुनु कौलु सादीर करितील जाणिजे तुम्ही हरबाब आपुले खातीरजमा करून दर दौलतखोही दरगाह मसगूल असीजे ता तुमचे सराफराजी असे जाणिजे मोर्तब [ वा. फा मो. * ] तेरीख ७ माहे जमादिलौवल

खुर्दखत तश्रीफा

---

ले. ४० ता॥ { श. १५६५-६६ / इ. १६४३-४४ }

ई कौलनामा अज दिवाण मा॥ हजरती राजश्री शामजी सिवदेऊ सरहवा-लदार व कारकून मा॥ हाये सा॥ तलकोंकण ता॥ देसमुखानी व अदिकारीयानी व देस व सेटेयानी व माहाजनानी व चौघले व बाजे मोख्तासर खुदा पेठ रुस्तुमाबाद मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल बिदानद सुहुर सन आर्बा आर्बैन अलफ देसक मामले

---

१ पूर्ण तारीख फार्शी मजकुरावरून घेतली आहे.

मजकूर मालूम केलें जे साहेब सलामत माहालास आलेयावरी गडगानजीक जागा खूब देखोन मुकाम केला त्यावरी साहेबीं आपणास बोलाऊन रजा फर्माविली कीं जागा खूब आहे येथें पेठेची वसाहत करणे म्हणोन रजा फर्माविली त्यावरी आपण रयेतीचा दिलासा करून जागां जागां कौल देउनु साहेबांनजीक मोख्तासर खूब घेऊन आलों त्यांचा मुद्दा घेतां तेही मुद्दा लेहोन दिल्हा जे साहेबीं बारा सालाचा कौल मन्हामती केलियानी पेंठ मजकूर मामूर होईल व जहाजाची व बंदराची मामुरी आहे साहेबीं नजर इनायेत फुर्माऊन मकसूदप्रमाणे कौल मन्हामती केला पाहिजे म्हणउनी देसकी मालुम केलें बराये मालुमाती खातिरेसी आणून तुमचे मकसूदनामेप्रमाणे कलमाचें कलम सरंजाम केला असे बीतपसील.

पेठ मजकुरी बाजाराचे रोजीं हमशाई कर्यातीचे लोक बाजारास येतील बाजार मजकुरीं हरयेक जिनस खरीद करून नेतील त्यांस जकाती माफ करणें ता। कापडपटी पांच बाजे जिनस भूस तवर जकात माफ वजन मण ८१ तंवर करणे कर्यातीचे हम जकात माफ करणे शाई यकाल व उद्मी म्हणोन ज्याजती घाटे कोंकणचे बाजा- नेतील त्यास सवा रामधे हरयेक जिनस ई वजा करून खरीदी करितील बाकी जकाती घेणे त्यांसी सवाई जकाती माफ करणें म्हणोन तरी सदरहूप्रमाणे जकाती... असे ज्याजती तसवीस न लगे निपुत्रिक व गेर महसूल व सिंगोटी व बन्हाडटका औलाद व अफलादबरी माफ असे तसवसि नल[गे*]

बाजाराचे रोजीं चेऊलचे उद्मी लोक देखील आगर हरयेक जिनस खरीद करितील त्यांसी सवाई जकाती माफ करणें म्हणोन सवाई जकाती माफ असे.

रेवदंडाचे लोक बाजाराचे रोजीं हरयेक जिनस फरोख्त करावया आणितील त्यांस सवाई जकाती माफ करणे म्हणोन सवाई जकात माफ असे.

रेवदंडाचे लोक बाजाराचे दिवसीं हरयेक जिनस खरीदी करून रेवदंडियासी नेतील म्हणऊन तरी बा। कानुप्रमाणे जकाती घेऊन [ ज्याजती तसवीस *] न लगे.

पेठ मजकुरी कदीम वसारी आहेती यां......जकाती बरहुम कारकीर्दी मलिक अंबर

[ अपूर्ण* ]

---

ले. ४१ } [ आरंभीचा व डाव्या अंगचा असे २ शिक्के व अस्पष्ट मोर्तब*] { श. १५६६ श्रावण शु. १३ । इ. १६४४ आगस्ट ६

[ फार्सीत* ] कौलनामह बनाम आपाजी व महदाजी तानजी देसाई देसकुलकर्नी मुआमिलह मुर्तजाबाद उर्फ चेऊल शुहूर सनह खमस अर्बेन व अलफ बमू-

जय हिन्दवी अमल नुमायन्द तारीख १२ माह जमादिउस्सानी

अजरख्तखाने खुदायेवंद खान अलिशान खान अजम रुस्तुमे जमा खुलिद्याम दौलतहु बजानेब आपाजी व माहादजी ताउजी देसाई देस-कुलकरणी मामले मुर्तजाबाद उा चेऊल बिदानंद सु॥ खमस आरबैन अलफ तुम्ही हुजूर [अ*] र्दास पाठविली येकबयेक मालूम जाली तरी तुम्ही दाईम दिवाण नफर आहा तुम्हापासुनु पेसजीपासुनु दिवाण नफरास तकसीर जाली नाहीं पेस्तरही दिल जाहासी रात्री दिवस मामले मजकुरीची लावणी सचणी उगवणीस तकसीर न करणे जितकी दौलतख्वाही करून दिवाण काम कराळ तेणेकरून तुमची सरफराजी आहे कोण्हे बाबे तालुक अदेशा न करितां बेमुलाहिजा दिवाणकाम करीत जाणें दिवाणकामास व दौलतखोहीस व लावणीस हर कोण्हाचा मुलाहिजा न करणे ये बाबे कौल असे [नि*] पा॥ हुजुर [नि*] मोर्तब सुद [फा. शेरा व मो.*] रुजु दफतर खास

रुजु शुरुनिवीस

[कागदामागें*] तेरीख १२ माहे जमादिलाखर

जमादिलाखर

---

ले. ४२ [फा. शि.*] श. १५६६ पौष व. ९ इ. १६४५ जाने. ११

ई कौलुनामे अज दिवाण समत सैद व महमद सरहवालदार माहालानिहाये ता॥ आपाजी ताउजी देसाई व देसकुलकर्णी मामले मुर्तजाबाद उा चेऊल व अदि-कारी तपे आठागर व तपे खिराड मामले मजकुर सु॥ खमस आरबैन अलफ दादे कौलुनामा येसाजे तुम्हास हुजूर बोलाऊन फर्माविले की हुजुरून रजा सादर आहे जे मिरासदारापासून सिस्त करून घेऊन रसद पाठवणे तरी तुम्ही हजरती साहेबास मुकासा मामले मजकुर आर्जानी ज्ाहाला आहे तुम्ही हुजूर जाऊन भेटोन कांहीं तोफा भेटविला नाही तरी तोफा दिधला पाहिजे म्हणौनु फर्माविले यावरी तुम्ही अर्जे केला की आपण सेरीकर नफर आहो जे खातो ते आपले आहे ते साहेबाचे आहे आपणासि बाजे मिरासदारासारिखा हक लाजिमा इसाबती नाहीं जे आहे ते लाबुद आहे त्यासी पेसकसी तोक व किताबती पडते व लिहिणेयाचे कामासी दोनी यारिदी लागताती त्यासि मुशाहिरा देणे लागते येण्हेकरून जो हक लाजिमा आहे पुरत नाही व चाकरीस रातादिवस हाजीर राहाणे लागते लुगडे कापडाचे इजतेसी राहिले पाहिजेत सदरहूप्रमाणें आपला अहवाल आहे येसियामधें तोफियाची रजा फर्माविली तरी आपले जितरबासारिखे बेरीज देखील मिरासपटि घेतली पाहिजे यावरी कतखुदा केला येही दरम्याने पडोन तुम्हास मोईन केली तेबदल तोफा देखील

मिरासपटी लारी १८५०० साडे अठरासे तुम्हास मोईन केली ते बदल तोफा देखिले सीस्त मिरासपटी तुमचे सिरी ठेविली असे सदरहु बेरिजेची उगवणी कीजे कोण्हेबाबे काही अदेसा न कीजे तुम्ही मिरासदार आहा संचणी मामुरीस तकसीर न कीजे मिरासपटीची अज बाबहा तसवीस न लगे येण्हे कौले कवीहाल होऊन कीर्दी मामुरी कीजे दर ई बाबे काही तालु [ क ] अदेसा न कीजे [ फा. मो.* ]

तेरीख २२ जिलकादी.

---

ले. ४३ [ फा. शि.* ] श. १५९७-९८ इ. १६७५-७६

ई कौलुनामा अज दिवाण माहालानिहाये हवाले सेख अबदुल [फते] हवालदार समत तलकोकण ता। देसमुखानी व आदिकारीयानी व देसकुलकर्णी व चौधरी व माहाजन व सोतानी व तमाम रयेत खलकुला लाहाणथोर कसबा व पेठा व माहाल आगर चेऊल तपे आठागर व देहाये कर्याती मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल सुा' सीत अबैन अलफ दादे कौलनामा यैसाजे तुम्हीं आपुला ( मक )सुदनामा पाठविला रा। छ २१ रबिलाखर मकसुदु······यैसाजे मामले मजकुरीची रवेस कानुकमाविस बर······कदीम कारकीर्दी निजामशाह दर जमाने मलिकअबर अजाजीत पटिया व मिरासदार पटिया व सादिलवार पटिया व गैर महसूल व निपुत्रिक व जुलुम ज्याजती व वेठी बेगारी व जाबती फर्मासी येक जरा सदरहु तसविजा लागलिया नाही याकरिता मामले मजकुरीची मामुरी जाली होती येण्हेकार[ता] मलिक अबरचा अेसाफ चौपातशाहीमध्ये जाला यावरी मलिक बफत जाले आणि तहवेली गलबले व फितरती जालिया व दुकाल काल पडिलियां धुंदमार जाली व कितेक रयेत परागदा जाली जागा जागा पर मळकास जाउनु कुल मुलुक खराब पडिला येकरोजाचे खावयास नाही यैसा हाल अहवाल जाला यावरी खुदाये तालाने रयेतीवरी मेहरेची नजर केली म्हणउनु मामले मजकुर हजरती बडेखान साहेबास मुकासा अर्जानीं जाला हजरतीं बडेखान साहेबीं मलिकंबरी रवेसप्रमाणे कौल देउनु सदरहु तसवसि लागो दिधली नाही साले चार ई॥ सन तिसा ता॥ इसने अर्बैन अलफ तेणेकरून रयेत जागा जागाहून परमुलुकहून येउनु कीर्दी मामुरी करून बंदर व कसबा व कर्याती मामूर होऊ लागलें व माहाली जे सरहवालदार व कारकून आले तेहीं कौल बरहुकुम पालनुक केली येणेंकरी [ ना* ]नामोश पातशाहीतलग जाहीर जाला यावरी रयेतीचे कम [ बेश ]······जें बडेखान साहेबु बफत जाले माहाली [ अपूर्ण* ]

ले. ४४ } [ आरंभीं बारा ओळी फा. म.* ] { श. १५६९ कार्तिक शु. ७
तालीक { इ. १६४७ ऑक्टो. २४

दर्वे कौलुनामे अज दिवाण मामले पादशाबाद उर्फ चेऊल ताहा बेस्मी सेटिये वा माहाजनानीं वा मोकादमान व उदमीयानी व आगरीयानी वा मडवी व माहतारे व रायानी व बाजे खुम सादेसी व परदेसी गुजर कसबा वा पेठ हुसेनाबाद व मुर्तजापूर वा विलायेती मामले मजकूर सुहुरसन समान आर्बैन अलर्फ दिल्हा कौलुनामा थैसाजे तुमचे बाबे देसकानी व कतखोदायानी हुजूर येऊंन इलतिमास केले जे दर मामले मजकूर सालाबाद वा मातकदम नि[पुत्रि*]क माफ असे याकरितां लोक ब खातिरजमा होते दरीवख्त जुजवी नि [ पुत्रि ] क जाहले ते हुजूर दिवाणीं जमा केले अजीसबब सादेसी वा परदेसी गु [ जर ] रयेत कसबा वा विलायेती बेतकवा जाहले असती तरी साहेबी नजर ... रयेत परदेसी वा मामुरीवरी देउनु जैसे सालाबाद व मातकदम [ निपु ] त्रिक माफ असे तैसे माफ फर्मावणे ता उदमी परदेसी खातरिज [मा] येउनु उदीम करतील वा रयेताचे शक तुटोन खातिरजमा करून कीर्दी मामुरी करतील म्हणौन बिनाबर इलतिमास देसक व कतखोदायानी खातीरेसी आणून सदके हजरती [ मो. जा. * ] आलंपन्हा निपुत्रिक बरनिसयती सालाबाद माफ केले असे खातिरजमा करून उदीम व कीर्दी मामुरी करून सुखे असीजे तुम्हासी दरीबाब कौलु असे [ फा. ष. मो* ].

[ कागदामागें* ] तेरीख ५ माहे सौवाल.

---

ले. ४५ } [ आरंभीं फा. शि. व म.* ] { श. १५७१ ज्येष्ठ व. ५.
{ इ. १६४९ मे २०

तालिक

ई अज दिवाण मामले पादशाबाद उर्फ चेऊल ताहरीर याफ्त बो। खोत व पाटेल व मोकादमान मौजे ढवर तपे खांडाले मामले मजकूर सुहुर सन तिसा आरबैन व अलफ चिदानद के कृष्णाजी खुडक ठाकूर अदिकारी मामले मजकूर इलतिमास केले जे आपणासी छत्री मरहामत बमोजीब मिसाल हजरती हुकूमतपन्हा [ मो. जा* ] साहेब दरसाल सन समान मुशाहिरा दर माहे लारी ५ येकुनु सालिना लारी ६० रवा असे यासी माहालीहून जागा मौजे मजकूर महसूल पेकी देविले आदा जाहाले नह[व्हे]ती साल मजकूर खोत मौजे मजकूर ताजा मिसाल उजूर करितो दरीबाब सरंजाम होणे म्हणौनु तर बदल मुशाहिरा छेत्रिया मरहामत कृष्णाजी आदिकारी मामले मजकूर दर माहे लारी ५ येकुनु सालिना लारी ६० साठी इ॥ अवल साल मुर्ग पैवस्तगी छ ९ माहे जमादिलोवलु त॥ सलक रोहिणी छ १९ माहे जमा-

दिलौवलु बा॥ महसूल साल मजकूर मौजे मजकूर मीर जुमले अजी जुमले बमोजिब साचिका साल गुदस्तां रवां बुद बर्दी मोजीब जारी दारंद तालिक घेउनु असली परतून दीजे तादानद [ ब. फा. मो:* ]

[ कागदामार्गे* ] तेरीख १७
माहे जमादिलौवलु
बा। असल मुकाबला सुद

---

ले. ४६ [ नवकोनी शि.* ] श. १५७५ भाद्रपद व. १ इ. १६५३ आगस्ट २९

ई कौलुनामे अज दिवाण मामले पातशाबाद उरुफ चेऊल ता। आपाजी व बालाजी ताउजी देसाई व देसकुळकरणी मामले मजकूर व आदिकारी तपे आठागर व तपे खिराड सु॥ आर्बा समसैन व अलफ दादे कौलुनामा येसाजे तुम्ही माळुम [ के ] ले जे आपली बेडयाची घरवस्ती मिरा…कदीम……सावे……… पाजी देसाई पा। अभिपूर बागाईत……हे वाडी कदीम आपले बडेयापासुनु पिढी दरपिढी पा…चालिले आहे पेसजी…याचे वख्ती माड व सुपारी व बाजे झाडे याची वाडी मजकूर मामुरी होती व बकाळ व ठाकुरी व अनाडी याचीही मामुरी होती त्याचे तळपद व ठाकूर व वेठ व बेगार वजाबत व फर्मास आपले बडेयासी पालक चालिले आहे प्रभावली माड व सुपारी पालक असे वाडी मजकुरीचे देणे कदीमपासुनू बाजे वतु व लाजिमा सुदां टके ५॥६

बाजे वतु टके ४॥८ लाजीमा रुके ०॥१०

दर लारीस टके ११९ येकून लारी ३॥११। येणेप्रमाणें देत असो या सेरीज पटी बाजे पटी व सरदेसमुख व नाजीर पटी व कानु पाटिया व अजाजीत पाटिया व सादिलवार पाटिया हुजरात व मामला कुल पालका चाळत असे ये बाबे दिवाणच्या हुजती व भोगवटे होते ते फिरंगियाचे फितरतीमधे कितेक जळोन व कितीयेक गुम जाले व फितरतीमधे वाडी मजकूरची झाडे माड व सुपारी तोडिली व आपले बडेयाचे घर होते …………………… तेही……आपले वालिदे वाडी मजकूर मामूर करावी तरी वालिद मजकूर ये कानदसी १ व वाडी मजकूर फिरंगियाचे सरहदेस आहे ते वख्ती फिरंगियाची जोरावारी बहुत होती अजी सबब वाडी मजकूरची मामुरी जाहाली नाही हाली साहेबाचे दौलतेकरून फिरंगियाची साहेबी व जोरावारी मामले मजकुरावरी करीत होते ते दूर जाहाले हाली आपण वाडी मजकूर मामूर करावयाची उमेद धरिनो तरी साहेबी मामुरीवरी नजर देऊन जैसे काही आपले बडेयासी पालक चालिले आहे तैसेच चालवावया कौल सादर जाहालेयावरी उमेदवार

होऊन वाडी मजकुरी माड व सुपारी व बाजे झाडे लावणे करून व बकाळ व ठाकुरी व अनाडी आणोन वाडीमजकूर मामूर करून म्हणौनु माळुम केले बराये माळमाती खातीरेसी आणोन तुम्हास कौल सादर केला असे वाडी मजकुरी माड व सुपारी व बाजे झाडे लावणे करणे माड व सुपारीचे प्रभावळीची तसवसि न लगे वें बकाळ व ठाकुरी व अनाडी आणौनु वसाहात करणे त्यासी तलपदाची वे वेठी बेगारी व जाबत व फर्मासी हरयेक बाबे तसवीस न लगे वाडी मजकूरचे कदीम दिवाण देणे मा। व बाजे वतु व लाजिमा टके ५॥६ दर ११९ येकून लारी ३॥ ११। साला-बाद उगवणी कीजे ज्याजती तसवीस ने ळगे व वाडी मजकुरीस कुल सदरहु पटिया कानु व अजाजीत पटिया व सादिलवार पटिया हुजराती व मामली पालक चालिले असेल तेण्हेप्रमाणें चालउनु ज्याजती येक जरा तसवीस न लगे येण्हे कौले वाडी मजकुरी कीर्द मामुरी करून औलाद व अफलाद भोगवटा कीजे कोण्हेबाबे अदेसा न कीजे मोर्तब. [ का. बदामी मो. * ]

[ कागदामार्गे* ] तेरीख १५ माहे शौवाल
शौवाल

---

ले. ४७ [ शि. मो. व शेरा* ] { श. १५७६ भाद्रपद व. १२
इ. १६५४ सप्टेंबर २७ }

दं अज दिवाण समत तलकोकण हवाले अलीखान बिरादर हवालदार बजानेबु कारकुनानीं मामले पातशाबाद उरुफ चेऊल चिदानद सु॥ खमस खमसैन अलफ आपाजि ताउजी देसाई व देसकुलकर्णी मामले मजकूर मालुम केले जे मौजे बागुले तपे पाळि कृष्णाजि माहादेऊ देसाई व आपणासि इसाबती आहे तेथील पटियाचा भोगवटा निमे आपण करितो निमे कृष्णाजी माहादेऊ देसाई करितो अमा खोती निसबतीन सारे गावाची कमावीस कृष्णाजी माहादेऊ देसाई करून दिवाण बेरीज झाडा करितो तरी मौजे मजकूर इसायती निमे आपली आहे व निमे कृष्णाजी माहादेऊ देसाई याची आहे पटियाचा भोगवटा हर दोजण निमे निमे करीत असो तरी साहेबी नजर इनायेती फर्माउनु निमे गाव इजारती आपणासि देववणे व निमे गाव कृष्णाजि माहादेऊ देसाई मजकुरास देववणे हर दोजण गांवीची कमावसि करून दिवाण देणे निमे निमे तकसीमप्रमाणें देउनु म्हणौउनु मालुम केले तरी मौजे मजकूर इसायती हरदो देसाई मजकुराची असे तेथील पटियांचा भोगवटा निमे निमे हरदो जणास चालत असेल तरी येकानीच सारा गाव इजारती करून कमावीस करणें काये माना असे तरी निमे गाव कृष्णाजि मजकुराचे हवाले इजारती करणे निमे गाव आपाजि देसाई याचे हवाले करणे हरदूजण निमे निमे कमावीस करितील

व दिवाण देणे हरदूजणापासुनु निमे निमे उगवणी करून घेणे ताळिक घेउनु असल सुर्दसत आपाजि मजकुराजवल फिरऊन देणे. [ फार्शी मोर्तब* ]

[ कागदामागें*. ] तेरीख २५ जिलकाद
बाा असल मुकाबला सुद

---

ले. ४८ [अरिंभीं १ ओळ फा. म.*] श. १५७७-७८ / इ. १६५५-५६

ताळिक

दे अज दिवाण समत तलकोंकण तर्फे पादशाबाद हवाले अलीखान बिरादर हवालदार वजानेबु कारकुनानी मामले पादशाबाद उरुफ चेऊल बिदानद सुाा सीत समसेन अलफ आपाजी ताउजी देसाई व देसकुलकर्णी मामले मजकुरु व अदिकारी तपे आठागरु व तपे खिराड मामले मजकूर समतेस आला होता यासि तश्रीफ येक देसा [इंया] चि व येक तश्रीफ देसकुलकरणाचि व यारिदी नि॥ [देशकुल]करणी येशा तश्रीफा दिधलिया यावरी माळुम केले जे…येथील अदिकार याचि तश्रीफ. आपणासि मन्हामती केलि…म्हणौनु माळुम केले बराये माळुमाती खातीरेस आणून [ आपाजी ता] उजी देसाई व देसकुलकरणी मामले मजकूर व अदिकारी [तपे अठा ] गरु व तपे खिराड यासि तश्रीफ रवेसप्रमाणे देसा[इया]ची व देसकुलकरणाची व यारिदी नि॥ देस कुलक…चालत आहे तेच रवेसीन हाली तश्रीफ सदरहु दिधली याव…हाली मन्हामती बदल अदिकार तपे खिराड व तपे अठागर…दिधली असे पेस्तरहीं माहाली तश्रीफा याल तरी सदरहूप्रमा…णे ताळिक घेउनु असल फिराउनु दीजे [ प. ब. द. फा. मो.* ]

---

ले. ४९ हू नकल श. १५८२ भाद्रपद व. १० / इ. १६६० सप्टें. १८

फरमान बमोहर अदलखान विज्यापुरी अज करार चतारीख २२ बार्वासमी माहे मोहरम सन १०६१ येक हजार येकसष्ट अरबी आक ॥१ फरमान हुमायून वतन करून दिल्हे ॥ ता चजानच आमलान व कारकुनान व आदकारयान व देशमुखान व देशपाडान हाल व इस्तकबाल मामले बादशाहाबाद उर्फ चेऊल आक अज सुर सन इहिदे सितैन व अलफ दरी विला मुकदमी येस मेहतरी सालवी फरजंद बाल मेहतरी सालवी ॥ २॥ सरकारात येऊन हकीकत जाहीर करून अर्ज केला ॥ की मुकदमी मामले मजकूर बर हुकम बुराहान निज्यामशा सुर्दसतहाये मुलकगेर अज बुजरुगान खुद रवा बुद ॥३॥ हे मोकादम मामले मजकूर याणी बुराहान निजाम-

शायाचे हुकमावरून व जागाजागाचे वतनदार याचे पत्रावरून व कुलोपार्जित वतन चालवीत आलो ·॥ गोंद मेहतरी वलद राम मेहतरी साकीन पेण ·॥ गेरवाजवी माळुमाती हकीकत सांगोन आपले नावाचे पत्र तकराल करून घेतले आणि कजिया करावयास लागले ·॥ इजत व सुज्यायेत दस्तगाहा मिजाजदान कारआगाह उमदे उजराये उजाम जुबदे उमराये गीराम निहंग दरयाये मर्दी व मर्दानगी गोहर कान फीरोजमंदी व फरमनगी फारस मुजमार सुज्यायेत निशारजी मैदान शाहामत शाईस्ते फिरावान आतफत व तहसीन फरावार फराशन मरहीमत व आफरीन खान आलीशान फरजंद रसीद सिपे शालार दौरान खुलासे नेकखोव्हान तिलकगीर किसवरसितान अफजलखान महमदशाई अहेवाल खातरेस आणून इनसाफ वाजवी केला पाहिजे ·॥४॥ मोकादमी व बुनयाद याची मनास आणिली त्याजवरून वतनपत्र मेहरवान होऊन करार करून दिल्हे ·॥· ता महमात मुकदमी मामले मजकूर व कसबे व पुरे व नवा कर व करके विलायत किले घेरदरक व आमूर मुकदमी ताळुक मामले मा।र व देहरे व मुशाहरे सरमाह येक पैसा व कानून व कानुनात व करपावा हरनी व गैर लवाजम बरहुकम सालाबाद मुजेब भोगवटे की दर कारकीर्दि निज्यामशा व मुलकगेर ·॥५॥· सदरहु बाो वतनाचा भोगवटा चालत आला असे त्यावरून भोगवटा चालता केला. ॥ बिनाबरान इलतमास मशारनिले मनास आणून मुकदमी मामले मा।र अज गोंद मेहतरी बिन राम मेहतरी साकीन पेण यास दूर केला ॥ ६ ॥ येस मेहतरी बिन बाल मेहतरी सालवी यास वतन मुकरर करून दिल्हे ·॥ व जे मुकदमी सरमाह येक पैसा मुजेब साबक मेहरनवानगी करून करार करून दिल्हा असे ·॥७॥ मे बायेद की महमात मुकदमी मामले मा।र व कसबे व पुरे व नवा कर व करपावा हरनी व विलायेत किले घेरदर्के माफक कानून कदीम येस मेहतरी बिन बाल मेहतरी याचे वतन जारी करीत जावे ·॥८॥· सरमाहा येक पैसा रोजारोज आदा करीत जाणे मनसब मुकदमीचा हमेशगीचा मुकरर करून दिल्हा असे तरी हरयेकविसी मदत व रयायेत व हिमायेत करीत जावे तो सुक्र सरकारकुन हररोज करीत जाईल ·॥ मनसब मुकदमी बांअद याची व बअवलाद याची व अफलाद याची जारी करीत जावे हरसाल नव्या पत्राची दिकत न करणे हे वतनपत्र करार असे दरी बाब ताकीद दानंद. ॥

सदरहु हस्ताक्षर विठल पाडुरग दि॥ देशाई व देशकुलकर्णी सु॥ सलास समानीन मया व अलफ.

---

ले. ५० } नकल असलप्रा। असे { श. १५८५ आषाढ शु. १२<br>{ इ. १६६३ जुलै ७

॥र्द मा॥ अनाम राजश्री कारकुनानी हाल व इस्तकबाल व माहाजन मोकादमानी व माहातारे व मडवी रयानी मा॥ हाये व तपे हाये मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल

सुा आर्बा सितैन अलफ खुर्दखत सुा छ २४ जािलाखर दरसाल स[ न स ]-लास सितैन व अलफ तेथे रजा जे मामले मजकुरीं देसकुलकर्णी जमेची वासलात मजमु मुकाबलेयासी लिहीत नाही व तपोतपां तपेकुलकर्णी नाही याकरितां कार-कुनांस तपोतपां मोइया मुकाबला नाहीं कुलाचा पैका गैरमोइया मुकरातीस पडतो निर्सदि तर येक जातो येक राहातो बाकी साकी कुल···ट मुखलिस गयाल मयेत न कले तपेयाचे कारकून गुम होतात त्यास आपाजी तावजी देसकुलकर्णी हा मिरासी आहे त्यास मदतीस यारिदी दिधलिया तपोतपां आपले निसबती यारिदी तपीयाचे कारकुनाजवल ठेवील आणि जे सा तपांचा निसींदा रोजकीर्दी रोज घालितो तैसा कुलकर्णियाचा यारिदी रोजकीर्दी दरोज घालील आली तहसील ते सहे ल्याहावी रोजकीर्द या गावगना दुफर्दैत सहे घालोवी हुजत गावांस कारकुनाने तपांच्या कुलकर्णीयाचे यारदीयाचे गुजारतीनें गावाच्या माहातान्या मढवीयाजवल द्यावी त्यास जे तेरखेची असेल ते तेरखेचे रोजकीर्दीस कुलकर्णीयाचे हुजतीची तसलमात ल्याहावी परभाहीरे ते गावांस हुजत कारकुनांनी ने द्यावी जे जे देणे त्यास दखल करून तो आपले रोजकीर्दीस तसलमात लेहून देईल आणि त्या तपेकुलकर्णी यारिदी ते सहे साल जालिया. निर्सदियास तपांचा घडणी बाकी तजकरा वासलाद गावगना रुजू करोन द्यावें गाव लिहिणार जे आहेत ते गावाचे कुलारग लिहितील येणे गाव वासलात ल्याहावी यामधें कारकुनास दुसरा मोइया मुकाबला जाला बद-लामी चुकली आपाजी तावजीचे निसबतीने यारिदी दिधले त्यां तपां बरें वाईट ते सहे दखलगिरी करावी रास अमल वर्तावें येसी आम्ही तपोतपांची विल्हे केली आहे मुशारा रयेत निसबतीने द्यावा त्यास रयेतीचे तुम्ही समाधान करणे आम्ही आणीक दुसरे ठाई तुम्हास येसान करून यामधें तुमचाही फाईदा आहे येसे त्यांचे समाधान करून तपोतपांनीसबत आपाजी तावजी देसकुलकर्णी याचे यारिदी ठेवणें त्यास तो अस्टागरीं कुलकर्णी मिरासी आहेत ते वजा करोन बाकी यारिदी कुलकर्णी ठेवणे.

| | | |
|---|---|---|
| तपे श्रीगाव पाल | तपे ब्राम्हणगाऊ | तपे उमर्टे |
| २ | १ | १ |
| तपे सांडाले | तपे शिराड | तपे अस्टागर पैकी ज्या माहाली मिरासी कुलकर्णी आहेत ते वजा करून बाकी महाल व पेठ नऊ-दरें व सागिया १ |
| १ | १ | |
| तपे परहूर | | |
| १ | | |

येणेप्रमाणें यारिदी मामले मजकुरीहून ठेवणे त्यास अवल तैनात सालिना लारी १२० व दूम लारी १०० येक सीम लारी ८० असी येणे प्रो तुम्ही माकुल

गैरमाकुल मनास आणून सदरहू तैनाती त्यांस करून तपेहाये मामले मजकूरची लिहिणेयाची येणे प्रो। विल्हे देखोन त्याची चाकरी घेऊन त्यांस रयेत निसबती मुशाहिरा देवीत जाणे तपेयाखेरीज कसबा राहिला तो खांसा कुलकर्णी व त्याचे यारेदी कसबेयाची रोजगार तहसील लेहावी व तपोतपा लिहिणे माफीक सारिखें तपियास कागद बाधा तुम्ही मोईन करून देऊन सदरहू विल्हे करून सुभां खबर लिहिणे येसा हा माहातारा मडवी खोटाई करून मणेल कीं मी मागे पैके दिल्हे येस्या खोटास यारेदी देसकुलकर्णीयाने समजवावें त्याच्याने त्या कुलांसी रुजु मुकाबला नव्हेल तर तो मोख्या आपाजीने करून द्यावा म्हणोन रजा बा।। रजा आपाजी ताउजी देसकुलकर्णी यास बा। रजा सांगोन आपाजींचें निसबती तपोतपा यारदी ठेविले आहेत ते यारदी तपांचें निसींदे रोजकीर्द घालितील तैसा तो कुलकर्णीयाचा यारदी रोजकीर्दी रोजबरोज घालील आली तहसील लिहील रोजकीर्दी बा। गावगना दुर्फद घालिल हुजत गावांस कारकून तपांचे देतील ते तपांचे यारदीयाचे गुजारतीनें द्यावा येणे प्रा। आपाजी तावजी देसकुलकर्णीयाचे निसबतीने यारदी ठेविले आहेत त्यांस तैनात तपांहून कागदयाब मोईन बीत ॥

| | | |
|---|---|---|
| तपे बाम्हणगाव सालिना लारी १३८ | तो। खांडाले सालिना लारी ११५ | तो। झिराड सालिना लारी १३८ |
| मुशाहिरा यार दी सालिना लारी १२० / कागदयाहा सालिना लारी १८ | मुशाहिरा यार दी सालिना लारी १०० / कागदयाहा सालिना लारी १५ | मुा यारदी सालिना लारी १२० / कागदयाहा सालिना लारी १८ |
| तो। परहूर सालिना लारी ११५ | तो। उमटे सालिना लारी ११५ | तो। श्रीगाव व तो। पाली सालिना लारी २३० |
| मुा यारदी सालिना लारी १०० / कागदयाहा सालिना लारी १५ | मुा यारदी सालिना लारी १०० / कागदयाहा सालिना लारी १५ | मुा यारदी सालिना लारी: १४० श्रीगाव, ६० पाली = २०० / कागदयाहा सालिना लारी: २४ सिरगाव, ६ पाली = ३० |

तो। अस्टागर जे माहालीं मिरासदार कुलकर्णी आहेत ते वजा करून बाकी देहाये व सारिया व नवदर सालिना लारी ९४

मुशाहिरा यारदी सालिना लारी ८४    कागदयाहा सालिना लारी १०

योा मुशाहिरा यारदी व कागद बाहा सालिना लारी १४५ येणे प्रा ग्येत नि॥ सालिना दस्तावर वाटणी करून आदा करीत जाणे आण सदरहु लिहिले प्रा देसकुलकर्णीयाचे यारदी तपोतपां लिहिणे घडणी बाकी तजकरा लिहिनील बाकीचा मोस्या मुकाबला करितील साल जालियावर तर्पाचे घडणी व बाकी रुजु करितील येणे प्रा करोन आपाजी ताउजी पासोन तपोतपां यारदी ठेविले आहेत ते ठेऊन धासील बाकी लिहितील त्यास सदरहु प्रा तैनात व कागद बाहा ग्येत निसबतीन दस्तावर वाटणी करून आदा करीत जाणे तालिक घेऊन असल खुर्दखत आपाजी ताउजीजवल देणे रा छ ११ जिल्हेज

---

ले. ५१ } श्री श्रीपरमेस्वर [ फा. शि.* ] { श. १५८५ आश्विन शु. १ / इ. १६६३ सप्टें. २२

नकल बरतबक असल

दं श्री माहामेरु रुपासागर असंडित लक्षुमी प्रशन राजमान्ये राजश्री आपाजी ताउजी देशाई व देशकुलकर्णी मामले मुर्तजाबाद उरर्फ चेऊल स्वामीचे सेवेस सेवक सोम पाटेल बिन कोल पाटेल व भान पाटेल बिन गण पाटेल मुकादम सार शाहापूर ताा श्रीगाव मामले मजकूर सुाा आर्बा सितैन व अलफ राम राम विनती स्वामीचा लाजिमा पेसजीपासून सार मजकूरीवर आहे तो बीताा

| कतबावण लारी | भात कल मुडे |
|---|---|
| १०८ | ३८ |

यावर स्वामीचे पिते राजश्री ताउजी मयेती जाहालियापासून भात मुडे ३८ तीन तुम्हास देत नाहीं कतबावणाच्या लारी १० दाहा देत होतो तर आता पुढे सार मजकूर मामूर जाहालियादर स्वामीचा लाजिमा सालाबाज प्राा नकद लारी १०८ दाहा व मात मुडे ३ तीन दर हरसाल देत जाऊन यास अनसारिसे करून तर आम्हास श्री —— स्वामीची आण असे हे विनती [ फा. मो.* ]

सोम पाटेल भान पाटील

[ कागदामार्गे* ] गोही

पत्र प्राा साक्षे हरभट

पत्र प्रा॥ साक्षे बालाजी सिधोरे

पत्र प्र॥ साक्षे लालजी रामजी प्रभु

तेरीख २९

सफर उर्फ भाद्रपद

हे विनंती.

---

ले. ५२ } { श. १५९२ आषाढ शु. १०
{ इ. १६७० जुलै १८

सत वासील बेस्मी रामाजी हरी वडूजकर गुमस्ते राजेश्री—सेकीन मोरगो तर्फे कन्हेपठार मा॥ पुणे इनामदार मामले मुर्तजाबाद उरुफ चेऊल सन १०८० ख्रा इहिदे सबैन व अलफ कारणे राजेश्री आपाजि ताउजी देसाई व देसकुल-करणी व अदिकारी ता॥ आठागर व ता॥ खिराड मामले मजा॥ यासि सतवासील लेहोनु दिधळे येसे जे तुमचे दिमतीविरी राजेश्री गोसावी याचि वरात इनामदाराचे ? मु······ दिवाणांतून सादर जाहाली आहे त्यापैकी तुम्ही······आपणास पावली ठारि बसरी १२०८ ये [ कसे ] वसि हें आप·········सही ठारि बसरी येकसे-वीस रास १२०८

गोही.

[ पुढील भाग फाटला * ]

[ उजव्या अंगास समासांत* ] नि॥ रामाजी हरी वडूजकर नि॥ बा॥ काव ?
[ कागदामागें* ] तेरिख १० सफर

---

ले. ५३ } [डावे अंगास शिक्क्याची मोकळी जागा*] { श. १५९३ कार्तिक व. ९
{ इ. १६७१ नोव्हें. १५

अजरखतखाने राजश्री शिवाजी राजे साहेब दवाम दौलतहु ता॥ देशमुखानी व देशपाडियान व सेटे मांहाजनानी व रयेत व आगरीयानी बागायेत मामले चेऊल बिदानद सुहुर सन हसने सबैन अलफ तुम्ही रयेत होऊन गव्हाई केली आहे मा॥ राजश्री कृष्णाजी भास्कर सुभेदार यासी भेटत नाहीत नस्ते मुद्दे घालिता आणि हुजूर यावयासी मुस्तेद जाहाले आहा म्हणून हुजूर कलो आले तरी साहेबी लाख होनाचा सुभेदार करून पाठविला त्याचा रह तिही यावा येसी गोष्टी असता नस्ते कथले करिता साहेब काम जाया करिता तरी रयेत होऊन हरकती करिता हे गोस्टी साहेबास मानत नाही याउपरी रोखा देखताच कुल रयेत सुभेदार मा॥ इलेपासी जाऊन भेटोन कुल वर्तमान दखल करणे मग जो तह देणे तो देतील या उपरि हरकती येसी खबर कलताच जो कोलाई करीत असेल त्यास साहेब जोर ताकीद करितील काही मुलाहिजा होण्हार नाही येकीन समजोन दुरुस रयेत मोलियान वर्तन जाणे रा॥ छ २२ रजब

श्री

ले. ५४ } [ डाव्या अंगास 'श्री चिंतामणि चरण शरण ' असा शिक्का* ] { श. १५९८ भाद्रपद शु. ४ इ. १६७६ सप्टें. १

श्री सकलगुणगणमंडित सौजन्यसिधु सिरोमणि अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री बहिरो त्रिमल सुबेदार व कारकून हाल व इस्तकबाल मामले चेऊल प्रती पोश्य मोरेश्वर पडितराउ नमस्कार सु॥ सन सबा सबैन अलफ बदल धर्मादाऊ ब्राह्मणानि सो॥ कसबा चेऊल यासी वणी गाई पोट फोडिया १६

खड जोइसी बिन माहाद् जोइसी बहिरंभट बिन गणेश भट उपा[धे*] ४
वणी गाई–४ विठल भट बिन गणेश भट उपा[धे*] ४

गोपालभट बिन आऊ भट गाई–४

येकूण वणी गाई पोटकोडिया सोला सोडिलिया आहेती तरी तुम्ही हर येकासी येकापासून च्यारी पावेतो वणी घेन नव जणे दर हरसाला ताजा खुर्दखताचा उजूर न करणे तालिक लेहोन घेऊन असल फिराऊन देणे छ २ माहे रजबु [ नि. बाळबोध*] हे विज्ञाप्ति [ 'सुभ। भवत' असा प. मो.* ]

[ पत्रामार्गे* ] चार सूद

---

ले. ५५ } श्रीशंकर { श. १५९८ भाद्र. शु. ८ इ. १६७६ सप्टें ५

मशहुरल हजरत राजश्री रामाजी अनंत सुबेदार मामले प्रेभावेली प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत सुहुर सन सबा सबैन वलफ साहेब मेहरवान होऊन सुभान फर्माविला आहे येसियास चोरी न करावी इमाने इतबारे साहेबकाम करावे येसी तू क्रियाच केलीच आहेस तेणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरुस वर्तणे या उपरि कमाविस कारभारास चरे दरतुरोज लावणी संचणी उगवणी जेसी जेसी जे जे वेळेस जे करू येते ते करीत जाणे हर भातेने साहेबाचा वतु ... होये ते करीत जाणे मुलकात बटाईचा तह चालत आहे परतु रयेतीवर जाल रयेतीचा वाटा रयेतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे दुसरी गोष्टी की रयेतीपासून येन जिनसाचे नक्ष घ्यावे येसा येकंदर हुकूम नाही सर्वथा येन जिनसाचे नख्त घेत घेत नव जाणे येन जिनसाचे येन जिनसच उसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेलचे वेलेस विकीत जाणे की ज्या ज्या हुनेरेन माहाग विकेल आणि फायेदा होये ते करीत जाणे उसूल हंगामसीर घ्यावा आणि साठवण करून आणि विकरा येसा करावा की कोण्हे वेलेस कोण जिनसच विकावा ने हंगामी

तो जिनस विकावा जिनस तरी पडेन जाया नव्हे आणि विकरा तरी माहाग येसे हुनेरेने नारल सोबरे सुपारी मिरे विकीत जाणे महाग धारणे जरी दाहा बाजार येन जिनस विकेल तर तो फायेदा जाहालियाचा मजरा तुझाच आहे येसे समजणे त्या-उपरि रयेतीस तवाना करावे आणि कीर्द करवावी हे गोस्टीस इलाज साहेबी तुज येसा फर्माविला आहे की कष्ट करून गावाचा गाव फिरावे ज्या गावात जावे तेथील कुलबी किती आहेती ते गोला करावे त्यात ज्याला जे सेत करावया कुवत माणुस-बल आसेली त्या मार्फीक त्यापासी बैल दाणे संच आसीला तर बरेत जाले त्याचा तो कीर्द करील ज्याला सेत करावयास कुवत आहे माणूस आहे आणि त्याला जोतास बैल नांगर पोटास दाणे नाही त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दोचो बैलाचे पैके द्यावे बैल घेवावे व पोटास खंडि दोन खंडि दाणे द्यावे जे सेत त्याच्याने करवेल तितके करवावे पेस्तर त्यापासून बैलाचे व गल्याचे पैके वाढीदिडी न करिता मुदलच उसनेच हळु हळु याचे तवानगी मार्फीक घेत घेत उसूल घ्यावा जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे या कलमास जरी दोन लाख लारीपावेतो सर्च करिसील आणि कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला तवानगी ये ती करून कीर्द करिसील आणि पडजमीन लाऊन दस्त जाजती करून देसील तरी साहेबा कबूल असतील तैसेच कुलबी तरी आहे पुढे कष्ट करावया उमेद धरितो आणि मागील बाकीचे जलित त्यावरी केले आहे ते त्यापासून घ्यावया मवसर तरी काही नाही ते बाकीचे खडवे तो कुलबी मोडोन निकाम जाला या उपरि जाऊन पाहातो येसी जे बाकी रयेतीवरी आसेल ते कुलाचे कुल माफ करावयां खडवे तोकुब करून पेस्तर साहेबास समजावणे की ये खेसीने कीर्द करऊन साहेबाचा फायेदा केला आहे आणि आमकी येक बाकी गेर उसली मफलीस कुलास माफ केली आहे येसे समजावणे साहेब ते माफीची सनद देतील जे बाकी नफर निसबत आसली ते हिसेबीच उसूल घेत जाणे बाकीदार माहाल न करणे ये खेसीने तुजला पदनसी येत तपसिलेकरून हा रोखा लिहून दिधला आसे आकलेने व तजवजीने समजोन याप्रमाणे कारबार करीत जाणे की तुझा कामगारपणाचा मजरा होये आणि साहेब तुजवरी मेहरबान होत ते करणे जाणिजे रा छ ६ माहे रजब.

---

ले. ५६ } [ डावे अंगास मोरो त्रिमलचा लंबवर्तुळी शिक्का* ] { श. १५९९ चैत्र शु. १५ / इ. १६७७ एप्रिल ७

॥ र्द मा। राजमान्य राजश्री रूस्णाजी देसाई व बाबाजी कुळकर्णी व बावाजी अदिकारी मामले चेऊळ यांसि मोरो त्रिमल प्रधान पिंगळ संवत्सर उपरि मामले मजकूरचे तहरहचे तुमचे व रयतांचे राजीपणे ज्याणे जैसे म्हटिले तैसेच केले असतां

हाली टोंगळ मिलोन कोटात जाऊन बैसळे आहेत आणि तहारहावरी येत नाहीत रा। अनाजीपंताची वाट पाहतातो म्हणून कलो अर्से तरी हे काये गोस्टी कोणावरी जलल अगर जुलुम जाजती जाली नसतां उगेच जाऊन बैसळे आहेत हे काये गोष्टी अहे तुमचेच राजीपणे व त्यांचेही राजीपणे तह दिल्हा असता कायेबदल ऊजर करितातो बहुतकी केलियाने काही सुटणार नाही पडल्या पाउसांत मारतां मारतां पैके अणऊन हें त्यांस परिछिन सागणे जन्ही राजश्री अनाजीपंत अळे तन्ही अम्ही तह जो तुमचे राजीपणे जिल्हा आहे तो मोडितीळ की काये व... प्रभुचे बोळे तहरह होतात की काये हे आपळे जागा [ न स ] मजता उगाच डहुलाडळा आहे तुम्ही त्यास दबाऊन सांगोन कोण कोण बहुनकीस मिळाले आहेत त्यांस बोलाऊन अणुन तहरहप्रमाणे कार्यभाग चाळवणे कीर्दी करवणे उसुलाचे कार्य चालू लावणे हजार हुनर केळे तन्ही जो तह अम्हीं तुमचे व त्या रयताचे राजपिणे दिल्हा( आ ) हे तो दूर होत नाही अखेर त्यांसच वसूल करितां जड जाईल येसें परिछिन सांगणें रा। अनाजीपंत तूर्त येत नाहीत तुम्ही कोटात जाऊन त्यास मा (लूम) करून सांगणे आणि इकडे अणणे त्यामधे जे कोण्ही थोर असतील त्यास हुजूर पाठवणे तो अम्हीही लौकरीच पंचमी इतुके रायेगडीहून स्वार होतो ते चेहुलासच येत असों तुम्ही अगोधरच सजवज करून ठेवणे आणि उतर लेहून पाठवणे व नागांव थळकर तहरहयरी अळे म्हणून रा। (भान) जी पंती लिाा होते त्यावरून त्यांस दिलाशाचें पत्र पाठविले असे ते त्यास देऊन त्यास समजाऊन सांगणे व टोगलासही येक रोखा पाठविला असे हाही त्यास पावणे अणि लिाा प्रमाणे वर्तणूक कर्णे चैत्र शुध १५ शनवार अज्ञाप्रमाण [ ' विलसति । लेखना । वधिमुद्रा ' असा वा. मो.* ]

---

| | | |
|---|---|---|
| ले. ५७ | [ ले. ५४ प्रो शि. व मो* ] | श. १५९९ ज्येष्ठ शु. ५<br>इ. १६७७ मे २६ |

श्री सकल गुणमंडित सौजन्येसिंधु सिरोमणि अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्यें राजश्री वहिरो त्रिमल देसाधिकारी व देसलेखक वर्तमान व भावी देस प्रांती पटण चेऊलु गोसावी यासीप्रत पांश मोरेस्वर पडितराये कृतानेक नमस्कार उपरि सके[1] ४

---

१ हा राज्याभिषेक शक आहे. पण पिंगल संवत्सरांतील ज्येष्ठ शुद्ध ५ धरल्यास हा राजशक ४ धरतां येणें कठीण. कारण, ज्येष्ठ शु. १३ स राजशक बदलावयाचा. पुढील ज्येष्ठ धरल्यास पिंगल संवत्सर राहात नाही. कालयुक्ताक्षी येतो व ज्येष्ठ शु. ५ स बुधवार येतो. पिंगल संवत्सरांतील ज्येष्ठ शु. ५ स शनिवार आहे. येथें पिंगल संवत्सर धरून मिती दिली आहे.

पिंगल संवंछरे धर्मार्थ वेदमूर्ती राजश्री येसजी भट विस्णुभट मनोहर वास्तव्य गुरू चेऊळ वेदस्यात्रसंपन्ये यासी प्रतिवार्सी देविले,

तादूल केलि कोठीमापे आठ सेरी पाइलीने मोठे गाई वण सर ४

तादुल खडि १

येवं तादुल केळि कोठीमापे येक खडी व गाई सर चार सोडविले आहेती तरी प्रतिवार्सी वेदमूर्तीचा समाचार घेउनु देत जाणे जवरी वेदमूर्त सुखरूप आहेती तववरी चालवणे प्रतिवारसी नूतन पत्राचा आक्षेप न करणे गाई स्व असतील येसा समाचार घेउनु येकीपासुनु च्यार पावेतो करभार ने घ्रणे प्रती लेहोन घेउनु मुख्य पत्र वेदमूर्तीस देणे लिखित जेस्ठ सुध पंचमी सुक्रवार [ बालबोध नि.* ] हे विज्ञाप्ति

---

ले. ५८ हू {श. १६०२ माघ व. १ / इ. १६८१ जाने. २४}

रामाजी आपाजी हवलदार तो तुडिल व आफियेन वासेंद

॥ दं इजतमाब[मो.जा.*] बाद... खैरियेत मकसूद आकी दरीविला सेख दावल हुजूर येऊन पोहचला अमा तुम्ही बखेर पाठऊन तो मजकूरची हकीकत लिहिलीत नाही व सेख मसूदचे सोबत ५० पनास रुपये पाठविले होते ते पोहचले त्याची जाब पेसजीच रवाना जाहला असे हिसाब पाठविला होता तो त्याचा कुम (!) पेसजीच लिहिला गेला असे ईशा आलाहु ताला सालगुदस्ता नजादाच होईल व सेख दावलनी तो मजकूरची हकीकत जाहीर केली सेख दावलचे जबानी मालूम होऊन आले की १२॥ खंडी भात व नागली खडी ५ सात असा साठा केला असे यास आठ मो ६1· सवासा खंडीचे पैसे हुजूर रवना केले बाकी गल्याचे पैसे निरख नवा-प्रमाणे जाहाला आहे याबदल पैसे घेतले नाही हाली घेऊन पाठवितील व दरकाचे तसरेचे वणटका व लगनटका व मोहतर्फा जमा जाहला आहे हुजरामधी येऊन पोचले अलबता इजतमाब किफायेतीने काम करितील ये अपल्यास येकीन असे अमा गल्याचे गल्याचे फरस्तीचे पैसे वगैरा आबवाबचे तफरका न करून जलदीणे सेख हमजाचे व इभराम अलीचे सोबत रवाना करणे आपले घरी शादी असे याबदल सर्चाचा जरूर आहे व मुर्गीया वगैरा सामान शादीबदल रवाना केले पाहिजे व फडावर गला जमा जाहाला असेल तो त्याची तफर्का न करणे सियादतमाब सेख आबदुला व सेख हसन कदीमपासून सरकारातून परवरिस पावले आहेत परागंदगीने ते जागा राहात असत कदीम आपले सरकारचे पाबस्त आहेत त्याने आपले तंगीचा अहवाल जाहीर केला यावरून लिहिले जात आहे की त्यावर जी बाकी असेल ती दस्तगीदा देविली असे कुल १ येक खंडी गला यास देविला आहे त्याची बाकी

वजा करून जे कांही बाकी खडीपैकी राहील ती त्यास दुसरे गावी देविले अदा करणे व मसीसतपन्हा महमद इभराईम यांस गींयास रवाना केले आहेत व चिठी सर्वांची दिली आहे व येक याचे सोबत सिपाई देऊन गींयालग रवना करणे व दरणई पावेतो यांस येक बेगारी देऊन रवाना करणे व सेख हमजा व इभरम अली यास पैसे देऊन जलदीने प्रवाना पोहचताच रवाना करणे व याचे सोबत सिपाई जाईल त्याची राहादाराची सरजामी करोन रवना करणे वं वरी फरोख्त करून त्यांचा घोड्याबदल दाना रवना करणे ज्यादा लिहिणे हाजत नसे रा। छ १३ माहे मोहरम सन २४ जुलूस.

---

ले. ५९ }

श्रीशंकर

{ श. १६०५ श्रावण व. ३०
{ इ. १६८३ आगस्ट १२

मो। अनाम बाबाजी महादेऊ देशकुलकर्णी चेऊल यासी केसो त्रिमल सुहुर सन अर्बा समानीन अलफ तुम्ही पत्र दर्शनी स्वार होऊन आम्हापासी येणे आपले माहलीची दस्त व समजाविसी कागद जे असतील ते घेऊन येणे छ. २८ साबान अज्ञाप्रमाण [ 'ले । खना । वधिर्भु । द्रा ' असा च. मो.* ]

---

ले. ६० }

श्री

{ श. १६०५ माघ व. १४
{ इ. १६८४ फेब्रु. ५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १० रुधिरोद्गारी नाम संवत्सरें माघ बहुल चतुर्दसी भोमवासरें राजश्री चिमणाजी आउजी यांसि राजाज्ञा ऐसीजे कुदे बपोली हे दोन्ही गाव व तिसरे मौजे सिडकोली मा। चेऊल तीन्हीं गाव गनीम हबसी व फिरंगी यानी मारून नेलें तेसमई रयेतीचा गळा कुळ लुटून नेळा याकरिता रयेती दिलगीर होऊन परागंदा होऊ पाहातें तरी रयेतीस कांही मज [ फाटलें आहे.* ] [ म्हणोन ] चेऊलच्या हवालदारे हुजूर लि। होतें त्यावरून तुम्हांस लिहिले असे तरी तुम्हीं चौकसी करून मनास आणणें आणि हुजूर लिहिणे तुम्ही त्याहाल तेणेप्रमाणें त्याची विल्हे होईल व दादाजी कुलकर्णी याचे सेतीचा गळा मौजे कारळें येथें होता तो दिवाणांत साराच राजभाग प्रजभाग कुल घेऊन खर्च केला म्हणोन दादाजीनें सांगितलें तरी जो गळा आणिला असेली तो मनास आणणे आणि राजभाग वजा देऊन उरला प्रजभाग जितका गळा होईल तितका दादाजिस परतोन देणे छ २८ सफर [ 'मर्या। देयं वि । राजते ' असा चौ. मो.* ]

[ पत्रामार्गे* ] सुरु सुद

---

ले. ६१ श्री { श. १६०५ फाल्गुन शु. ६
इ. १६८४ फेब्रु. ११

राजश्री सुभेदार व कारकून सुभा प्रांत चेऊल स्वामीचे सेवेस

सेवक आज्ञाधारक दादाजी महादेऊ देसाई व देसकुलकर्णी मामले चेऊल सेवेस विनती सु॥ आर्बा समानीन व अलफ रा॥ राघो विस्वनाथ सुभेदार माजी यामधे व अपणामधे वर आकसी पडिली होती येसेयासी आपण राजेश्री चिमणाजी आउजी बराबरी राजश्री[मो.जा.*] स्वामीजवली भाहागडीचे मुकामी गेलो मामले चेऊलचे वर्तमान साकले विदि[त] करून विल्हे मामला करून यावा या निमिते गेलो म्हणौउनु सुभेदार मा॥इलेने मागा आपले घर कैद करून आपले नग नगोटी वस्तभाव आणि [ ली ] म्हणौउनु हाली आपण राजेश्री [मो.जा.*] पंत स्वामी जवली वर्तमान विदित केले राजेश्री[ मो.जा.*] पंत रुरपावंत होऊन राजज्ञा पत्र स्वामीस दिधले··· नगनगोटी व वस्तभाव राघोपंत सुभेदार माजी देवणे ········ देवणे···पैकी कितेक खर्च लेहू···············दिधले ते स्वामीहीच वर्णून दिधले त्यावरून स्वा······ ········दिधली वस्तभाव नग नगोटी आणिली त्यापैकी सुभा जमा (हो) ते देविले बी॥ ता॥

अमानत वस्ता जामदारखाना होत्या त्या देविल्या बी ता॥

रुपे हाण वजन तोले बतीस
८८१२

कठ माला सोने मणी व रुद्राक्षे माला दोन २

दाभोली लारी··· नीम ।॥।

सोने दाणे खुर्द कुर्डाकेया यापाने ल्यांच २
४

भाऊ सनगे ५ पाच येवज नदक चदी
८८८॥ नयेले(?)~—
८८३ गजघण

दाणे साह ६ पवली मणगठीया खुर्द चौदा
१४

नग सोने व रुपे याचे खर्च केले त्याचे नख्त करून मामले चेऊल पैकी नख्त देविले ता॥

रुपये साडे अकरा चवल बाल
११॥=।

खुर्दा टाकसाली ती· नसे ध्यार टके तीन रुके
३०४८३

००२।९ थाली पितली १~-

००२।९ तपेले पाखा (?) डीचे १~-

००२ तपेले खुर्द १ ~-

०१८। सवा अठरा सेर

येण्हेप्रमाणे देविले ते आपणासी पावले सेवेस स्रुत होये तेरीख ५ रबि-लौवल बसेर (?)

---

ले. ६२ } श्री [ डावे अंगास आऊजीची लं. व. मु.* ] { श. १६०६ माघ व. २ इ. १६८५ फेब्रु. ११

ई राजमान्ये राजश्री दामाजी कुलकर्णी मामले चेऊल यासि चिमणाजी आउजी सुहुर सन खमस समानीन व अलफ रगाजी सबनीस याणी कागद पाठविला होता त्याचे उतर पाठविले असे त्या वरून कलो येईल तुम्ही इतके दिवस यावयासि विलंब लाविला या उपर लवकर येणे विलंब न लावणे जाणिजे रा छ १६ रबि-[ लावल ? ] [ मो.* ]

---

ले. ६३ } [वा. म. शि.*] { श. १६०७ चैत्र शु. १२ इ. १६८५ एप्रिल ६

ई कौलनामा अजसुभा राजश्री हरी सिवदेव सुभेदार व कारकून सुभा महाला-निहाये न... चेऊल तांहा खोतानी व पाटिलानी व रयानी व मोरत्तसर रयेती मामले चेऊल सुा सन खमस समानैन अलफु दादे कौलनामा येसाजे तुमचे बाबे देसक मामले मजकूर सुभा येऊन मालुम केले येसे जे मामले मजकुरीं रयेतीवरी कितेक बाबे जलल जालें आहे रयेतीमधें कांही उधार राहिला नाही बेमवसर जाली आहे गावांत राहावयासि रयेतीमधे तकवा नाहीं म्हणौनु मामले मजकुरींची रयेती कुल अवघी जमा होऊन हुजूर आपले पारपत्याकारणे जात आहे तरी अजी मृगास महिना दीड महिना राहिला ये हंगामी रयेती हुजूर गेली म्हणीजे हुजूर पारपत्याकारणे थोडा तऱ्ही येक महिना पाहिजे तेथें महिनाभरी रयेती गुतोन राहिली म्हणीजे मार्गे ............बुडाली तेणें करून कीर्दीस धका............रयेतीचा मुदा मनास आणून...दिलासा करून पारपत्य केले पाहिजे......ऊन आणून कीर्दीस लाविली पाहिजे म्हणौनु विदित केले त्यावरून तुमचा मुदा मनास आणावयाकारणें देसक मजकूर तुम्हाकडे पाठविले त्याबराबरी तुम्ही मुदा लेहोन पाठविला त्या मुदाप्रमाणें तुम्हांस कौल सादर केला असे बीतपसलि

किता कलम बागाईत नारेल व सुपारीचें दस्त सन अर्बामधें वाडीची वाडी बागाचा बाग पाहाणी करून दस्त आकारिलें असोन हालीं सालमारीं राजश्री चिमणाजी अउजी मामले मजकुरीं आले त्यानी आर्बाचें पाहाणीस जें झाडें हाजर होतीं त्यां झाडांचे माथा सन इसनेंचे पाहाणीमुळें सरासरी दर झाडास बेरीज बैसली तेणेंप्रमाणे आर्बाची पाहाणीस हाजर झाडें होती त्या हिसेंचें दस्त आकारून आर्बामधें जमा केली त्यापैकी आर्बात जाला वसूल पाहणीमुले तो वजा देऊन उरली ते बाकी काढिली साल मारीही आर्बामधे इसने रुजु घालून जमा आकारिली तेणेंच प्रमाणें जमा धरिली तरी आर्बात पाहाणी केली ते काये सबब दूर करून इसनेंचे पाहाणीमुले जमा धरून दुसाला बाकी काढिली तरी ते इसनेचें पाहाणीमुळें अपलिया-न्याने देवत नाही आर्बाचेंच पहाणीमुळें घेतलें पाहिजे आर्बाचे पाहाणी गुजाईस आहे म्हणोनु साहेबास वाटत असेल तरी साल मारी नवी पाहाणी ....... पाहा... करून तेणेंप्रमाणे बागाईत अकारेल तेणेंच प्रमाणे घेऊन जाजती तसवीस लागणार नाही कलम १

येक कलम रास.

किता कलम जिरायेताचे तसैराचा तह राजश्री केशोपंत येऊन तह केला कीं दर खंडीस लारी बसरी ४०० प्रमाणें नख्त घेणें म्हणोनु मुलकामधें जागां जागां दिवाण निरख दरखंडीस त्यालिस लारी प्रा निरख करून दिधला

किता कलम जिरायेतामधें तकदमा उसूल मबलगा घेतला आहे तरी जो कांहीं साल मारी तकदमा वसूल घेतला असेल तो पेस्तरसाली मजुरा दिधला पाहिजे म्हणोनु तरी दस्तावेरीज जो तकदमा वसूल घेतला असेल तो पेस्तर सालीं मजुरा देऊन कलम १

येक कलम रास

किता कलम दिवाण देणें हक नाहक होतें ते अजी पावतो वसूल केला येसि-यासि ···कीर्दीवाम रायरूच ... पाहिजे त्यासि रोजबरोज वरातदार आमचे पाठी-सी लागले आहेत ते वरातदार दूर केले पाहिजेत म्हणोनु तरी हक हिसाबी रास्ती ज्याजकडे बाकी निघेल ते त्याजपासूनच घेऊन ज्याजकडे बाकी नसेल त्यासि वरातदाराचा तगादा लागणार नाही कलम १

येक कलम रास

जिरायेताची संचणी येक गाव लाव-गनाचा पना ... खंडि..............

...................................

...................................

सिरा दिर्डी बैसते हालीं साल मारा कारणें तरी कुलीं सेताचे आरधेले व आनाडी सलक वेठ बेगारीस हमेशा त्याचे पाठीसी लागली तेणें करून रायरुच बांदबंदिस्त राहिली याकरितां कीर्दी राहिली तरी पेस्तर सालास संचणीची तसवीस लाविली न पाहिजे पेस्तर सालास हगामी पाहाणी करून पाहाणीमुळें जे दस्त अकारेल तेंच घेतलें पाहिजे म्हणोनु तरी संचणी केलिया वेगले रयेतीस कस्ट मशागतीचें

असतां हाली येलीकडे सलासापासून दर संडीस लारी ४५ पंचेतालीस प्रमाणें वसूल घेतला अहे तो पेस्तर साली मजुरा दिधला पाहिजे आणि पेस्तर सालीं ४० प्रमाणें तसैराचा बाब घेतला पाहिजे म्हणोनु तरी बाजे माहालेप्रमाणें घेऊन बाजें माहालासेरिज ज्याजती घेणार नाही कलम १

येक कलम रास.

किता कलम राजभागाचा गला हगामसीर किलेकोटास व सनदेवाइकास येवज देता त्यासि गड किलेयासि भात न्यावें यासि मबलगा नुकसान बैसतें सवाईनें भरती होत नाही तरी हगामसीर गला येवज किले कोटांस देववाल त्यासि आपला हरकारा देऊन रास्ती माप घेव-विले पाहिजें ज्याजती नुकसानाची तोसीस न लागे ते केले पाहिजे म्हणौनु तरी गड किलेयासि येवज गला [ जाईल त्याचें ] मापाकरणें दिवाणचा हरकारा... देऊन रास्ती मापे घेत ते करून कलम १

जरुर येऊन लागत नाहीं येणेंकरून रयेती कीर्दीस अलस करिते याकरितां आतांच तुमचे राजीपणें तुमचे समजा-विशीनें जे संचणी—तां होईल तेंच करून तेणें प्रमाणें जे बेरीज अकारेल तेंच घेऊन ज्याजती तसवीस लागणार नाही कलम १

येक कलम रास

जिरायेती व बागाइतीचे वाडवल ४ आनाडी याचे पाठीसी हमेशा वेठबेगारी लागली आहे ते दुरी केली पाहिजे वेठी-करितां सेताचा राबकस्ट राहाताती व वाडीचें कुंपकुडण व झाडांस सेणपाणी होत नाही सराब पडतें तरी वेठी बेगा-रीची तसवीस दूर केली पाहिजे म्हणौनु तरी साल मारीं भाड राजकोटास ठिकाणी पाविलियावरी आणीक वेठीची तसवीस लागणार नाही कलम १

[ येक कलम रास ]

येक कलम रास

येणेंप्रमाणें तुम्हास कौल सादर केला असे कौलप्रमाणे कवीहाल होऊन सुखें आपले जागा जागा कीर्दीस कस्ट मशागती करणें कोणे बाबे शक न धरणें दरी बाब कौल असे [ नि.*] मोर्तब सुद [ 'मोर्तब सुद' असा वा. मो.*-]

[ कागदामागें* ] तेरीख ११ माहे जमादिलौवल.

जमादिलौवल

---

ले. ६४ } श्री { श. १६०७ ज्येष्ठ व. ३
ता { इ. १६८५ जून ९

राजेश्री रायाजी सदक प्रभु हवालदार व कारकून मामले चेऊल गो। स्नेहेकिन हरी सिवदेऊ सुभेदार व कारकून सुभा माहालानिहाये प्रात चेऊल

आसीरवाद आा नमस्कार सुा सीत समानीन आलफ बदल [स]चं तश्रीफा देसक मामले म[जकूर] बाा सनद राजेश्री——पं...स्वामी सनद छ २ रजबु पौ... माहे मिनहू थिरमे देतील...............

* कृस्णाजी देसाई थिरमा ५ याो
* बावाजी आदिकारी थिरमा १ याो
* दादाजी माहाद प्रभु कुलकर्णी थिरमा १ येकूण

१२

येकूण होन पातशाही बारा रास असेत मामले मजकुरी बाकी देसक मजकुराचे निा असत आहे त्यापैकी आदा करणे आणि साल मजकुरीचा आकार गुदस्ताचे बेरिजेस ज्याजती होये ते गोस्टी करणे रा छ १६ रजब

---

ले. ६५ श्रीशंकर नाा { श. १६०७ पौष शु. ६ / इ. १६८५ डिसें. २१ }

मशहुरल राजमान्य राजेश्री रायाजी सदक प्रभु हवालदार व कारकून मामले चेऊल यासि प्रती नीलकंठ मोरेस्वर आश्नीवाद सुा सीत समानीन व अलफ माा बाबाजी माहादेऊ देसाई व देसकुलकरणी मामले मजकूर याणी विनती केली की साल गुदस्ता संडोजी मोहिता सेवक राजमडल याणी रामनाक [भ]डारी प्रज मौजे गोठी ताा बाम्हणगौ याजकडे राजग्रुहीचा राजभा[ग] बाकी देण असता दरम्याने संडोजीने त्याचं टोणग दोन व......मापे दाहा मण घेउनु गेल्याउपरि रामनाक मजकुराचे... चिमणाजी आउजी यासि फिर्याद जाहाला त्याउपर म........जी प्रभु नेमून चौकसी केली की प्रज मजकुराकडे राज [ मधल्या पाच ओळी मजकूर कांही फाटला; कांहीं अस्पष्ट* ] आपलियापासून उमल......कृपाळु होऊन चिमणाजी आउजी प्रभुने तह करून......प्रमाण मोहिते याच्या नावे बाा मुा सदरहु लेहोनु ......जरा दिले पाहिजे म्हणून विनती केली तरी माा चिमणाजी प्रभु......तहकीक काये केली टोणगयाची किमती चौघाच्या मते केली असेली –केला असल तो चौकस खराखुरा मनास आणून संडोजी मोहिते याचे –बदल मुा लेहोन बाबाजी कुलकरणी यासि मजुरा देण अनमान न करणे तुम्ही हे मनास आणणे आणि चौकसीने मनास अणून मजरा देण रा छ ५ सफर

---

ले. ६६ श्री नकल { श. १६०७-०८ / इ.१६८५-८६

महजरनामा हाजिर मजालिस बीहुजुर

राजश्री बजाजी माहाले दिमत म्यानबंक हुजरी लोक

अंताजी सिवराव कवस राजमंडल

मा। येसाजीराव दरेकर सुभेदार हशमपाव लोक

मा। बहिरजी पावार सुभेदार हशम पाव लोक

दत्ताजी विठल प्रभु सिताचराव पनवेलकर

कारकून इमारती खांदेरी व कुलाबा व सागरगड

अंताजी भास्कर मजमदार

जोगोजी फर्जन हवालदार तट व नगोजी वाघमारे हवालदार तट

सुभा माहालानिहाई मामले चेऊल

राजश्री येसवंत राव अनंत सुभेदार

राजश्री गनोराम मजमदार

मा। रायाजी सतक प्रभु हवालदार मामले चेऊल

मा। त्रिंबक श्रीपत सुभेदार हशम पाव लोक

मा। कृस्णाजी चव्हान सुभेदार हसम पाव लोक

मा। तान्हाजीराम मजमदार जंजिरे राजकोट

कृस्णाजी माहादेव देशाई मामले चेऊल

बाबाजी विठोजी अदकारी मामले चेऊल

दामाजी आपाजी देशाई व देशकुलकर्णी मामले चेऊल व अदकारी तर्फ खिराड तर्फ अस्टागर

देशमुख तर्फ अस्टमी

भिकाजी येसजी सेलके देशाई

बाबाजी सोनाजी सेलके अदकारी

रामाजी नाईक मानोपं

अंताजीपंत वैदे शकीन वस्ती आगर चेऊल

बकाल—

गोंवदोजी चोधरी

माहादजी बकाल

भवांनजी बकाल

पिलाजी येस प्रभु

कृस्णाजी हरी प्रभु

शामजी नाईक देवरसी

माहाजन आगर नाईक

बाबा जोसी

रंगोबा आगर नाईक

विसोबा गांवडकर

येसोबा सेटा

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल सुर सेन सीत समाणीन व अलफ हाजिर मजालिसी महजरनामा ऐसाजे पेसजी सन सलासामधे विठोजी बापुजी व गोंदोबा

नारायेण व बालाजी रघुजी व मल्हारजी व शामजी तान्हाजी येही आपली वाडी खाते बनाम रगोजी पोस प्रभु बा॥ गणेश कुक पाटेल किता १

| | | | |
|---|---|---|---|
| विठोजी बापुजी प्रभु | औलाद गंयाजी | औलाद साबाजी | तुकाजी बाबाजी |
| तकसीम १॥ | तकसीम १॥ | व हरबाजी ता॥ | १ |
| बालाजी रघुजी ता '॥ | मल्हारजी व | दोन २ | |
| | शामजी ता '॥ | गोदोवा व गोजोवा | |
| | | नारोजी ता १ | |

येणा वाडी किता येक हे वाडी मशहुरुळ सूर्याजी विसाजी प्रभु वस्ती तर्फ असर्मा यांसी आपले अतमंशतोशे विकत दिधली याची किमत चौकयारे देसमुख व आगर नाईक व खासा वाडीचे हरदु खावंद जाऊन च्यारी कोन वाडीचे हिंडोन भुईमाण पाहोन किमत केली वाडी कुली बहुत साले खराबा भाट होती झाड माड व पाणी कुल ण होते हे मनास आणून किमत केली लाहारी बसरी १२५ सवासे करून खत फरोख्त करून सदरहु जणी आपले निशाण करून दिधले ते खतीं तिमाजीचा वडिल लेक सजनाजी होता त्याची औलाद जिवाजी प्रभु व व निलाजी प्रभु व गोजोवा प्रभु हे बहुत साले बाप मेलियावरी लाहान नादान होत ते पेणामधे आजवली गेले होते तेथे दाने जाहाले या खतीं लिहिले नव्हांते सूर्याजी प्रभूस दखल न होते सूर्याजी प्रभु सदरहू प्रा पैके दिधले पावले पावलेयाचे खत वासील घेतले मग वाडीमधे आपले पदरींहून पैका मबलगा खर्च करून विहीर करून पाणी केलें वाडी आबादानी केली व नवें घर बांधिलें त्यासही मबलगा खर्च जाहाला तेथें आपली वशात केली ऐसियासी सूर्याजी प्रभु रोजगाराबदल रायेगडास गेले होते तेथे जिवाजी प्रभु उभा राहोन वाडीची मुनसुबी सांगो लागला ते मनसुबी राजश्री पंत न्यायाधीश यांजवल गेले तेही खत मनास आणिले तेथे लिहिले आहे कीं तेथे लिहिले आहे कीं वाडी आम्ही आत्मशनोश विकत दिधले आहे यासी दगदावा वारिसी आगर हरकोन्ही करील तो आम्हीं सोडऊन देऊन सूर्याजी प्रभूसी निसबत नाहीं म्हणो म्हणोन खत दिधले होते ते पाहोन रा॥[मो. जा.*]पत न्यायाधीश येही जिवाजीस आज्ञा केली कीं तुवा जाऊन तुझे वारिसदार आहेत तेही वाडी विकत दिधली आहे त्यांचे गलां पडणे म्हणे म्हणोन बोलिले यावरी जिवाजी प्रभु म्हणो लागला कीं आपले तर्खामदारांवरी बाकी होती सूर्याजी प्रभूस चेऊलची मजमु होती येन्हे बाकीचे तोस्टक त्यासी लाऊन बरकस करून जुलमे वाडी विकत घेतली म्हणोन बोलिला यावरी सूर्या [ जी* ] प्रा बोलिले कीं आपनाणासी मजमू होती दि दिवाणचे बाकी बदल आपणास आणून बसविले असेल अगर बाकीवरी वरात केलियाच असतील परंतु तु वाडी जुलमेने घेतली नाही म्हणोन कतबे दिधले आणि गुन्हेगारी

लेहून दिधली इतुका प्रसंग तेथे जाहाला यावरी जिवाजी बाजी प्रभु चेउली येऊन विठोजीस व गोदोबास व बालाजीस लटिक लार्डे सांगोन समजाऊन त्याच्या तकरीरां जुलमेने वाडी घेतली म्हणोन घेऊन हुजूर गेला तो मोगल सन खमसामधे कोंकणामधे येऊन लूट नागावा केला धुधल जाहाली सूर्याजी म्याची माणसे काही पालीमधे काहीं अस्टमीमधें होती ती तो आपले माणसाचे खबरेस गेला तो जिवाजी प्रभु पाचाडास गेला सूर्याजी प्रभूने आपली माणसे विल्हेवार लाऊन हें वर्तमान तकरीरांचें कलले म्हणोन हुजूर गेला तो जिवाजी प्रभूने रोजगार करून गेला मनसुबी तर तैसीच राहिली यावरी साल मजकुरी सूर्याजी प्रभु साल मजकुरी आले यावरी येथे सूर्याजी प्रभूने विठोजी व गोदोबा बालाजी रघुजी व शामजी यांसी बिलगला तुम्ही आपणांसी वाडी आपलीले आत्मसंतोश दिधली असोन जिवाजी प्रभु म्हणतो कीं जुलमेने वाडी घेतली त्यास तुम्ही तकराराही ह्याच भातीच्या जुलमेने घेतलें म्हणोन लेहून दिधलिया आहेत तरी तुम्ही हे गोस्टीचा निव्हाव करणे तुम्ही जुलमे घेतली म्हणता तरी आपण काही जुलमे घेतली नाहीं आनी तुम्हास वाडी पाहिजेत असली तरी आपली यैन किमत व वाडीमधे खर्चला पैका व नवें घर बाधिलें त्यास खर्च जाहाला आहे अैसे चौगचारे जे किमत होईल ते देऊन आपली वाडी घेणे आपणाच्यान तुमसीं मनसुबी सांगवत नाही म्हणोन सूर्याजी प्रभु बोलिले यावरी आईकत नाही म्हणोन मामले मंजकुरी राजश्री येसवंतराव अनंत सुभेदार याजवल वर्तमाण सांगितलें त्याजवरून त्यांसी बोलाऊन नेले यावरी तेथेंही विठोजी प्रभु व गोदोबा प्रभु येही तकरार केली कीं वाडी आम्हास बाकीची तहसील लाऊन जुलमेच वाडी घेतली म्हणोन तकरार लेहोन दिधली यावर गोही साक्षे आणून खरे खोटें करावे म्हणोन त्या दोघाचा कतबा घेतला जरी हे गोस्ट खोटी जाहाली तरी दिवाणचे गुन्हेगार म्हणोन कतबा घेऊन हे मनसुबी राजश्री बजाबा माहाले दिमती त्र्यंबक हुजरी लोक याचे स्वाधीन करोन मनसुबी करविली यावर राजश्री बजाजी माहाले येही कुल हाजिर मजालिसी बैसऊन मनसुबी आरंभिली व सतावरी देसमुखाच्या व भले लोकाच्या व हमशाई यांच्या गोही होत्या त्यासी बोलाऊन मनास आणिता जुलूम केला नाहीं आत्मसतोश वाडी विकिली हे खरे जाहाले यावरी सूर्याजी प्रभु म्हणो लागले कीं हे वाडी आम्हास येही आत्मशतोंसे दिधली आणि जिवाजी प्रभु उभा राहून मनसुबी सांगो लागला पांच सा महिने आपणासीं कस्टी केलें अैसाच हर कोण्ही दुसरा उभा राहोन मनसुबी सांगाला तरी आपण काये करावें आपणाच्याने मनसुबी सांगवत नाहीं तरी वाडी यांची यास देवणे आण आमचा पैका जो खर्च जाहाला आहे व ऐन किमती दरमोल करून जो हक हिसाबी होईल तो देवणें म्हणोन बोलिले यावर बालाजी रघुजी म्हणो लागला की वाडी आपण यांसी विकत दिधली ते दिधलीच आहे आपणाच्याने पैके देवत नाहीं आपण वाडी घेत नाहीं म्हणोन बोलिले

यावर बालाजी रघुजी म्हणो लागला की. विठोजी प्रभु व गोदोबा व शामजी यासी पुसिले तुम्हीच वाडी घेने याचे पैक चौकचारे होतील ते देणे त्या वरी तेही म्हणो लागले कीं पैके आपणाच्याने देवत नाहीं वाडी दिधली ते दिधली म्हणोन बोलिले यावर हाजीर मजालिसी बोलिलें कीं बरें तुमचा वारीस सजणाजी तिमाजी याचे लेक जिवाजी व निळाजी व गोजवा प्रभु उभे राहिले आहेत त्यासी तुम्ही समजावणे म्हणोन हाजीर मजालिसी बोलिले यावर विठोजी प्रभु व गोदवा प्रभु म्हणो लागले कीं हे आपले वारीस नव्हात शामजी प्रभु व बालाजी प्रभु याचे निसबतीचे आहेत हे तेही समजावावे म्हणोन बोलिले यावरी बालाजी रघुनी येही कबूल केले कीं आपण त्यासी समजावीन सूर्याजी प्रभूसी निसबत नाहीं म्हणोन कबूल केले यासेरीज दुसरा कोण्ही वारीस उभा राहिला तरी ज्याचे निसबतीचा असेल तेण्हे समजावावा म्हणोन बोलिला हे गोस्ट अवघे वारिसदार विठोजी व गोदोवा प्रभूने न्यावे केली यावरी सदरहुमो बालाजी रघुजीचे पत्र घेविलें कीं बहुत बरे जिवाजी व निळाजी व गोजोबा प्रभु हे तुम्ही वारीस तुम्ही समजावावे कीं सूर्याजी प्रभूसी नि॥ नाहीं म्हणोन आपलें पत्र सूर्याजी प्रभूस लेहून देणे म्हणोन सांगतले ते बालाजी प्रभूने मान्ये करून पत्र दिल्हे त्यावरी बालाजी प्रभूने निशाण करून दिधला यावर हाजीर मजालिस गोही जाहालिया पत्र मुस्तेद जाहाले पुढे विठोजी व गोदोवा प्रभूने बालट कले होते हे सरे कदबे राजश्री[ मो.जा*] सुभेदार व रा॥ न्यायाधीश यांजकडे दिली आहे ते त्याची गुन्हेगारी लागेल म्हणोन पलोन गेले वाडी काही सूर्याजी प्रभूनी जुलमे घेतली नाहीं हे सरे जाहालें सूर्याजी प्रभूने लोकांचे साक्षेने खरेदी केली ते सूर्याजी प्रभूचे हवाला हाजीर मजालिसी हवाला केली सूर्याजी प्रभूनें सुखे आपली पुत्रपौत्रानी उपभाग करावा व विठोजी व गोदोवा व बालाजी व शामजी व निळाजी व जिवाजी व गोजवा यांस अर्धाअर्धी समध नाही हाजीरनामा सही.

---

ले. ६७) श्री (श. १६०८ ज्येष्ठ शु. ७
(इ. १६८६ मे १९

राजमान्ये राजश्री दादाजी माहादेव देसकुलकर्णी मामले चेऊल यासी नीलकंठ मोरेस्वर सुहूर सन सीत समानीन अलफ तुम्ही खबेर पाठविली लिहिले की आपणावर राजाज्ञा करून सवासे होनाची वरात जाली अफराद येऊन आटाआट बहुत केली आहे कृपाळु होऊन मनारोखा पाठविला पाहिजे म्हणून तपसिलें लिहिले विदित जाले 'त्यावरून राजश्री ...... पंतास पत्र लेहून पाठविले असे व अफरादास [ मना ] रोखा पाठविला असे तरी त्यास देऊन वारेस लावणे त्यास

काहीं आदा न करणे जाणिजे छ ६ रजब [ नि.* ] आज्ञाप्रमाण, बरातच, बजि-नस...दापासी पाठउनु देणे हुजूर आम्ही पाठउनु आज्ञाप्रमाण [ ' ले । खना। वधिमु । द्रा ' असा च. मो.* ]

[ कागदामागें* ] सुरु सुद

---

ले. ६८ } { श. १६०८ माघ शु. ७
इ. १६८७ जाने. १०

॥ र्दं मश[ हुरल ]अनाम देसमुख व अदिकारी व देसकुलकर्णी व रयेतानी मामले चेऊल यासि जिवाजी हरी सुभेदार व कारकून सुभा किलेहाये तर्फ सुधागड सु॥ सबा समानिन अलफ तुम्ही राजेश्री रायाजी सदक प्रभु सुभेदार मामले मजकूर व दत्ताजी विठल मजालसी सुभा याबरोबर आपला मुद्दा तपसिलवार लेहून पाठविला तो आवघा आम्ही राजेश्री तुळजोजी –गे सरसुभेदार नामजाद प्रात चेऊल व रा। नरसो सुरो सुभेदार [मा]मले मार बैसोनु कलामाचे कलम मनासी आणून तुम्हास येकदर तपसिलवार मुदियाप्रमाणे कौल सुभा माहालानिहाये कौल सादर केला आहे तेण्हेप्रमाणे तुम्ही येउनु गावाचा गाव मामुरा करणे कीर्दं मशा.........ची येगमी करून स्वामीकार्ये [करणे कीर्दं करणे] तुम्ही याउपर स्वामीकार्यास हरकत फितवा सर्वथा न करणे तुम्हास वरातदाराचा तकाद्दा होता तोही दूर केला आहे कोण्ही वरातदारही तगादा लावणार नाही हर येकविसी तुमचे चालउनु सर्वथा आम्हापासून अतर पडणार नाही तुम्ही आपले समाधान असो देणे बहुत गा। छ ५ रबिलोवल [ नि* ] मोर्तब सुद [ बा. मो* ]

[ समासांत 'एषा श्रीशंभु । भूपेंद्र सेवकस्य वि । राजते मुद्रा श्रिहरि । पुत्रस्य जिवाजीक । स्य सोख्यदा ' असा गोल शिक्का* ]

---

ले. ६९ } श्री { श. १६०९ कार्तिक शु. ४
इ. १६८७ आक्टोबर ३०

[' श्री । मार्तंड भैरव । चरण राया । जी सदक प्राभु शरण' असा पिंपळपानी शिक्का* ]

आरंभीं

ई कौलनामे अज दिवाण मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल ता। रयती मोस्तसर बागायेत मा। अगर चेऊल सु॥ समान समानीन व अलफ कारणे दावे कौलनामा येसाजे तुमचे बाबे देसमुख मामले मजकूर मालुम केले की सन सीतामधे गर्नीम राजपुरकर येऊन शाहार जाळहाल करून गेले याकरिता रयेत कुल परागदा

जाहाले शाहर दोन वरशे खराब पडिले वसाहत नाहीं तरी साहेबी रयेतीवर मेहरबानी करून मकसूद मनास आणून मकसूदप्रमाणे कौल दिलीयानी रयेती शाहारामधे जाऊन वसाहत करील म्हणून मालुम केले त्यावरून मकसूद मनास आणून मकसूदप्रमाणे कलमाचे कलम मनास आणून कौल दिधला असे कलमे चिता

किता कलम सन सीतामधे राजपूरकर येऊन जालहाल करून गेले त्याकरिता रयेती कुल परागदा जाहाली घरे व राहाट राहाटवड माड सुपारिया व बाजे झाडे खराब पडिली राजपुरकराचे धास्तीकरिता वसाहत नाही वागावेत कुल खाली जाहाले वसाहतेस जागा नाहीं तेण्हेकरून चोरचिरटे व ज्याचे मनास येई तेण्हे बाजे झाडे व सुपारिया व जुजवी माड तोडून नेले व राहट राहटवड व घरे व देउले मोडून नेली येसियास दुकालाकरिता व फितरतीकरिता काही रयेती मयेती जाहाली काही रयेती राहिली आहे तरी साहेबी मेहरवान होऊन मामुरीवरी नजर देऊन आम्ही आपले जागेयास जाऊन खोपटे घालून वसाहत करून काही माड राहिले आहेती त्यास कस्ट मशाखत सेणपाणी करून तीन च्यार साला बगर कस्टास येतील तेव्हां हसिलास येतील येसियास साहेब मेहरवान होऊन साल मजकुरी खराबेयाचे देणे घेतले आहे नितर्काच बाकी राहिले आहे ते वसाहते बदल मामुरी माफ केले पाहिजे वसाहत करून मामुरी होईल झाडास कस्ट होऊन बारास येतील तेव्हा पाहणी करून जमाबदी केली पाहिजे तोवर बदल मामुरी माफ केले पाहिजे म्हणून तरी अजी ता॥ वसूल जाला तो जाहाला बाकी उरला त्याची तसवीस लागणार नाही पेस्तर

किता कलम राहट राहटवड व देरिया (?) व रुख कुल नेले त्यास जागा नाही व घरास जागा नाही मेहरवान होऊन कर्ज देविले पाहिजे व कोण्हास बैल नसला त्यास बैल पाहिजे तो मेहरवान होऊन देविला पाहिजे म्हणून तर मवसर मनास आणून तुमचा आश्रा पाहून देऊन [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम जजिरे खांदेरी व जजिरे कुलाबा जजिरे पदमदुर्ग येथील कोली येही झाडे चापे व फणस व उडी व राहट राहटवड व माड खुटाकारणे हुकुमे तोडून नेलिया आहेती ते मेहरवान होऊन त्याची किमती बरहक मजुरा देविली पाहिजे मेहरवान होऊन आगर मामूर करीत आहेती किलेयास इस्ताद पाहिजे सालाबाद राने आहेती तेथे कोलियाही बंदरी गलबते नेऊन सिवारी जागा जागाचे आहेती ते तेथील कारकून असतील तेही जमा करून हुडकर जमा करून व कुलची जमा करून रास्ती किलेयाचे नावे खर्च लेहेन हुडे व बाजे सिवार बदरी आणून गलबते भरून किलेयास नेतील येसी साळाबाद रवेस असोन दरम्याने कोली येऊन धिगाई करून आगर बासिली तोडून नेताती कोली चाकर किलेयाचे आणि माड मासली मारावयास खुटास नेताती येसा गहजब होतो मेहरवान होऊन तसवीस दूर जाहालेयान

साली पाहणी करून होईल बेरीज ते सालपावेतो वसूल घेऊन [नि*] मोर्तब सुद

किता कलम बागायेतामधे नागवेली कोण्ही करितील त्याची फर्मास हुजराती व सुभे व कुले व फूट हवाले व किलेयाची करिताती तरी सालाबाद रवेस आहे जरी-बे पत्रकेणी त्यापासून फर्मास बरहक घेऊन त्याचे जरीबेयामधे मजुरा द्यावी येसी रवेस असोन रयेतीवर फर्मास येते तेण्हेकरून मामुरी होत नाही कस्ट करून चोर होताती तरी साहेब मेहरवान होऊन फर्मासेची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तरी हुजरून फर्मास येईल त्याची तसवीस तुम्हास न लगे रास्ती पैके देऊन खरीदी करून समाधान असो देणे [नि*] मोर्तब सुद

किता कलम पेसजी तह आहे की नारल दर सदे टके ५॥९ व सुपारी दर मणे टके १८ येसा असोन हली अगर खराबा वसाहत नाही हसील नाही खराबा जाहाले येसे असोन हली सन सबा कारणे ज्याजती जलल किमती नारल दर सदे टके ६॥ व सुपारी दर मणे टके १०॥ तह करून जमाबंदी केली आहे सरकारकुनी पेसजी तह दिधला आहे तेण्हेप्रमाणे घेतले पाहिजे ज्याजती हली जलल आमचे सिरी होत आहे ते दूर केले पाहिजे म्हणून तर पेसजी तहप्रमाणे घेऊन जाजती तसवीस न लगे [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम अनाडी कुले असेल त्यास येक साल घरटका व मीठ माफ करणे व बेगारीची तसवीस न लगे ते मामुरी होईल म्हणून तर ज्या किलेयास जितकी झाडे नेली असतील त्याचा जाबिता नावनिसी झाडाचा तपसीलवार जाबिता करून देणे मजुरा पडेल पुढे झाडाची तसवीस न लगे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम कोण्ही निलोतरी बाडी-मधे करितो त्याची फर्मास करिताती सालाबाद रवेस आहे रास्ती किमतेन बागवामापासून फर्मास चालऊन त्याचे जरीबेयामधे मजुरा देवाती येसी रवेस आहे तरी साहेब मेहरवान होऊन निलो-तरीची फर्मास दूर केली पाहिजे म्हणून तरी सुखे मामुरी करणे येकदर तसवीस लागणार नाही जे खरीदी करणे ते बाजा-रात खरीदी करून तुम्हास तसवीस न लगे कोण्ही जुलूम जाजती करील त्यास ताकीद होईल [ नि* ] मोर्तबसुद

किता कलम फर्मास झाप सालाबाद रवेस आहे हवालदार व मजमुदार यांदीयास झाप द्यावे यैसीयास सुभे व जुमले व फूट हवाले व बाजे यास झाप देविताती तेण्हेकरून आगर खराब होतो त्याची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तरी कोटवाडा खाजगी व मामला याचा शाकार करावयास दर माइस झाप २ दोन प्रमाणे देणे बरकड ज्याजती होईल त्याची रास्ती किमती देऊन [नि*] मोर्तब सुद.

किता कलम कोण्ही खुटियास आहे याची झाडे हसिली व माड कोलियास चापे व फणस मागताती याची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तर अजीपासून

दूर केली पाहिजे म्हणून तर मीठटका घेऊन घरटका व वेठबेगार याची तसवीस लागो देण्हार नाही येक साला माफ असे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम कोण्ही वाडियामधे नाचणी व हरक व बरई व उडीद व मूग व मेधल च वागी व आले व हळद व ऊस व ताग व तुरी व जोधले करील त्याची पाहाणी बदल मामुरी तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तर मामुरा वाडियास तकादा न लागे आमानतास कीर्दी केलिया पाहाणी करून घेऊन [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम वाडिया खराबा आहेती त्या कोण्हास इजारा लाविला तरी बरहक पाहाणी करून च्यार पाच साले इस्तावा करून देणे व बाजे झाडे बदल मामुरी हसील देणे त्यास कर्ज व बैल बदल मामुरी देणे म्हणून तरी खराबा वाडी असेल ते माहलीचे कारकुनाचे रुजुवातीने लावणे तह करितील तेण्हेप्रमाणे घेऊन [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम तपवासनिस हुजुरून येतानी दरम्याने कोण्ही चुगली करितो हे कोण्हास फितवा घालून त्यास मसाले करून दस्त करून आणितातीं तरी साहेब आमचे सिरावरी हकीम असोन दरम्याने मनसुफी इनसाफ न करिता खड गुन्हेगारी घेताती हे साहेबास दखल नाही तरी जो कोण्ही साहेबी बगर रजाने आणिला त्याची इनसाफी साहेब व देसमुख देसपांडे व तपवासनीस बैसोन बरहक इनसाफ करून ज्याचा गुन्हा आसिला त्यास मबसर जाहाले ते जाहाले याउपर तसवीस न लगे [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम बागायेतामधे जिरायेत आहे ते खराबा आहे ते बदल मामुरी च्यार साला इस्तावा देविला पाहिजे म्हणून तरी दुसाला इस्तावा करून देऊन [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम सरदेसमुखी जे जमाबंदी आकारेल त्यामधे सरदेसमुखी वजा करून बाकी बेरीज राहील त्याचा वसूल घेणे ज्याजती तसवीस न लावणे म्हणून तर अकार होईल त्यात सरदेसमुखी वजा करून उरली बेरीज वसूल घेऊन जाजती तसवीस न लगे [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम माहाल मजकूरचे कारकुनी वरानदाराबदल हसिली झाडे व माड विकताती हे खेस नाही झाडे आमची पोटची लेकरे तोडिताती आगर खराब करिताती हे कारकुनी नव्हे साहेब मेहरवान होऊन कारकुनास ताकीद फर्माऊन झाडे न तोडावी ये बाबे कौल दिधला पाहिजे म्हणून तर अजी तागायेत झाडे तोडिली असतील त्याचा जाबिता करून मामला पाठवणे विल्हे करून याउपर कार[कुन] वरातदारास झाडे हसिली विकोन देतील त्या [स ता] कीद करून झाडे विको[न देण्हा ]र नाही जाणिजे [ नि.* ] मोर्तब सुद

किता कलम सुपारी व माड व बाजे झाडे कुल आगराची तोडून नेली आहेती त्याची किमती मजुरा देविली पाहिजे पाहणी बाद देविली पाहिजे म्हणून तरी

माफीक गुन्हेगारी घ्यावां ज्याचा गुन्हा नसला त्यास तसवीस न लवावे ये बाबे कौल सादर केला पाहिजे म्हणून तर सदरहु गोस्टीचा तह आम्ही व सरदेसमुख व देसमुख व मोख्तसर येसे बैसोन बर-हक मनसुफी करून ज्याजती जलल करील त्यास सजा पावेल जाणिजे [नि*] मोर्तब सुद

किता कलम रयेती शाहारामधे वसाहत करील त्यास बदल मामुरी घरटका व मीठ माफ केला पाहिजे म्हणून तर घर-टका माफ येकसाला करून मीठ घेऊन जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम किलेहाये व सुभेहाये व जुमलेहाये व पावलोक फुटहवाले व घोडा राऊत स्वारी करून येनाती ते रयेतीचे भात व बीज घरीहून व मार्गीहून व विलायेतीहून साचपेमे लुटून नेताती येण्हेकरून रयेतीचा हारास होतो इनसाफ होत नाही दिवाण बेरीज वसूल होता ...... लूट नागावा होतो [ साहेब ] आमचे सिरावरी असता जलल होते ते मेहरवान होऊन जललज्याजती दूर केले पाहिजे हिसेबी कुल हक वसूल घेणे ज्याजती तसवीस दूर करणे म्हणून तरी येकदर तसवीस लागो देण्हार नाही मनास आणून पारपत्ये करून जाणिजे स्वारी सिकारी जे तर्फेस जे गावी होईल तेथे तसविस लागो देणार नाही जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम बदल मामुरी भडारी तह मुदतीने माड रोजे करितील त्यास पेटवणी पधरा रोज रसेस आहे बदल झाडे सुपारी व माड तोडिले असतील त्याची त्याची बेरीज होईल ते बाद देऊन जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम वसाहत जाहालेयावर हरकोण्हावर बाकी बकाया असेल त्याची तसवीस लागलेयान खराबा होईल बाकी मेहरकसी करून मेहरवान होऊन माफ केली पाहिजे म्हणून तरी हजीर कुलावर बाकी असल ते हाजीर कुलाचे फाजील असल त्यात मजुरा देऊन जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम आम्ही रयेती सन सिता-पासून ता। सन समान पावेतो परागदा आहो आमचे जागेयाचा उछेद जाहला वख्ताचे सावयास नाही आपले जागेयाम जाऊन जमिनीवर कस्ट मशाखत करून आपला जीवमात्र वाचऊन आपले जीवा-बदल व मामुरीबदल आम्ही रयती मिळोन आपला हर येक बाब [कस्ट] करून दूर-म्याने कोण्ही दयावितील त्याची तसवीस न लगे ते केले पाहिजे म्हणून तर जो कोण्ही गैर करील त्यास ताकीद करून दूर करून जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम फाजील सालगुदस्ताचे देणे रयेतीचे आहे ते मजुरा देविले पाहिजे म्हणून तर हजीर कुल असेल त्याचा जाबिता करून मामला पाळवणे विल्हे करून जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

किता कलम बागायेतामधे जिरायेत खराब आहे त्याची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तर त्याची तसवीस न लगे मामुरा रास्ती होईल ते घेऊन जाणिजे [ नि* ] मोर्तब सुद

मामुरी पेटवणी पधरा रोज देविले पाहिजे
ये बाबे कौल देविला पाहिजे म्हणून तर
सालाबाजप्रमाणे देऊन जाणिजे [ नि* ]
मोर्तब सुद

सदरहूप्रमाणे कलमाचे कलम मनास आणून तुम्हास कौल दिधला असे सदरहूप्रमाणे हुजूर राजश्री पंत स्वामीचे सेवेस लेहोन व सुभा माहलानिहायेचे सुभेदारास यसैर लेहेन तुम्हास कौल आणून कोण्हे बाबे सक न धरणे राजनामाप्रमाणे कौल आणून देऊन कौल असे [ नि* ] मोर्तब सुद

तेरीख ३ माहे मोहरम
मोहरम

[ कागदांतील प्रत्येक कलमापुढें व लेखाचे शेवटीं ' मोर । तबसु । द ' असा पदांमी मोर्तब.* ]

---

ले. ७० } [ ले. ६९ प्रा॰ शि. व मो.* ] { श. १६०९ कार्तिक शु. ४
इ. १६८७ आक्टो. ३०

ई कौलनामे अज दिवाण मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल ताहा ता॥ सराफ कसबे चेऊल सुदुर सन समान समानीन व अलफ कारणे दादे कौलनामा यैसाजे तुमचे बाबे देस[क*]मामले मजकूर मामला येऊन मालुम केले की सन सीतामधे गनीम राजपूरकर येऊन शाहार जालहाल करून गेले याकरिता रयती कुल परागदा जाहाली शाहार दोन वरशे खराब पडिले यामुले ता॥ मजकूरचे सराफ परागदा होउनु जागाजागा गेले तरी साहेबी सराफावर मेहरवानी करून मकसूद मनास आणून मकसूदप्रमाणे कौल दिलियानी सराफ शाहारामधे जाऊन ताफा मामूर करितील म्हणोन मालूम केले त्या...मकसूद मनास आणून मकसूदप्रमाणे ...स कलम मनास आणून कौल दिधला•••कलम बीत॥

किता कलम शाहार खराब पडिले ते जागाईत आमचा उदीमव्यापार गेला यैसेयास साहेब मेहरवान होऊन श्याहार मामूर जाहलियान आम्ही श्याहारात येऊन उदीमव्यापार करून तेव्हेप्रमाणे उदीममाफीक आमचे सिरी टकाभार ठेवाल त्याचा उसुल बारमाही घेतला पाहिजे म्हणोन तरी उदीम मापाफिक

किता कलम आमचे कर्ज मागील दिवा[णा*]कडे नरूत मामलाकडे व माहलाकडे असत आहे ते साहेबी मेहरवान होऊन देविले पाहिजे कर्ज हाती [ आलि ]यावर उदीमव्यापार करून आणि साहेबाचा ताफा मामूरा करून म्हणोन तरी हिसेब मनास आणून विल्हे करून देऊन साल मजकुरी विल्हे करून देऊन [ मि.* ] मोर्तब सुद [मो.*]

बारमाही उसुल घेऊन सालमजकुरी देणे माफ केले असे [नि.*] मोर्तब सुद [मो.*]

किता कलम आम्ही पोटाचे दाणे नगाव्याबदल खाचेपम करून ठेविले होते ते दिवाण लोकानी नेळे तरी मेहरवान होऊन देविले पाहिजे म्हणौन तरी मनास आणून बाजे लोकाची नेली आहेत त्याची विल्हे करून त्याप्रमाणे तुमचीहि विल्हे करून देऊन [ नि.* ]मोर्तब सुद

किता कलम घरटका व मीठ व दारमाड आहेत याचे देणेयाची तसवसि न लाविली पाहिजे देणे माफ केळे पाहिजे म्हणौन तरी मीठटका घेऊन वरकड साल मजकुरा-पासून माफ [ नि.* ] मोर्तब सुद [मो.*]

किता कलम पुढे शाहार मामुरी जाह-लियावर आम्ही शाहरात जाऊन वस्ती करून आणि हर कोण्ही सराफ म्हणोन कर्जवाम उसनेपासने मागेल ते आमचे-याने देवत नाही म्हणौन तरी हेविसी तुम्हास [ कौल ] असे येकदर कर्ज कोण्ही नेदावे दाटजोरे कोण्ही कर्ज मागेल त्या हुजुरून तांकीद करऊन [ नि.*] मोर्तब सुद [मो.*]

सदरहूप्रमाणे कलमाचे कलम मनास आणून तुम्हास कौल सादर केला असे येण्हे कौले कवीहाल होऊन सुखे शाहारात येऊन घरे बाधोन वसाहती करणे कोण्हे-याचे शकआदेशा न धरणे येण्हेच प्रमाणे मकसूदच्या तालिका करून हुजूर लिहून राजश्री [मो. जा.*] पंताचा व सुभेदाराचा कौल तुम्हास आणून देऊन बेसक होऊन शाहरात वसाहत करणे दरी बाब कौल आसे

तेरीख ३ माहे मोहरम

---

ले. ७१ [ शिक्का व दोन ओळी नष्ट*] { श. १६०९ कार्तिक शु. ४ / इ. १६८७ आक्टो. ३० }

सुहूर सन समान समानीन व अलफ दादे कौलनामा येसाजे तुमचे बाबे देशमुख मामले मजकूर येऊन मालूम केले की सन सितामधे हयसी राजपूरकर गनीम येऊन शाहार जालहाल करून गेले याकरिता रयेत कुल परागदा जाहाली शाहार दोनी वरसे खराब पडिले वसाहत नाही तरी साहेबी रयेतीवरी मेहरवानी करून मकसूद मनास आणून मकसूदप्रमाणे कौल दिल्हा पाहिजे म्हणजे रयेती शाहारात जाऊन वसाहत करील म्हणून अर्ज केला बराये अर्ज खातीरेस आणून मकसूद मनास आणून कलमाचे कलम कौल दिल्हा असे बीता

किता कलम गनिमाने शाहार मारिले त्या तागाईत शाहारात फिरोन गेलो नाही खराब पडिले उदीम राहिला

वेटबेगार रायेगड व खादरी कुलाबा सागरगड पद्मदुर्ग हे आमच्याने करवत नाही जे काम सागणे ते शाहारात कबूल

साहेबी मामुरांवर नजर देऊन वसाहतीची रजा फर्माविली कबूल आहो साहेबी घरटका मीठटका व बाजे बाबती व महसूल माफ केला पाहिजे म्हणून तरी मीठटका घेऊन वरकड येक साला माफ केले असे जाणिजे मोर्तब सुद

कोटवाडा साजगीमधे येकदोघ सोनार धरून नेऊन तकदमा पैके घेतले आहेती साहेबी मेहरवान होऊन पैके देविले पाहिजेती म्हणून तरी जाले ते जाले या-उपरि तसवीस लागो देण्हार नाही चिंता न करणे मोर्तब सुद

शाहारामधे दिवाण लोक कामे करविनाती त्याची मशाखत देत नाही मेहरवान होऊन देवीत गेले पाहिजे म्हणून तरी शाहारामधे जे कामे करावितील मजुरी नर्दान त्यास ताकीद करून मशाखत देवऊन जाणिजे मोर्तब सुद

आमचे दारी येक येक दोन दोन मात्र आहेती तरी साहेबी बदल मामुरी देणे माफ केले पाहिजे म्हणून तरी येक साला देणे माफ केले असे जाणिजे मोर्तब सुद

असो म्हणोन तरी शाहारासेरीज दुसरे जागा तुम्हा को[न्हा]स पाठवणार नाही समजाद असो देणे जाणिजे मोर्तब सुद

शाहारातील आम्ही सोनार मुलकात फिरावयास जातो भलताच किलेकरी व नामजाद लोकामधेच धरून धासदपट करितो काही दाणादुणा रुका आडिका असतो तो घेऊन जातो मेहरवान होऊन माफ केले पाहिजे म्हणून तरी दरम्याने तसवीस लावील त्याचे ठावठिकाण हुजरेच ठाई पाडू मामलास येणे पारपत्य होईल जाणिजे मोर्तब सुद

आम्ही शाहारात मामूर जालियाने आम्ही शाहारात जाऊन वस्ती करून आमचा उदीम चाले ते माफीक सडणी केली पाहिजे म्हणून तर बहुत बरे येण्हेचप्रमाणे चालऊन जाणिजे मोर्तब सुद

येण्हेप्रमाणे कलमाचे कलम मनास आणून तुम्हास कौल सादर केला असे येण्हे कौले कवीहाल होऊन सुखे शाहारात येऊन घरे बाधोन वसाहती करणे कोण्हे चाबे शक अंदेशा न धरणे येण्हेचप्रमाणे मकमुदाच्या तालिका करून हुजूर राजश्री पंतस्वामीचे सेवेस बसेर लिहून सुभास लिहून तुम्हास कौल आणऊन बेसक होऊन शाहारात वसाहत करणे उदीम वेवसाये करणे दरीयाव कौल असे मोर्तब सुद

तेरीख ३ माहे मोहरम

माहे मोहरम

[प्रत्येक कलमाच्या व लखाच्या असेरीस मोर्तब सुद असा बहुतांमी मो.* ]

ले. ७२ [ फा. वा. शि. व ९ ओळी म.* ] श. १६१०-११ इ. १६८८-८९

सत फरोख्त कर्दे बेस्मी

रामाजी सोनाजी अदिकारी मामले चेऊल [ सही* ]

माणकाई अयाल प्रतावजी सोनाजी
मुगताई अयाल हिराजी प्रतावजी.
[ काकणाचें चित्र* ] नि॥ काकण

वाडीकर मा॥ नागावे ता॥ अस्टागर मामले चेऊल सुहुर सन तिसा समानीन व अलफ कारणे सेखजी बिन हुसैनजी जमुरे वस्ती वस्ती दादर कसबे चेऊल यासी सत फरोख्त लेहोन दिधले यैसे जे आपली मिलकत बीता॥

वाडी पेंड किता १ येकूण तकसीमा ११ येकून रकम कास टके १२१८ वजा अलाहिदे तकसीमदार १० येकून कास टके १२१८ तपसील

वाडी दुरभाट किता १ येकून भाटे ३
भाट किता १ सार भाट किता १

तकसीम विसोबा माहजन व नारोबा माहजन तकसीम १ येकूण कास टके १०
तकसीम बाल करदीकर तकसीम १ येकूण कास टके १०
रघु बालाजी ता॥ १ येकून कास टके १०
रघुजी कुलकर्णी तकसीम १ येकूण टके ११

टोल भट कढा ता॥ १ येकून कास टके १०
कृस्णाजी रिसबूड ता॥ २ येकूण कास टके ३०८
कृृग पाईक तकसीम १ येकूण कास टके १५
माहाद वर्तक तकसीम १ येकूण कास टके १०
कृग वर्तक हर वर्तक तकसिम १ येकूण कास टके १५

आबे भाट किता १
वर्णमला किता १ येक येकूण तकसीमदार ११ बा॥ रकम पेडी यासी वजा तकसीमा बाजे तकसीमदार १० येकूण रमारमी वर्णमला याच्या तकसीमा बा॥ रकम ६ बाकी आपली मिलकत तकसीम सातवी येक १

बाकी आपली मिलकत तकसीम १ येकूण कास टके २० बसि येकूण तकसीम १

सदरहु मिलकत आपण आपले अत्मखुसे फरोख्त केली असे यास्या हदा च्यार ४ बीता॥

| पुर्वे हद | दक्षेणे हद | पसमे हद स्वार | उतरे हद |
|---|---|---|---|
| मला ता॥ पेंडी हाद | वाडी पेंडी पेकी ता॥ माहजन व कृग वर्तक | अदिकारी मामले चेऊल | सार[भा*]ट |

या चतु हदासहीत देखील जलस्थल व राहटराहटवट व माड व सुपारी व बाजे हरजिनसी झाडे देखील फरोख्त केली असे तुम्ही व तुमची अवलाद अफलाद भोगवटा

कीजे आपणासी व आपले अवलादेसी अर्थाअर्थी समध नाही व आपला वारीसदार अगर हर कोण्ही सदरहु मिलकतीसी दगदावा करील तरी आपण सोडऊन देऊन सदरहु मिलकतीची किमती चौपचारे केली बसरी लारी १२५०८ साडे बारासे केली हे पैके आपणासी रोख तुम्हापासून पावले हे आपले खत फरोख्त सही किमती बसरी लारी साडेबारासे रास १२५०८ [ प. ब. फा. मो.* ]

गोही

| | | |
|---|---|---|
| कृष्णाजी महादेऊ देसाई मामले चेऊल पत्रप्रमाणे साक्ष | ... | ... |
| साक्षे बावाजी विठोजी अधिकारी मामले चेऊल | ... | ... |
| पत्रप्रमाणे साक्षे —जी माहादाजी अदिकारी | ... | ... |
| मामले चेऊल | ... | ... |
| खतप्रमाणे साक्षे विसोवा विठोवा माहाजन मा। मजकूर | ... | ... |
| रायाजी प्रभु दा। खाने अजम हवसखान | ... | ... |
| लिहिलेप्रमाणे साक्षे बकाजी उधव प्रभु | ... | ... |
| लिहिलेप्रमाणे साक्षे पुतलाजी माहादेऊ कुलकर्णी | ... | ... |
| आगर चेऊल | ... | ... |
| लिहिलेप्रमाणे साक्ष कवालजी राम प्रभु पा। अभेपूर[1] | ... | ... |

---

हू

ले. ७३ } [ आरंभीं ' खेरियतखान बन्दह बादशाह आलमगीर सनह २५, १०९३' असा वा. फा. शि* ] { श. १६११ कार्तिक वद्य १ इ. १६८९ आक्टो. २६

अज रहतखाने खेरयेतखान कोट जजिरे राजपुरी बजानेब हवालदार व कारकुनानी व खोतानी व रयानी हाल व इस्तकबाल तो। मामले मामले चेऊल मालुम बाशद के सुा तिसैन अलफ मा। दादाजी [ माहाद ]जी देसाई व देसकुलकर्णी मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल याचे तपेकुलकर्ण तपे मजकुरीचे कदीमुल-आयाम चालत असे यैसियासी साल मजकुरी मा। दादाजी हुजूर येऊन अर्ज केला त्यावरून याचे कुलकर्ण याचे हैवाले केले असे तरी साल मजकुराकारणे दिवाणातून हक रयेत नि। बा। साल गुदाप्रा दोविला असे तेणेप्रो चाकरी घेउनु देणे पेस्तर साली याचा कदीम हकलाजिमा नक्ष व गला रयेतानि। मातकदम चालिला आहे तेणेप्रा रयेतनि। पावता करवणे आणि कुलकर्णपणाची चाकरी घेणे मा। निले आपले तर्फेन मुतालिक जो कुलकर्ण चालवावयासि पाठवील याचे हातुन

---

१ उजवीकडे समासांत फार्सीमध्ये ६ साक्षी व १ फा. शि.

चाकरा घेत जाणे तालिक माहाली लिहून घेउनु असल फिराउनु देणें छ २२ मोहरम मोर्तब सुद [ पं. ब. फा. मो. * ]

[ कागदामागें* ] पो छ १४ माहे सफर

---

ले. ७४ — हू — [ वरच्या लेखाप्रमाणे शि. व मो.* ] — श. १६११ कार्तिक व. ११ — इ १६८९ आक्टो० २८

सैरयतसान

दं मा अनाम देसकानी व अदिकारियानी व देसकुलकर्णियानी मामळे मुर्तजाबाद उर्फ चेऊल यासि [मो.जा.*]कोट जंजिरे राजपुरी [मो.जा.*] द्वा सुा तिसेन अलफ तुमचे बाबे मा बाबाजी देसाई व देसकुलकर्णी मामळे मजकूर यानी हुजूर येउनु तुमची कितेक वजाने सिफारस सांगितली त्यावरून मालुम जाहाली तरी तुम्ही मिरासदार वतनदार आ[हा] तुम्हास येसलेच पाहिजे हाली पातशाही मुलुक जाहला आहे तरी तुम्ही मेहनत मशागत करून पातशाही कामामधे दिल घालून मुलुक मामुरा केलियानें तुमची सरफराजी असे तरी तुम्ही मिरासदार होउनु आपले कानूस हैगे करायासि गरज नाही पेस्तर सरफराजी असे छ २४ मोहरम मोर्तब सुद

[ कागदामागें* ] कागद सैरातसान देसकास लिहिला आहे

---

ले. ७५ — श्री — [ ले. ६९ प्रा शि. व मो.* ] — श १६११ मार्ग. व. १२ — इ. १६८९ नोव्हें. २८

अज माहाल चेऊल मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल ता रयान देहाये प्रांत चेऊळ व माहाल कसबा व आगर मामले मजकूर सुा तिसैन व अलफ मशहुरुल अनाम बाबाजी विठोजी अदिकारी मामले मजकूर येहीं माहालीं येऊंन विदित केले ऐसे जे आपल्या वतनाच्या इनामती व इसापती राजश्री [मो.जा.*] कैलासवासी राजे यांचे अमलापासून हक सरकारी जमां धरला आहे त्यासिवांई आपला कानूकाइदा रयेतानिसबत चालत आहे बीतपसील

दून व प्राइस्चिताचा सेला कलम १

जोइसी व उपाध्ये ब्राह्मण याली गोलक यांजकडे हक कलम १

डाकी स्थल व नुरी स्थल मोहतर्फी यांजकडे महासूल कलम १

मोहतर्फी कुले यांजकडे सण दिपवाली व सिमगा व सवंत्छरप्रतिपदा जिनसप्रो कायदा कलम १

येणेप्रो सुदामत भोगोटा आजपर्यंत चालत आहे त्यास कोण्ही येक हरकत करून मौनीत नाहीं याजकरितां माहालीं येऊन विदित केले त्याजवरून सुदामतीचा दाखला प्रांत मजकुरचे जमीदार व मोख्तासर व रयेत यानजीक मनांस आणितां

मुदामत पेस्तरपासून चालत आले आहे हाली त्यामोजीब अदिकारी मारनिले यांचा हकलाजिमां देत जाणे उजूर न करणे जाणिजे रा छ २५ माहे सफर [ नि.* ] मोर्तब सुद [ म. ब. मो* ]

---

ले. ७६ [ वा. अस्पष्ट शिक्का* ] { श. १६११-१२ नंतर
इ. १६८९-९० नंतर

ई कौलनामा अज माहल ठाणे मा ...... आगर ता कोलीबंदर कसबे मा ...... तिसैन अलफ दादे कौलनामा येसा जे तुमचे बाबे भिकाजी...... ...... ठाणा येऊन माळुम केले की कोली मजकूर कुल फुटली काही मयेत जाली व परागदा जाहाली उदम नाही ऐसियासी मेहरवान होऊन येक बोलकौल याल तर कोली मजकुरास राजी करून थोडबहुत दिवाणचे बेरजीस जागा करतील तर साहेबी मेहरवान [ होऊन कौल सादर के ] ला पाहिजे बराये [ मालुमाती ] खातीरेस आणून तुम्हास कौल सादर केला असे तुम्ही सुखे येऊन सेते मामुरा करणे साल गुदस्ता मख्ता टके ५०० त्यास कुले बाकीदार जाहाली जिकडे तिकडे गेली साल मार द्यावयासि...नाही म्हणौनु अर्ज केला त्यावरून मख्ता टके २५० आडीचसे टके वसूल करणे ज्याजती तसवीस लागणार नाही दरी बाब कौल असे छ १४ रमजान [ नि.* ] मोर्तब सुद [ बदामी मो.* ]

---

ले. ७७ { श. १६१२ श्रावण वद्य ७
इ. १६९० आगस्ट १६

ई कौलनामा अज सुभा येतकातखान साहेब नामजाद ता तलकोकण मालुम दानद बा देसमुखान व देशपांडियान व मोकादमानी व रयानी सुभा चेऊल सा महिने पातशाही फौज येऊन बैसली आहे आणि तुम्ही रुजु जाले नाहीत यैसे नादान बाउपर त्या प्राते दामाजी रघुनाथ व केरोजी पवार मनसफदार पाठविले आहेत यापासी येऊन रुजु होणे हे जो तह करून देतील त्याप्रमाणे चालऊन तमाम परगणे आबाद करून आपले मुजरा करुन घेवणे पा पाली आसराब घारणे व आतोणे व तपे नागोठणे व मामले चेऊल सा परगणेयाचे दस्त बदस्त माइलेस समजाऊन म्हणौन कौल असे सन हजार ११०० माहे जिलाकाद छ २० रोज

---

ले. ७८ हू
[ फा. वा. अस्पष्ट शि.* ] { श. १६१३ ज्येष्ठ शु. ४
इ. १६९१ मे २१

येजनसार नरसो भास्कर...सदरते (?) मा चेऊळ बिदानद सुा इहिदे तिसैन आलफ अर्जदास पहेउनु (?) मा माळुम जाला भाईचे बाबे लिा मालुम जाले फिकर

न करणे बाकी हकीकत मालुम जाली थोडेच रोजीं विल्हे हेउनु येईल फिकर नसे रा। छ २ रमजान [ लं. फा. मो.* ]

---

ले. ७९ } [ वा. फा. शि.* ] { श. १६१३ आश्विन वद्य १ / इ. १६९१ सप्टें. २८

इजत आसार दामाजी देसाई व देसपाडिया मामले चेऊल मालुम दानद सन ३५ सुा। इसने तिसैन अलफ तुज परवाना पाठविला की इनामती व इसाबती जाबिता घेऊन येणें म्हणून लिहिलें आंणि हनोज आला नाहीस येसा नादान हाली देखत परवाना इनामती व इसाबती जाबिता व बकाजी गुमस्ता येसे घेऊन सिताबत येऊन पोंहचणें दिरंग लागलिया ताकीद होईल जाणिजे रा। छ १५ मोहरम

पेवस्ता छ १९ रोज

---

ले. ८० } [ वा. फा. शि.* ] { श. १६१३ मार्गशीर्ष शु. १० / इ. १६९१ नोव्हेंबर २०

ई कौलनामा [व] जारतीपन्हा दिवाण व अमीन व फउजदार सरकार तल-कोंकण ताहा दामाजी आपाजी देसाई व देसपाडिये मामले मुर्तजाबाद उरुफ चेउल सन ३५ सुा। इसने तिसैन व अलफ तुझे बाबे येकबालपन्हा सिदी अजम सिदी अबदुल रहिमान किलेदार किले उदेरी येही लिहिले की देसपांडिया सक धरून राहिला आहे त्यासि तकवेत कौउल सादर केला पाहिजे म्हणून लिहिले तर तुवा येसक होऊन येणे आपला कारभार करीत जाणे तुझा हकलाजिमा असेल कदीम तो तू हुजूर रुजु जालेयावर तुज घेवयाचा हुकूम देऊन कोण्हे बाबे सक अधेसा न धरणे दरी बाब कौलु असे छ ९ रबिलोवल

---

ले. ८१ } हू नकल { श. १६१५ चैत्र शु० १३ / इ. १६९३ एप्रिल ८

सुरत मजालीस लिहिली जाते बहिुजर मुसलमानानी व जमीदारानी व मोत बरां वगैरा बीतपसील

| | | |
|---|---|---|
| चांद वलद याकुब १ | इभ्रम दलवीं १ | हुसैन दलवी १ |
| आगा हसन वलद | हाजी हुसेन मखदुम १ | सेख हुसैन सेखानी १ |

आगा महमद १
सैद नसरुला वलद
सैद मिर्रा १
गोविंद कृस्णाजी
देशाई मा। चेउल
इभ्राइमजी देशमुख
आगसी १
रघुजी कुलकर्णी नागाव
आगासी
गोवरोजी चोधरी कसबे
चेऊल

महमद जाफरखान सिलो-
त्री खार जाफर १
आपाजी माहादाजी अदि-
कारी मामले मुर्तजाबाद
उर्फ चेउल
हिराजी रंगाजी चिटनीस
मा। आगसी
वीर वर्तक
बालचलाल रयेती

सैद इभ्राईम सैद नसरुला १
दामाजी आपाजी देशाई व
देसकुलकर्णी मामले मु॥
जाद व आदिकारी ता।
क्षिराड अस्टागर
पिलाजी येस प्रभु

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल सन ३६ जुलुस मवाफीक सन हजार ११०४ सन सलास तिसैन अलफ कारणे कमालद्दी हुसैन व॥ शेरीफ अहमद इब्न खोजे नुरदीन सेकीन कसबे चेऊल येही येऊन अर्ज केला कीं मिलकत सिद्दी अंबर खुदावंदखानी याचे नउदर बेली व दिवेराई तों खाडाले हे जागा असे ऐसियास सिद्दी अंबर फौत जाहाले यावर त्याचा बेटा सिद्दी अबदुल अली भोगवटा करीत होते तेही . फौत जाहाले यावर सिती सारा अयाल शेरीफ हबसखान बेटी सीदी अंबर खुदावंदखानी भोगवटा करीत होते सिती सारा व शेरीफ अली हबसखान हर दूजणे हयात असतां सिद्दी अबदला वलद सिद्दी अंबर हे सुरतेस होते यावर सिद्दी अबदुल अली वफात जाहाले हे खबर सिद्दी अबदलास जाहीर जाहाली त्याजवर हे चेवलास आले आण आपले बहिणीस व खान शेरीफ अली हबसखान यांचे. बहूणेयाचा मुलाकात जाहाली यावर सिती सारा व सिद्दी अबदला हर दूजणे मानभाई नऊदराचा भोगवटा करीत असतां येथे सिद्दी मशारनुले याचा अवकात गुदरान नव्हे म्हणून सुरतेस गेले कबिलेयानसी तेथेच राहिले यावर शेरीफ अली हबसखान हे फौत जाहाले सिती सारा ही आपली मिलकता कमाविस भोगवटा करीत असतां त्यास पोटीं फर्जंद नाही म्हणून सिद्दी अबदलाचा फरजंद सिद्दी महमद सुरतेहून आणिला त्यासी सिती सारा येही फर्जंद लुतफी केला तरी सिद्दी महमद सिद्दी अंबर खुदावदखांनी याचा पोता यासी बेलीची वारिसी पोहचत असे सिती सारा येहीं फर्जंद लुत्फी केलियान . याचे तर्फेन त्यास मिलकत हिसा पोहचला कितीयेक मुदत भोगवटा करीत असत तेही फौत जाहाले यावर सिद्दी महमद याचे बाप सिद्दी अबदला याचे फर्जंद व कबिला सुरतेस होते दरम्याने फितरत जाहाली यावर त्याचे वारीस पैठण व औरंगाबाद तर्फेस गेली आहेत याची मिलकत बेली व दिवेराई बगर तामिरात खराब होती म्हणून मिलकत मा।र कमालद्दी हुसैन व॥ शेरीफ अहमद वारीस शेरीफ

अली हबसखान याचे म्हणून तामिरात नउदर मजकूर याचे हवाले केले असे येही तामिरात करून दिवाण देणे जें पडेल तें देऊन तरीके अमानत त्याचा फातियास खर्च लागेल तो करीत जाणे हे तरीकेने नउदर बेली व दिवेराई याची कमावीस करीत जाणे जे वख्ती सिद्दी अंबर खुदावंदखानी याचे तर्फेन वारीस हाजीर होतील ते वख्ती त्याची मिलकत त्याचे हवाले करून तोंवर आम्ही तुमचे हवाले केली असे तुम्ही नउदर मजकूरची कमावीस करित जाणे तेरीख छ ११ साबान

